म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय [illegible]
दा. क्र. *५४१८

५४१८



# मा[illegible] [illegible]युरी

IRBK-0105418
IRBK-0105418

ग. वि. अकोलकर

रेडियम संशोधिका

# मादाम मेरी क्यूरी

ग. वि. अकोलकर

संग्रहालय
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ........ नों. दि ..............
वि. .............. क्र. ..................

IRBK-0105418
IRBK-0105418

[illegible]नेन्टल प्रकाशन, टिळक रोड, पुणें २

प्रकाशक :
अ. अं. कुलकर्णी,
कॉन्टिनेन्टल् प्रकाशन,
१९६/१९ सदाशिव, पुणें २.

किंमत दीड रुपया
प्रथमावृत्ति : १९४९
द्वितीयावृत्ति : १९५५
सर्व हक्क सौ. इंदिरा अकोलकर यांचेकडे.

मुद्रक :
दामोदर त्र्यंबक जोशी,
व्यवस्थापक चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २.

माझ्या भगिनींस

# निवेदन

मा. मेरी क्यूरी या वैज्ञानिक संशोधिकेची जीवन-कहाणी जितकी ओजस्वी तितकीच मनोरम आहे. मूळ फ्रेंचमध्यें तिची मुलगी ईव्ह क्यूरी हिनें ती हृदयस्पर्शी भाषेंत वर्णन केली आहे. इंग्रजींत तिचें भाषान्तर झालें आहे. संक्षेपरूपानें वा स्वतंत्रपणेंहि ती वर्णन करण्यांत आली आहे. त्या सर्वांच्या आधारें ही कहाणी मराठींत रचण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे. तो कितपत यशस्वी झाला आहे, हें वाचक-बंधु-भगिनींनीं ठरवावें.

या चरित्राकडे लक्ष वेधून तें मराठींत उतरविण्याचा आग्रह करण्या-बद्दल श्री. रमाकान्त वेलदे यांचे आभार मानावयास हवेत. हस्तलिखित वाचून विविध सूचना करण्याचें श्रेय स्नेहशील प्रा. निकुम्ब, श्री. भट (अशोक) व श्री. येवलेकर या सुहृद्रांना आहे. त्या सर्वांचें प्रोत्साहन व पत्नी सौ. इंदिरा हिची निकड नसती तर कदाचित् आणखीहि कांहीं दिवस हें पुस्तक असेंच पडून राहतें. श्री. अनंतराव कुलकर्णी यांचे आभार कसे मानणार? चरित्र पूर्ण व्हावयाच्या आधींच त्यांनीं त्यास 'आपलें' मानून 'दायित्व' पत्करलें होतें. या सर्वांच्या लोभाचें हें फळ आहे.

दि. ७ नोव्हेंबर हा मा. क्यूरींचा जन्मदिन आहे. त्याच दिवशीं पुस्तक प्रकाशित होत आहे हाहि एक सुयोगच.

७ नोव्हेंबर १९४९. ग. वि. अकोलकर

विद्यार्थी बंधु-भगिनींनीं या पुस्तकाचें प्रेमानें स्वागत केल्यामुळेंच हा दुसऱ्या आवृत्तीचा सुयोग येत आहे, याबद्दल त्यांना मनःपूर्वक धन्यवाद.

२० ऑगस्ट १९५५ ग. वि. अकोलकर

# अनुक्रमणिका


१. बाळपणींचा काळ सुखाचा .... ९
२. घरचें वळण .... १६
३. शालेय जीवनांतील स्मृति .... २६
४. समाजसेवेची दीक्षा .... ३६
५. विशाल जगांत .... ४४
६. भोंवऱ्यांतून सुटका .... ५१
७. पॅरिसच्या परिसरांत .... ५९
८. कुतो विद्यार्थिनः सुखम् ? .... ६६
९. पहिली भेट .... ७५
१०. रत्नं समागच्छतु काञ्चनेन .... ८२
११. रेडियमचा शोध .... ८८
१२. कर्मयोगाची शिकवण .... ९९
१३. प्रासाद कीं पर्णकुटी .... १०६
१४. निर्दय विधिलिखित .... ११३
१५. सत्त्व-परीक्षा .... १२२
१६. महायुद्धाच्या ज्वाला .... १३०
१७. दुमदुमलें यश दिगन्तरीं .... १३८
१८. पुष्पसमर्पण .... १४६

" निरामय असं जीवन आपल्या कुणाच्याच वांट्यास आलं नाहीं; पण त्याबद्दल फिकीर कशाला बाळगायची ? आपण चिकाटी धरूं या, आणि मुख्य म्हणजे आत्मविश्वास बाळगूं या. आपण मनाशीं अशी खूणगांठ बांधावी कीं कांहीं तरी कार्यासाठीं आपल्याला शक्ति लाभली आहे, आणि कांहीं झालें तरी ' तें कार्य ' आपणांस साधलेंच पाहिजे. "

—मा. मेरी क्यूरी

अनुक्रम २:८८
विभाग का.वा.
क्रमांक ९०३५
नों. दि. ३१/३/६९

## बालपणींचा काळ सुखाचा : : १

“ मन्या, मन्या,– बाजूला हो; गोळा आला.”

“ अले, पन मी दालुगोला आनलाय ना ! ”

धडाड् धुऽम् ! कडाड्ड् कड् ! ! किल्ला जमीनदोस्त झाला. लाकडी ठोकळे चौफेर उडाले. मुलांच्या हास्यकल्लोळांनीं आणि जयघोषांनीं खोली दुमदुमली. विजयानंदानें बालसैनिकांचे चेहरे प्रफुल्ल झाले. छोट्या ‘मन्या ’ची तर हसतां हसतां मुरकुंडी वळली. दारूगोळा वेंचून वेंचून व झग्याच्या घोळांत त्याची ने-आण करून ती आधींच घामाघूम झाली होती, पण थकल्याचें चिन्हहि तिच्या चेहऱ्यावर दिसत नव्हतें. खेळाच्या आनंदापुढें लहान मुलें जेथें तहानभूकहि विसरतात, तेथें थकण्याची जाणीव कोठून येणार ? चहुंफेर उडालेले ठोकळे व किल्ला सर झाल्याच्या तिच्या भावंडांच्या गर्जना यांत छोटी मन्याहि आपल्यापरीनें सामील झाली होती. श्रमानें लालबुंद झालेलें तिचें मुखमंडल आनंदातिशयानें चमकत होतें, आणि लोटलेलें हसूं तिच्या निळसर डोळ्यांत मावत नव्हतें.

एका रविवारच्या दुपारीं वॉर्सामधील नोव्होलिप्की रस्त्यावरील शाळेच्या आवारांतील अगदीं एकीकडच्या इमारतींत तळमजल्यावरच्या खोलींत वरील प्रसंग घडत होता. शाळेच्या मुख्य इमारतींत व आवारांत सर्वत्र शांतता

पसरली होती. रविवारच्या सुटीची ती शांतता असली तरी पारतंत्र्यांत दडपून टाकलेल्या मतांच्या भीतीचा वास त्या शांततेस येत होता. कारण आवारांतून इकडून तिकडे सावें जावयाचें झालें तरी चोरट्या पावलानें आणि श्वास अवरोधून मुलें जात येत. कारण त्या शाळेचा मुख्य रशियन अधिकारी इव्हॅनॉव त्याच आवारांत राहात असे. त्याचा अंमल करडा होता. त्या लहानशा शाळेंतल्या शिक्षकवर्गावर आणि चिमुकल्या बालकांवर अधिकार गाजवतांना आपण म्हणजे 'प्रति झार'च असें त्यास वाटे. सत्तेचा मद शहाण्यांनाहि चढतो म्हणतात. मग इव्हॅनॉवसारख्या अर्धवट शिक्षितास त्याची नशा चढावयास कितीसा वेळ लागणार ?

त्या दुपारीं शाळेचे उपप्रमुख प्रा. लादिस्लाव स्क्लोडोवस्की यांच्या इमारतींतील मुलांच्या झोंपावयाच्या खोलीला रणमैदानाचें स्वरूप प्राप्त झालें होतें. ख्रिसमसच्या सणांत वक्षीस मिळालेल्या लाकडी ठोकळ्यांचें बंदुकीच्या आणि तोफांच्या गोळ्यांत रूपान्तर झालें. इतके दिवस लाकडी ठोकळ्यांच्या इमारती, पूल, देवळें बनविणारी बालगोपाळ मंडळी तोफखान्यावरील गोलंदाजीचे धडे स्वावलंबनानें घेऊं लागली. मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात अशी म्हण आहे, तिला अनुसरून बालकांच्या सामुदायिक क्रीडेंत राष्ट्रीय आकांक्षा सहजींच दृग्गोचर होतात असें म्हटल्यास फारसें चुकावयाचें नाहीं.

मुलांचा खेळ ऐन रंगांत आला होता. नऊ वर्षांचा जोसेफ लष्करी कप्तानाच्या गांभीर्यानें जमिनीवर ओणवा पडून बालेकिल्ल्यावर नेम धरीत होता. मधून मधून, "हेला, माझा दारूगोळा संपलाय, जल्दी लाव" असें पोलिश भाषेंत तिला फर्मावीत होता. हेलाच्या डोळ्यांतहि वीरश्रीचा आवेश संचारला होता. आपले टोले अधिक लांब जावेत म्हणून तिची धडपड सुरू होती. समोरच्या बाजूला तिची बहीण ब्रोन्या निकरानें हल्ले परतवीत होती. तिच्या शेजारीं छोटी 'मन्या' नुकतीच आणलेली आपली दारूगोळ्याची

सामुग्री छातीशीं धरून उभी होती. तेवढ्यांत 'मन्या' म्हणून गोड आवाजांत मारलेली हाक तिच्या कानीं आली.

"मन्या!" आई म्हणाली, "केव्हांची खेळतेस तूं. आतां घरांत चल."

डाव टाकून जाणें तिच्या केवढें जिवावर आलें होतें! "अग पन मी दमलें नाहीं" म्हणून तिनें कितीदां सांगून पाहिलें. तिचा चेहरा हिरमुसला झाला. अखेर चिमणीएवढें तोंड करून आपल्या बहिणीचें बोट धरून तिला आंत जावें लागलें.

× × ×

ही छोटी 'मन्या' म्हणजेच रेडियम या अत्यंत मौल्यवान् धातूची संशोधिका आणि जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ मेरी क्यूरी. आजवर कोणाहि शास्त्रज्ञाला न लाभलेला मान तिला मिळाला. 'नोबेल' पारितोषिकं तिला दोनदां मिळालें.

मेरीचें 'क्यूरी' हें तिच्या सासरचें उपनांव. मेरीचें माहेरचें नांव मेरी स्क्लोडोवस्की. पण मेरीचें टोपण नांव 'मन्युसा' असें पडलें होतें व लाडानें त्याचा संक्षेप 'मन्या' असा झाला होता. मेरी ही कुटुंबांतली सर्वांत धाकटी मुलगी—शेंडेफळच. त्यामुळें आईचा तिच्यावर फार जीव होता. मेरी आपल्या भावंडांबरोबर खेळत होती. त्यांत जोसेफ हा तिचा भाऊ होता. त्याचें वय या वेळीं दहा वर्षांचें असेल. त्याच्या पाठची बहीण ब्रोनिस्लाव व तिच्या पाठची हेलेन. पण पोलंडमध्यें टोपण नांवाची हौस फार. त्यामुळें या मुलींना 'ब्रोन्या' व 'हेला' असेंच सारीं म्हणत. मेरीला न्यावयास आलेली मुलगी म्हणजे त्या सर्वांची थोरली बहीण. तिचें मूळचें नांव सोफी. पण सर्वांच्या तोंडीं रूढ झालेलें नांव 'झोशिया.'

मन्या खोलींत आली ती हिरमुसली होऊनच. त्यांतच तिची आई कामांत दंग झालेलीं. तिचे वडील आराम खुर्चीवर पडून तिच्या आईशीं कांहीं तरी कुजबुजत होते. त्यांच्या चर्येवर गंभीरता पसरली होती. मेरीच्या मातेस ते सांगत असलेला प्रसंग तसाच गंभीर होता. त्यांचा वरिष्ठ रशियन

अधिकारी इव्हॅनॉव याची मुलगी तापानें अत्यवस्थ होती. त्या वेळीं शाळेंतलीं कांहीं मुलें जवळच्या प्रार्थनामंदिरांत गेलीं, आणि 'आमच्याकरितां देवाची प्रार्थना कर' म्हणून धर्मगुरूला त्यांनीं गळ घातली. प्रार्थनेचा हेतु मात्र त्यांनीं त्याला सांगितला नाहीं. प्रार्थना संपल्यावर त्यास समजलें कीं इव्हॅनॉवची मुलगी देवानें न्यावी म्हणून ही प्रार्थना होती! छेः छेः, केवढा राजद्रोह आपल्या हातून घडला! या विचारानें त्या गरीब बिचाऱ्या धर्मगुरूचें धाबें दणाणलें होतें. पण त्या अजाण बालकांना मृत्यु काय आणि राजद्रोह काय, दोन्ही सारखींच अज्ञात. कोणीकडून तरी जुलमी माणसाला देवानें शिक्षा करावी एवढीच त्यांची अपेक्षा. आणि एखाद्याची आवडती वस्तु हिरावून घेणें यासारखी त्यांच्या दृष्टीनें मोठी शिक्षा ती कोणती?

ही गोष्ट ऐकून धर्मशील स्क्लोडोवस्का बाईचें अंग थरारलें. हातांतलें काम हातांतच ठेवून त्या आपल्या पतीच्या मुखाकडे पाहात राहिल्या. इव्हॅनॉवच्या जुलमाला सर्वच कंटाळले होते. मुलें तर त्याला 'समंध'च म्हणत, हेंहि स्क्लोडोवस्का बाईंना ठाऊक होतें. पण दडपलेली चीड अशी अन्य मार्गानें उफाळून प्रकट होईल याची त्यांना कल्पना नसावी. त्यामुळें त्यांच्या मनाला हादराच बसला.

मेरी ऊर्फ मन्या आंत येतांच स्क्लोडोवस्का बाई लगबगीनें उठल्या. मन्याला त्यांनीं जवळ घेतलें. तिच्या तोंडावरून हात फिरविला. तिचे विस्कटलेले केस त्यांनीं सारखे केले. तिच्या कपड्यावरची धूळ झटकली. प्रेमभरानें तिला पोटाशीं धरून तिच्या कुरळ्या केसांतून नेहमींप्रमाणें आपलीं नाजूक बोटें दोनचारदां फिरवलीं. अशा गोड अपत्याचें चुंबन मात्र त्यांनीं घेतलें नाहीं. आपणांस क्षयाची भावना झाली आहे हें कळल्यापासून त्या सुजाण मातेनें ह्या वात्सल्यसौख्यावर पाणी सोडलें होतें!

"माझ्या छकुलीला छान छान बूट हवा ना?" असें म्हणून त्यांनीं मन्याला हलकेच दूर केलें व त्या काम करावयास येऊन बसल्या. "तुला गाई येते का? जा, ताई तुला झोंपवील." असें म्हणून त्यांनीं मन्याला झोंपविण्यास

नेण्याला झोशियाला सांगितलें. पण मन्याला झोंप येत नव्हती. ती आई-जवळच उभी होती. आईचीं लांब लांब बोटें कशीं झपाझप बूट शिवत होतीं. ते ती टक लावून पाहात होती. मधूनच ती पुस्तकांच्या कपाटांकडे आशाळभूतपणें चोरून पाही. शेवटीं तिनें मोठा हिय्या करून आईस विचारलें, "आई, मी गोष्ट वाचूं?" पण छे, मन्याला पुस्तक वाचायला संधि द्यावयास कोणीच तयार नव्हतें; आणि याला कारण तिनें केलेला विक्रम!

एका दुपारची गोष्ट. प्रा. लादिस्लाव मुलांना जवळ घेऊन त्यांचा अभ्यास घेत होते. ब्रोन्याची वाचनाची चांचणी घेण्यासाठीं तिला त्यांनीं एक धडा काढून दिला. पण ब्रोन्या वाचतांना अडखळूं लागली. एकेका अक्षरावर बोट ठेवून तें उच्चारूं लागली. तें तिचें ट-ट, प-प करीत रडत-खडत चाललेलें वाचन बघून मन्या पुढें झाली. बहिणीच्या हातांतील पुस्तक तिनें जवळ जवळ ओढूनच घेतलें आणि धडा खडाखड वाचून दाखविला! मन्यानें हें ज्ञान संपादिलें कुठून? वास्तविक ब्रोन्यानेंच तिला अक्षर-ओळख करून दिली होती. पुठ्ठयांचीं कापलेलीं अक्षरें जुळवून सोपे सोपे शब्द त्या दोघी जुळवीत. मन्याची ती धारणाशक्ति पाहून सर्वजण स्तिमित झाले. क्षणभर खोलींत शांतता पसरली. आपल्याकडे अशीं सारींजण कां पाहात आहेत हें मन्याला कळेना. ती जरा बावरून गेली. लगेच आईच्या अंगाला बिलगून जरा रडव्या सुरांत तिनें आईला विचारलें, "आई, चुकलें का ग मी!" आईनें तिला पोटाशीं धरून व मंदस्मित करून उत्तर दिलें, "नाहीं रे मन्युसा; आमची मन्युसा किती किती शहाणी आहे हो." त्या वेळीं मन्या अवघी चार वर्षांची होती.

पण तेव्हांपासून मन्याला वाचायला कुणी फारसें प्रोत्साहन दिलें नाहीं. एवढ्या लहानग्या वयांत तिनें पुस्तकांत डोकें खुपसून बसावें असें तिच्या जाणत्या मातापित्यांस वाटत नव्हतें. हें वय म्हणजे फुलपांखरासारखें स्वच्छंदानें नाचाबागडायचें वय. मोकळ्या हवेंत—बागेंत खेळावें, फुलांची—पांखरांची मौज पाहावी, धावावें, उड्या माराव्यात, बडबड करावी, आपली

जिज्ञासा वाढवावी आणि निसर्गाच्या सान्निध्यांत ज्ञानेंद्रियाचा व शरीराचा स्वाभाविक विकास होऊं देण्याचें तें वय. त्या वेळीं या छोट्या बालिकेनें एका जागीं वसून व डोळे ताणून डोळ्यावर कांहीं ओझें घ्यावें, अशी तिच्या आई-वडिलांची मुळींच इच्छा नव्हती.

त्यामुळें मन्यानें पुस्तकाचें नांव काढतांच स्क्लोडोवस्का बाईनें तिचें लक्ष दुसरीकडे वळविण्याचा यत्न केला. " आम्हांला एक छानसं गाणं म्हणून दाखव ना ! " पण गाणें म्हणावयाची मन्याची लहर नव्हती; तिचा जीव मुलें खेळत होतीं तिकडे ओढ घेत होता. बाहेर कसें निसटतां येईल याची ती संधि पाहात होती. दरवाजाबाहेर दृष्टि लावून ती हलकेच म्हणाली, " मी झोशियाताईला बघूं ? ती बागेंत असेल नाहींतर." तिच्या आईच्या हें पथ्यावरच होतें. ती लगेच म्हणाली, " जा हिंडून ये बागेंत. अन् ताईला म्हणावं, मला गोष्ट सांग छानदार ! "

मन्याचें आणि झोशियाचें अगदीं मेतकूट जमे. झोशिया गोष्टी सांगण्यांत पटाईत होती. तिच्यासारखी गोष्ट सांगणें घरांत कोणालाच जमत नसे. ती आपल्या भावंडांना निरनिराळ्या गोष्टी अगदीं रंगवून सांगे. कधीं त्यांत स्वतःची भर घालून ती नव्याहि जुळवी. गोष्ट सांगतांना ती अगदीं तद्रूप होई. निरनिराळ्या पक्ष्यांचे व प्राण्यांचे आवाज काढावयाचे, गोष्टींतल्या पात्रांचे हावभाव करून दाखवावयाचे, या तिच्या वैशिष्ट्यामुळें त्या गोष्टींना नाट्यमय स्वरूप आपोआपच मिळे. त्यामुळें ऐकणाऱ्या मुलांना मोठी मौज वाटावयाची. गोष्टी सांगून कंटाळा आला कीं सुटींत केलेल्या सहली, मामांच्या—काकांच्या घरच्या सुटींतल्या गमती यांची चर्चा त्यांच्यांत चाले. मन्याची स्मरणशक्तीहि तीव्र होती. तिच्या बालबुद्धीवर चित्रित झालेल्या प्रसंगांचें स्मरण देऊन ती संभाषणाला चालना देई आणि जुन्या आठवणींचा गोड मेवा चघळण्यांत त्या रंगून जात.

मन्या बागेंत जाऊन परतली. पण आईचें आपलें काम चालूच होतें. खुर्चीत लवंडलेले प्रा. लादिस्लाव कसल्या तरी गहन विचारांत मग्न झालेले

दिसत होते. त्यांच्या चेहऱ्यावरच्या गांभीर्यामुळें त्यांच्या अंगावर चढून धिंगामस्ती करण्याचा अवखळ विचार मन्याला तसाच सोडावा लागला.

तिनें खोलीभर आपली भिरभिरती नजर फिरवली. ती खोली तिच्या रोजच्या परिचयाची होती. रोजचीच टापटीप व व्यवस्था तींत आज होती. पण मन्याला गूढ वाटणाऱ्या कांहीं गोष्टी तेथें होत्या. घरांतली बैठकीची सर्वांत सुंदर अशी ती खोली होती. सामानसुमान मोजकें व वेंचक होतें, पण तें जागच्या जागीं व्यवस्थित लावलेलें. खोलींत कोणाचेंहि लक्ष वेधून घेईल अशी एक धर्मगुरूची भव्य तजबीर सोनेरी चौकटींत विराजमान झाली होती. दुसऱ्या बाजूला एक टुमदार ठेवलेला निळा पेला खोलीची शोभा वाढवीत होता. त्याच्यावरील अठराव्या लुईचें चित्र भारी मोहक होतें. पण या वस्तूंकडे मन्याचें लक्ष क्वचितच जात असे. यापेक्षां तिला प्यार असणारी वस्तु म्हणजे हिरव्यागार पत्र्यानें मढविलेलें व अखंड टिकटिकणारें सुंदरसें घड्याळ. पण तिच्या बालमनाला भुलवून गुंगवून टाकणाऱ्या वस्तु म्हणजे भिंतीवर टांगलेलें हवामापक यंत्र आणि चकचकणाऱ्या कांचनलिका, चिमटे, निरनिराळ्या धातूंचे नमुने व इलेक्ट्रोस्कोप इत्यादि वस्तु सुव्यवस्थित लावून ठेवलेलें एक कपाट. हीं कांहीं तरी गमतीदार खेळणीं असावींत, असेंच त्या बालिकेस वाटे. लोभी नजरेनें ती कितीदां त्यांच्याकडे पाही. एकदां मोठा धीर करून जेव्हां तिनें वडिलांना त्याजबद्दल विचारलें, तेव्हां ते म्हणाले होते, "प्रयोगांचीं उपकरणीं आहेत बरं का तीं ! खेळणीं नव्हत, उपकरणीं." त्या भावी शास्त्रज्ञाला त्यापासून काय शोध झाला असेल, कुणास ठाऊक. पण खोलींतून जातांना एखाद्या गाण्याच्या चालीवर ती स्वतःशींच गुणगुणत होती 'उपऽकरणींऽऽ.'

## घरचें वळण : : २

मेरीच्या मायभूमीचें नांव पोलंड.

जगाच्या इतिहासांत या देशाइतके अत्याचार दुसऱ्या एखाद्या देशावर क्वचितच झाले असतील. या राष्ट्राच्या लोभानें युरोपमध्यें अनेक लढाया झाल्या. नकाशाचे रंग अनेकदां बदलले. देशाचीं अनेक शकलें उडालीं. पण पोलिश लोकांच्या चिवट वृत्तीमुळें, पोलिश तरुणांच्या असामान्य त्यागामुळें, आणि पोलिश देशभक्तांच्या स्वातंत्र्यप्रेम, संघटनाचातुर्य व शौर्य इत्यादि गुणांमुळें पोलंड टिकून राहिलें. चिरपददलित पण स्वातंत्र्य-लालस म्हणून पोलंडचें नांव युरोपच्या इतिहासांत चिरस्मरणीय झालें आहे.

मेरीच्या पितृवंशाचें उपनांव स्क्लोडोवस्की हें होय. वॉर्सोच्या उत्तरेस 'स्क्लोड' नांवाचें एक लहानसें खेडें आहे. तेथें या घराण्याची पूर्वापार वसति होती. इतर पोल लोकांप्रमाणेंच शेतीभातीवर त्यांचा निर्वाह चाले. पण पोलंडवर आलेल्या परचक्रामुळें शेतकऱ्यांची वाताहात झाली. अनेक कुटुंबें देशोधडीला मिळालीं. याच परिस्थितींत मेरीचे आजोबा जॉन स्क्लोडोवस्की यांनीं नांगर टाकून लेखणीचा आश्रय केला. त्यांनीं गणित व पदार्थविज्ञान यांचा बराचसा अभ्यास अनेक संकटांना न जुमानतां पार पाडला. वॉर्सोत त्यांनीं आपलें बिऱ्हाड टेकलें. प्रतिष्ठित मध्यमवर्गीयांत

त्यांची गणना होऊं लागली. त्यांनीं आपला मुलगा लादिस्लाव — मेरीचे वडील — यांस खूप शिकविलें. लादिस्लाव यांनीं पीटर्सवर्ग विद्यापीठांत गणित व भौतिकशास्त्रें यांचा अभ्यास केला. त्याचबरोबर जर्मन, लॅटिन इत्यादि भाषांचाहि चांगला अभ्यास केला होता. पण त्यांना विशेष आवड होती ती शास्त्रीय विषयांची. शिक्षण संपतांच त्यांनीं शिक्षकाचा पेशा स्वीकारला.

मेरीच्या मातृकुलाचा इतिहासहि असाच रोमहर्षक होता. मेरीच्या मातुल घराण्याचें नांव बोगस्की असें होतें. मेरीचे आजोबा फेलिक्स बोगस्की एक लहानसे वतनदार होते. स्वतःची शेतीवाडी जेमतेम असल्यानें इतरांच्या शेतीवाडीची व्यवस्था पाहून ते आपल्या उत्पन्नांत भर घालीत. त्यांची पत्नी उच्चकुलीन घराण्यांतील स्त्री होती. तिच्या वडिलांच्या संमतीविरुद्ध त्यांनीं तिच्याशीं गुप्तपणें विवाह करण्याचा निश्चय केला. तीहि मुलगी प्रेमाखातर एका शेतकऱ्याशीं विवाह करण्यासाठीं घरादाराचा त्याग करावयास सिद्ध झाली.

बोगस्की यांच्या सहा अपत्यांत मेरीची आई सुस्वरूप बालिका होती. सडपातळ बांधा, विपुल केशसंभार आणि रेखीव कमानदार भुंवया यामुळें ती सर्वांच्या डोळ्यांत भरे. ती जात्याच हुशार होती. वॉर्सातील एका खाजगी शाळेंत तिचें शिक्षण झालें. बौद्धिक शिक्षणाबरोबरच अनेक कलाकौशल्यांतहि तिनें प्रावीण्य संपादन केलें. शिक्षण संपल्यावर तिनें अध्यापनाच्या कार्यास स्वतःस वाहून घेतलें. एका मुलींच्या शाळेंत साधी शिक्षिका म्हणून तिनें प्रथम नोकरी धरली. पण अंगच्या गुणावर हळूहळू चढत तिनें प्राध्यापिका व संचालिका म्हणून मानाचें स्थान मिळविलें. मेरीचे वडील प्रा. लादिस्लाव स्क्लोडोवस्की यांनीं तिला विवाहाविषयीं विचारलें,त्यावेळीं ती संचालिका म्हणून शाळेचें काम पाहात होती. विवाहानंतरहि जवळ जवळ बारा वर्षे तिनें हें काम केलें; पण मेरीच्या जन्मानंतर प्रा. लादिस्लाव यांना नोकरींत बढती मिळाली. दुय्यम तपासनीस

अधिकारी म्हणून त्यांची नेमणूक झाली. त्यांना राहावयास सरकारीं जागा मिळाली. तेव्हां शाळा लांब पडूं लागल्यानें व प्रकृतिमान नीट राहूं न लागल्यानें तिला आपल्या नोकरीचा राजीनामा देणें भाग पडलें. आपला आवडता व्यवसाय सोडतांना मेरीच्या मातेस खूपच वाईट वाटलें.

आजपर्यंत नोकरी सांभाळूनहि स्क्लोडोवस्का बाईंनीं गृहप्रपंच दक्षतेनें केला होता. नोकरी सुटल्यावर तर त्यांत त्या अधिकच लक्ष घालूं लागल्या. आपल्या पतीचा भार हलका व्हावा म्हणून त्या झटत. सारें शिवणकाम घरींच करीत. कातडी जोडे बनविण्याची कलाहि त्यांना उत्तम अवगत होती. आपल्या मुलांच्या जोपासनेकडे त्या आस्थापूर्वक बघत. स्वतः भाविक व श्रद्धाळू वृत्तीच्या असल्यानें आपलीं मुलेंहि सात्त्विक व धर्मशील व्हावींत अशी त्या दक्षता घेत. त्यांना गायनवादनाचीहि हौस होती. त्या पियानो उत्कृष्ट वाजवीत. घरांतलें वातावरण सात्त्विक, कलात्मक आणि संस्कारी राखणें ही प्रामुख्यानें स्त्रियांची जबाबदारी असते. मुलांच्या शिक्षणाच्या व मनोविकासाच्या दृष्टीनें अशा वातावरणाला फार महत्त्व असतें. मेरीच्या मातेनें हें महत्त्व ओळखलें होतें असें म्हणावयास हरकत नाहीं.

मेरीचे वडील प्रा. लादिस्लाव एक साधे शिक्षक असले तरी ते एक माणिक होते. ते पट्टीचे विद्वान् होते. पोलंडच्या परवशतेच्या शापामुळें त्यांच्यासारख्यांचें चीज झालें नसलें तरी त्यांची विद्वत्ता त्यांचा छात्रगण चांगल्या प्रकारें जाणीत होता. त्यांची ज्ञानलालसा प्रशंसनीय व अनुकरणीय होती. ते मोठे भाषापंडित होते. पोलिश आणि रशियन भाषा जितक्या सफाईनें ते बोलत व लिहीत, तितक्याच सहजतेनें ते जर्मन, फ्रेंच, इंग्लिश या युरोपमधील प्रमुख भाषा आणि लॅटिन व ग्रीक या अभिजात भाषा बोलत व लिहीत. भाषाविषयाइतकाच किंबहुना :अधिकच शास्त्र-विषय त्यांचा जिव्हाळ्याचा होता. त्यांचा गणित, पदार्थविज्ञान व :रसायन या विषयांचा व्यासंग कॉलेजच्या शिक्षणाबरोबर विराम पावला नाहीं. उलट या विषयांतील आपलें ज्ञान अद्ययावत् राखण्याचा ते शिकस्तीनें यत्न करीत.

या विषयांवर प्रसिद्ध होणारीं मासिकें व पुस्तकें ते परिश्रमानें मिळवीत; आणि फुरसतीच्या वेळांत त्यांचें अध्ययन करीत. इतकेंच नव्हे तर त्यांनीं आपल्या अल्पशा वेतनांतला कांहीं हिस्सा खर्च करून आपल्या घरकुलांत छोटीशी प्रयोगशाळाहि सजविली होती. आपल्या मोजक्याच का होईना पण त्या उपकरणांनीं ते प्रयोग करीत, आणि वाचलेलें पुस्तकी ज्ञान पडताळून पाहात. स्वातंत्र्यलालस राष्ट्रांतील निर्धन शिक्षकाची ही ज्ञान-लालसा त्या राष्ट्राच्या भावी यशाची निदर्शकच नव्हे तर काय ?

प्रा. लादिस्लाव दिसावयाला गंभीर दिसत; त्यांच्या रुबाबावरूनच ते कडक व शिस्तीचे भोक्ते असल्याचा ग्रह होई. त्यांची प्रत्येक कृति व हालचाल यांत पद्धतशीरपणा व रेखीवपणा तसेंच भारदस्तपणा असावयाचा. जसा पोषाख, तसेंच भाषण. तीच गोष्ट लेखनाची. त्यांचें अक्षर वळणदार होतें. शब्दांचा भारदस्तपणा व विचारांची रेखीव, तर्कशुद्ध मांडणी यांवर त्यांचें लक्ष असे. आपल्याकडील अव्वल इंग्रजींतील सुविद्य गृहस्थांचीच आठवण त्यांची राहणी, विचारसरणी पाहून व्हावयाची. त्यांच्या सान्निध्यांतील व्यक्तींवर या साऱ्यांचे संस्कार न उमटले तरच नवल.

प्रा. लादिस्लाव स्वभावानें गंभीर असले तरी त्यांच्या वागणुकींत प्रेमळपणा बराच होता. आपल्या मुलांबाळांत ते मिसळत. प्रत्येक शनिवारीं मुलांना जवळ बसवून कांहीं तरी वाचून दाखविण्याचा त्यांचा परिपाठ होता. कधीं गद्य उतारे तर कधीं कविता, यांचें वाचन चालावयाचें. वक्तृत्वाची कला त्यांना अवगत होती; आणि त्याला भाषाप्रभुत्वाची जोड मिळाली होती. डेव्हिड कॉपरफील्ड किंवा तसलेंच एखादें इंग्रजी पुस्तक समोर धरून त्याचा ते पोलिश भाषेंत अस्खलितपणें अनुवाद करून आपल्या मुलांना सांगत. मुलें लहान होतीं तोंपर्यंत कल्पित व पौराणिक गोष्टी हाच त्यांच्या वाचनाचा विषय होता. पण मुलें मोठीं झाल्यावर पोलंडच्या क्रान्तिकारक लेखकांचीं पुस्तकेंहि ते वाचून दाखवूं लागले. झारनें जप्त केलेल्या आणि गुप्ततेनें जतन केलेल्या जीर्ण पुस्तकांचाहि

त्यांत समावेश असावयाचा. अशा रीतीनें जिवन्त संस्कारांचें बाळकडू लाभणें हें भाग्य तर खरेंच.

अधूनमधून आपल्या मुलांस बरोबर घेऊन प्रा. लादिस्लाव सहलीसाहि जात. पण ही सहल म्हणजे उगीचच मोकळ्या हवेंत स्वैर भटकणें किंवा खिदळणें, हुंदडणें नसे. सहलीचा कार्यक्रम योजनाबद्ध असावयाचा. कोठें काय पाहावयाचें, याची यादी ते आगाऊ तयार करीत. ठरल्या वेळीं ठरल्या ठिकाणीं ते जाऊन पोहोंचत. प्रेक्षणीय स्थळें, इमारती, देखावे, यांजकडे ते मुलांचें लक्ष वेधून घेत. त्यांत बघावयाचें काय हें मुलांना स्पष्ट करून सांगत. कधीं सृष्टिसौंदर्याचें रहस्य त्यांना उलगडून दाखविण्याचा यत्न करीत; तर कधीं त्या त्या स्थळाची ऐतिहासिक माहिती त्यांना समजावून सांगत.

अशा संस्कारी वातावरणांत—कर्तव्यदक्ष, स्वावलंबी, प्रेमळ मातापित्यांच्या छायेंत—वावरावयास मिळाल्यानें मेरी व तिचीं थोरलीं भावंडें यांच्या चारित्र्याची, अन्तरंगाची घडण इष्ट त्या दिशेनेंच होत होती. पण ह्या कुटुंबाच्या आनंदी वातावरणाचा दैवाला हेवा वाटल्यानेंच कीं काय दुःखाच्या काळ्या सांवल्या हळू हळू त्यावर पसरूं लागल्या.

× × ×

या दुःखपरंपरेला आरंभ मेरीच्या आईच्या आजारपणापासून झाला. मेरीच्या जन्मापासून स्क्लोडोवस्का बाईंना क्षयाची भावना जडली होती. पण नियमितपणा व पथ्य यांच्या जोरावर इतके दिवस त्यांनीं कसेंबसें निभावून नेलें. १८७३ मध्यें मात्र—म्हणजे मन्या पांच वर्षांची असतांना हें दुखणें विकोपाला गेलें. स्क्लोडोवस्का बाईंना 'नाईस' येथें हवा पालटण्यासाठीं तिची थोरली बहीण झोशिया हिच्यासह पाठविण्यांत आलें. मातेचा व बहिणीचा हा पहिलाच वियोग मेरीस खूपच जाणवला.

१८७३ च्या हिंवाळ्यांत स्क्लोडोवस्की कुटुंबावर दुसरी आपत्ति कोसळली. प्रा. लादिस्लाव यांजवर वरिष्ठ अधिकाऱ्याची इतराजी झाली.

त्यांचा दुय्यम ‘ तपासनीस ’ हा हुद्दा काढून घेण्यांत आला. शाळेच्या आवारांत राहावयास दिलेली जागा सोडण्याचा त्यांना हुकूम झाला आणि त्यांच्या पगारांतहि कपात करण्यांत आली.

या अनर्थाच्या मुळाशीं प्रा. लादिस्लाव यांचा स्वाभिमान व स्पष्टवक्तेपणा हे गुण होते. पोलिश मुलांच्या रशियन लेखनांत दोष धुंडणाऱ्या आपल्या वरिष्ठाला, ‘महाराज, आपली मातृभाषा रशियन असूनहि आपल्या लेखनांत प्रमाद असतातच,’ असें बाणेदार उत्तर देण्याचें धाडस प्रा. लादिस्लाव यांनीं दाखविलें होतें, त्याचें हें प्रायश्चित्त होतें.

याचा परिणाम आधींच जेमतेम सांभाळलेली आर्थिक परिस्थिति ढासळण्यांत झाला. त्यांना वरचेवर घरें बदलावीं लागलीं. त्यांना खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठीं घरांत कांहीं विद्यार्थ्यांची जेवणा–राहण्याची सोय करून घराची खानावळ बनवावी लागली. त्यामुळें घरांतील शांतता व कुटुंबियांतील सलगीचे संबंध, मोकळेपणा व घरगुती वातावरण यांजवर गदा आली. तशांतच स्क्लोडोवस्का बाईंच्या आजारपणाचा खर्च चालूच होता; आणि दुष्काळांत तेरावा महिना म्हणून कीं काय प्रा. लादिस्लाव यांनीं आपल्या मेहुण्याच्या नादीं लागून एका उद्योगांत घातलेली, पै पै करून जमविलेली रक्कम बुडाली. या व्यवहारांत त्यांना थोडीथोडकी नाहींतर तीस हजार रुबल्सची ठोकर बसली. आपत्ति येतात त्या एकट्या कधींच येत नाहींत हेंच खरें !

यांतून हें कुटुंब कसेंबसें डोकें वर काढतें न काढतें तोंच काळानें आपली वक्रदृष्टि त्याजकडे फिरवली. १८७६ च्या जानेवारींत घरांत राहणाऱ्या एका विद्यार्थ्याला झालेल्या विषमज्वराच्या संसर्गानें झोशिया व ब्रोन्या दोघीहि आजारी पडल्या. एका खोलींत अस्थिपंजर झालेली त्यांची आई बिछान्यावर खोकल्याच्या ढासीनें विव्हळत पडली होती. दुसऱ्या खोलींत या दोन मुली तापानें तडफड तडफड करीत होत्या. काळजीनें सर्वांचे चेहरे काळवंडले होते. एक एक दिवस युगासारखा जात होता. ताप

उतरण्याची सर्वजण वाट बघत होते. नित्याप्रमाणें म्हणण्यापेक्षां यंत्राप्रमाणेंच म्हणणें बरें—जोसेफ व मेरी शाळेंत गेलीं होतीं. दुपारीं प्रा. लादिस्लाव ह्यांना घरीं नेण्यांत आलें. झोशिया—कुटुंबांतली थोरली मुलगी मन्याची गोष्टीवेल्हाळ बहीण—देवाघरीं गेली होती!

—आणि ही दुःखद आठवण बुजते न बुजते तोंच मातृवियोगाचा दुर्धर प्रसंग मेरीवर कोसळला!

मेरीला आपली आई म्हणजे परब्रह्म वाटत होतें. तिच्या विश्वासाचें, प्रेमाचें, कौतुकाचें तिची आई म्हणजे एकमेव निधान होतें. आपल्या आईला बरें वाटावें म्हणून तिनें देवाला परोपरीनें आळविलें. एकदां एका प्रसिद्ध प्रार्थनामंदिरांत आपल्या मावशीबरोबर ती गेली असतां, तिनें देवाची करुणा भाकली होती कीं, " देवा, माझें आयुष्य माझ्या आईस दे. पण तिला बरें कर!"

थोरल्या मुलीच्या मृत्यूनंतर स्क्लोडोवस्का बाई अधिकच खंगल्या. आपली आई आतां दुखण्यांतून उठत नाहीं याची मेरीला कल्पना येऊन चुकली. ९ मे १८७८ या दिवशीं स्क्लोडोवस्का बाईंनाच आपली अखेरची घटका समीप आल्याचें कळून चुकलें. प्रा. लादिस्लाव यांना जवळ बोलावून "आतां डॉक्टरांची गरज नाहीं, धर्मोपाध्यालाच बोलवा," म्हणून त्यांनीं सांगितलें. मरते समयीं आपल्या चित्तास शांतता लाभावी म्हणून आपल्या पंथाप्रमाणें धार्मिक विधि व प्रार्थना केल्या. तरीहि आपला पति व चार मुलें—त्यांत लाडकी मन्या तर दहा वर्षांची—यांना मागें ठेवून जातांना त्या माउलीचें चित्त व्याकुळ झालेंच. पण आपल्या वेदना मात्र त्यांनीं कोणास दिसूं दिल्या नाहींत. सर्वांना बिछान्याभोंवतीं बोलावलें. आपल्या खोल गेलेल्या डोळ्यांनीं सार्‍यांचीं उदासवदनें न्याहाळलीं. क्षीण आवाजांत प्रत्येकाशीं दोन शब्द बोलून सर्वांचा निरोप घेतला. आपल्या निर्जीव हातांनीं अखेरची एक हालचाल केली. क्रॉसची खूण करून सर्वांचें कल्याण

चिंतिलें. ‘ मला विसरूं नका ’ असें पुटपुटत असतांच त्यांची प्राणज्योत मालवली.

मेरीला सारें उदास, भकास वाटूं लागलें. जगरहाटी फार निर्दय आहे, क्रूर आहे, याचा तिला प्रत्यय आला. झोशिया गेली. आईहि सोडून गेली. या कोमल वयांत हे दोन धक्के तिला जबर होते. ती अकालीं कांहींशी प्रौढ बनली. आपलें दुःख मात्र ती कोणाजवळ बोलत नसे. स्वभावानें ती प्रथमपासूनच अबोल आणि अभिमानी होती. आपल्या प्रार्थना परमेश्वरानें ऐकल्या नाहींत म्हणून तिला राग आला होता कीं काय न कळे ! पण एवढें खरें कीं नित्याप्रमाणें प्रार्थना करतांना तिचें लक्ष प्रार्थनांकडे लागत नसे. आपल्या दोन आवडत्या, सुंदर व प्रेमळ माणसांना अकालीं निर्दयतेनें व अन्यायानें उचलून नेणाऱ्या परमेश्वराविरुद्ध तिचें मन बंड करूं पाहात होतें.

घरांतल्या या विचित्र वातावरणांत लहानग्या मेरीचे दिवस मोठे चमत्कारिक रीतीनें जात होते. त्या वेळीं वाचनाचा तिला खूप नाद जडला. तें एक तिच्या जिवाला विरंगुळ्याचें साधन झालें. मेरी एकदां वाचनांत गढली कीं भोंवतालचें जग विसरून जाई. घरांतल्या आजारपणाचा तिला विसर पडे. मृत आईची स्मृति घटकाभर लोपून जाई. वडिलांचा दुःखीकष्टी चेहरा तिच्या नजरेआड होई. तिच्या बालमनांत माजणारें धर्म, ईश्वर इत्यादींबद्दलचें काहूर शांत होई. कुठल्या तरी निरागस सात्त्विक आनन्दाच्या सृष्टींत विहरत असल्याचा तिला अनुभव येई. क्षुद्र वासनांच्या सृष्टींतून निघून उच्च वातावरणांत तिचें मन वावरूं लागे. थोडक्यांत,

“ सुंदरतेच्या मोहनांत मन आमुचेंहि नाचे,
बंधहि होती शिथिल, हरपतें भानहि जगताचें ”

अशी तिची अवस्था होई.

मेरीची धारणाशक्ति विलक्षण होती. एखादी गोष्ट किंवा कविता एकदोन वेळां वाचतांच तिच्या लक्षांत राही, त्यामुळें अभ्यासाला तिला फारसा वेळ लागत नसे. आणि त्यामुळें अवान्तर वाचायला भरपूर वेळ मिळत असे. जें जें हाताला येईल तें तें ती अधाशीपणें वाचून काढी. एकदां वाचनांत तंद्री लागली कीं, जवळपासच्या गलक्यानें तिची वाचनसमाधि भंग पावत नसे. तसें पाहिलें तर तिच्या घरांत शांतता क्वचित् नांदावयाची. घरीं शिकावयास ठेवलेल्या विद्यार्थ्यांच्या सकाळ-संध्याकाळ चालू असलेल्या एकसुरी कंटाळवाण्या घोकंपट्टीनें घरांतलें वातावरण घोंघावत असायचें. सायंकाळीं एकदां जेवणें आटोपलीं कीं दिव्याभोंवतीं मुलें गोळा होत. कोणी इतिहासांतल्या सनावळ्या घोकतो आहे, तर कोणी कविता पाठ करतो आहे. कोणी भूमितींत डोकें खुपसून बसला आहे, तर कोणी बीजगणितांतील अवयवाशीं झटापटी करतो. हा सारा अभ्यास परक्या भाषेंतून, रशियनमधून चालावयाचा. लॅटिन किंवा रशियन भाषेच्या दुर्बोधतेमुळें मुलांचा जीव बेजार होऊन तीं मेटाकुटीस यावयाचीं. भाषेचा उच्चार नीट येवो न येवो, घोकंपट्टी करणें भाग पडावयाचें. प्रा. ल्लादिस्लाव यांनीं कवितेचा अर्थ, उदाहरणाची रीत पोलिश भाषेंत स्पष्ट केली कीं त्यांना तें सारें चटकन् समजे; पण पाठांतरासाठीं पुनः जेत्यांच्या भाषेचें जूं मनावर आलें कीं जीव दडपून जावयाचा. अशा या वातावरणांतहि वाचनाला लागणारी मनाची एकाग्रता मेरीनें प्राप्त केली होती. तिला या गोंगाटाचा कधींच उपसर्ग पोहोंचत नसे.

तिच्या वाचन-तंद्रीबद्दल एक मजेदार गोष्ट प्रसिद्ध आहे. एका दुपारीं ती टेबलाजवळ वाचीत बसली होती. टेबलावर कोपर ठेवून आणि हातावर हनुवटी टेकून ती वाचनांत गढली होती. नित्याप्रमाणें हाताच्या बोटांनीं तिनें कान झाकून घेतले होते. तिच्या भावंडांच्या मनांत तिची गंमत करण्याचा एक अवखळ विचार आला, आणि त्यांनीं तो तडीसहि नेला. खोलींतील खुर्च्या गोळा करून तिच्या दोन्ही बाजूंस शिड्यांप्रमाणें एकावर

एक रचून ठेवल्या. मन्याला याचा पत्ताहि नाहीं. पुस्तकाचें वाचन संपल्यावर तिनें मान वर केली. ती उठूं लागतांच तिच्या धक्क्यानें सगळ्या खुर्च्या धड्धड् खालीं कोसळल्या. सर्वजण खो खो करून हंसूं लागलीं. मेरी कदाचित् रागानें खुर्ची फेकील म्हणून तिच्या वहिणी खुर्च्यांआड झाल्या. मेरी शांत होती. पण बहिणींची चेष्टा तिला रुचली नाहीं. झोपेंतून जागा झालेल्या माणसाप्रमाणें डोळे चोळीत, अंगाला आळोखेपिळोखे देत ती उठली व आपल्या भावंडांकडे एक कटाक्ष फेकून एवढेंच उद्गारली, "शोभतं का तुम्हांला हें?"

शास्त्रीय संशोधनाला लागणाऱ्या मनाच्या एकाग्रतेची सिद्धि मेरीनें या वयांतच प्राप्त करून घेतली होती.

• • •

## शालेय जीवनांतील स्मृति : : ३

शालेय जीवनांतील प्रत्यक्ष प्रसंग कसेहि असोत, त्यांच्या आठवणी नेहमींच रम्य आणि मधुर वाटतात. त्या कालांतील रोमांचकारी धाडसें, मोठ्यांची फजिती, मित्रमैत्रिणींचा खट्याळपणा, रुसवे-फुगवे आणि अबोले, त्या काळांतल्या सहली, स्नेहसंमेलनें आणि त्या निमित्तानें झालेल्या झटापटी आणि आटापिटा, सारेंच कांहीं गोड वाटतें. त्या दशेंतील प्रसंगांची स्मृति हृदयांत चिरंतन राहावी अशी मनाची ठेवणच आहे कीं काय न कळे! वयाचा अल्लडपणा, क्रीडामय वातावरण, प्रतिक्षणीं विशाल होत जाणारें भोंवतालचें क्षेत्र आणि जबाबदारीचा अभाव, यामुळें तो आनंद निर्भेळ तसाच वर्धिष्णु असतो. नवे सवंगडी, नवे शिक्षक आणि नवनवे अनुभवाचे प्रसंग—सारेंच नवें. त्या नवलाईची झिलई कमी करणारे कांहीं कटु प्रसंग असलेच तरी त्यांची कटुता समवयस्क मित्रमैत्रिणींच्या मनमोकळ्या स्वैरालापांत केव्हांच विरून जाते. आणि म्हणूनच ‘ते हि नो दिवसा गताः’ म्हणून साभिलाष पण उदास नजरेनें या कालाकडे मोठीं माणसेंसुद्धां पाहात असतात!

मेरीचें जीवन याला अपवाद नाहीं. पण तिच्या जीवनांतील वैयक्तिक सुखदुःखांवर देशाच्या राजकीय परिस्थितीचा ठसा उमटला आहे. त्यामुळें

त्यांना एक विशिष्ट महत्त्व आलें आहे. पुढील दोनतीन प्रसंग तिच्या अंतःकरणावर कायमची छाप ठेवून गेले आहेत.

*  *  *

त्या वेळीं पोलंडमध्यें पोलिश भाषेला मज्जाव होता; आणि स्वदेशाचा इतिहास शिकविण्यावर तर त्याहून कडक निर्बंध होते. पण अन्तोतिना तुपस्का ही शिक्षिका आपल्या वर्गातील कोवळ्या मुलींच्या मनावर देशाभिमानाचें महत्त्व ठसवूं पाहात होती. तो राजद्रोहाचा गंभीर गुन्हा होता. तें पापकृत्य (?) तिनें चोरून चालविलें होतें. असाच एकदां आपल्या देशांतील आंदोलनांचा रोमहर्षक इतिहास तिनें आपल्या बालश्रोत्यांना ऐकविला. फादर स्टॅनिस्लास कोनर्स्की यानें पोलंडमध्यें वॉर्सा येथें विश्वविद्यालयाची स्थापना करून फ्रेंच वाङ्मयाचा आणि कलांचा पुरस्कार कसा केला; न्यूटन, लॉक, मॉंटेक्स यांचे सिद्धांत लोकांना समजावून देऊन नवसुधारणेची लाट कशी उसळवून दिली ह्याची हकीकत सांगितली. वर्गांत स्तब्धता पसरली होती, पण मनें मात्र उल्हासानें थरारून गेलीं होतीं. स्वदेशाच्या इतिहासाच्या कथा आणि त्याहि चोरून ऐकण्यांत काय स्वारस्य आहे याची कल्पना त्या स्थितींतून गेलेल्या माणसाखेरीज इतरांना क्वचितच येईल. तुप्सिया बाईनीं (हें त्यांच्या शिष्यावर्गानें ठेवलेलें लाडकें नांव) मुलींच्या तोंडून ती हकीकत वदविण्यास सुरुवात केली.

ती पाहा आपली छोटी मन्या अस्खलितपणें बोलत आहे. नेव्ही ब्ल्यू रंगाचा–खलाशी लोक वापरतात तसला – निळाशार पोषाख तिनें केला आहे; त्याला कडक इस्त्रीची पांढऱ्या रंगाची गळपट्टी आहे. निळ्या कपड्यावर पांढरीं शुभ्र पोलादी बटनें चकाकत आहेत. तिचे नेहमींचे बंडखोर केस कानामागें चोपून बसविलेले आहेत. तिच्या पुढच्याच रांगेंत तिची बहीण हेला ही पण दिसत आहे. इतर मुलींच्या मानानें मेरी तर लहानच दिसते. होय, दोन वर्षांनीं तरी ती लहान आहे; पण वाचन घ्या, इतिहास घ्या किंवा जर्मन, फ्रेंच वा रशियन भाषा घ्या, तिची तयारी

सर्वांपेक्षां उत्कृष्ट आहे, मग तुप्सिया बाईंची तिजवर मर्जी असली आणि त्या तिच्या हटवादी स्वभावाकडे दुर्लक्ष करून तिचें कौतुक करीत असल्या तर आश्चर्य काय?

मेरी सांगत होती :—

" ऑगस्टसची राजपदावर निवड झाली; त्याला विद्येची, कलांची हौस होती. पण राज्य कसें करावें, हें दुर्दैवानें त्याला ठाऊक नव्हतें. राज्यांत अव्यवस्था, बखेडे माजूं लागले होते; ना खजिन्यांत पैसा, ना सैन्य अशी स्थिति होती; कारण ऑगस्टस भित्रा होता."

'कर्रर–कर्रर'–तिचें वाक्य पुरें होण्यापूर्वीच विजेच्या घंटेनें सूचना दिली. एक क्षणच सर्वांच्या चेहऱ्यावर अस्थिरता उमटून गेली. शांततेचा मात्र यत्किंचितहि भंग झाला नाहीं. इन्स्पेक्टरसाहेबांच्या आगमनाची ती सूचना होती. लगेच ४-५ मुलींनीं सर्वांच्या पुढचीं पुस्तकें गोळा करून लगतच्या लहान दरवाजानें पाठीमागच्या वसतिगृहाच्या खोलींत नेऊन ठेवलीं. कांहींशा धापा टाकीतच आपल्या जागेवर त्या येऊन बसल्या. मुली शिवणकामांत गढून गेल्याचा देखावा दिसूं लागला. तेवढ्यांत पिवळ्या रंगाचा सूट, डोळ्यावर सोनेरी चष्मा, जर्मन पद्धतीनें कापलेले केस, किंचित् स्थूल शरीर अशी इन्स्पेक्टरसाहेबांची स्वारी वर्गांत येऊन दाखल झाली.

त्यांनीं सर्वांचीं तोंडें न्याहाळलीं; वर्गशिक्षिकाहि त्यांजकडे डोळ्याला डोळा भिडवून पाहात होत्या. "या मुलींना आठवड्यांतून दोन तास शिवण असतें." मुख्याध्यापिकेनें खुलासा केला.

"पण तुम्ही तर मोठ्यानें कांहीं वाचीत होतां!"

"होय, तें एक गोष्टींचें पुस्तक होतें. क्रिलोव्हच्या कल्पित कथा. आजच आम्हीं त्याला सुरुवात केली."

इन्स्पेक्टरसाहेबांनीं मुलींचें डेस्क उघडून पाहिलें. सगळें स्वच्छ; कोठें कागदाचा कपटा नव्हता. त्यांचें समाधान झाल्यासारखें दिसलें. त्यांनीं मुलींना प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. मेरी मनांतल्या मनांत देवाची

प्रार्थना करीत होती कीं, "देवा, मजवर पाळी येऊं देऊं नकोस."
पण तिच्याइतकी वर्गांत हुषार मुलगी तरी कोण होती? बाईंची नजर तिजकडे गेली. तिला उठावेंच लागलें.

"तुमची रोजची प्रार्थना म्हण."

मेरीनें मुकाट्यानें प्रार्थना म्हटली. कॅथॉलिक धर्माची रशियन भाषेंतील ती प्रार्थना होती. पोलंडच्या लोकांना मुद्दाम खालीं मान घालावयास लावण्याचा उपाय म्हणून झारनें ती निवडून काढली होती.

"झारांचीं नांवें सांग."

"केथराईन, पोल, अलेक्झँडर–" मेरीनें पटापटा नांवें उच्चारलीं. तिची स्मरणशक्ति दांडगी होती. आणि उच्चार तरी किती सफाईदार! जणूं सेंट पीटर्सबर्गमध्येंच तिचा जन्म झाला होता! इन्स्पेक्टर तिजवर खूष झाला.

"राजघराण्यांतील लोकांच्या पदव्या सांगा?"

एक ना दोन. प्रश्नांची सरबत्ती चालूच होती.

"आपल्यावर राज्य कुणाचें आहे?"

मुख्याध्यापिका व शिक्षिका यांचें मस्तक या प्रश्नानें भडकूनच गेलें. डोळ्यांत अनावर राग गोळा होत होता. त्यांनीं आपली दृष्टि मुकाट्यानें दुसरीकडे वळविली. मेरी स्तब्ध होती. उत्तर येत नाहींसें पाहून हॉर्नबर्गची स्वारी पुनः गरजली.

"आपले राज्यकर्ते कोण?

"रशियाचे महाराजाधिराज झारसाहेब – दुसरे अलेक्झँडर—"

मेरीनें मोठ्या कष्टानें उत्तर दिलें. तिचा चेहरा पांढरा फटफटीत झाला होता.

तपासणी अधिकाऱ्याची स्वारी मान हालवीत खोलीच्या बाहेर पडली. तुप्सिया बाईंनीं मान वर करून 'मन्या'ला जवळ बोलावून तिच्या कपाळाचें मोठ्या प्रेमानें चुंबन घेतलें. वर्गांत पुनः चैतन्य खेळूं लागलें. पण मन्याच्या डोळ्यांतून खळखळ अश्रुधारा वाहूं लागल्या. इतका वेळ दाख-

विलेल्या धिटाईचा ताण असह्य झाल्यामुळें आपल्या भावनांचा आवेग दाबणें तिला असह्य होऊन ती अश्रु गाळीत होती, कीं परवशतेच्या घावानें चिरडलेल्या कोवळ्या हृदयाची ती जखम वाहात होती !

* * *

मेरीला शालेय जीवनांत अगदीं जिवाभावाची अशी लाभलेली मैत्रीण म्हणजे काझिया. काउंट झामोस्की हें तिच्या वडिलांचें नांव. काउंट झामोस्की घरचे श्रीमंत होते. ते व त्यांच्या पत्नी दोघेंहि सुस्वभावी व सज्जन म्हणून त्यांचा लौकिक होता. काझिया श्रीमंतीच्या लाडांत वाढलेली असूनहि स्वभावानें प्रेमळ होती. ती दिसायला सुरेख असून तिची आई तिच्या वेषभूषेची विशेष खबरदारी घेत असे. मेरीबद्दल त्या कुटुंबाला मोठा आपलेपणा वाटे. काझियाची आई आपल्या मुलीच्या बालमैत्रिणीला नेहमींच चहाला आपल्याकडे बोलावी. इतकेंच काय पण काउंट झामोस्कींच्या वाचनालयावर देखरेख करणाऱ्या कारकुनाची पत्नी झिवरोस्का बाई देखील या आईवेगळ्या मुलीला जीव लावून आईची उणीव भासूं नये असा प्रयत्न करी.

मेरी आणि काझिया यांची दुकल शाळेंत जातांना किंवा खेळायला-फिरायला जातांना नेहमीं बरोबर असावयाची.

सिकोर्का बाईच्या खाजगी शाळेंतील शिक्षणक्रम संपवून मेरी सरकारी शाळेंत जाऊं लागली, तेव्हांहि काझिया तिच्याबरोबर होतीच. आणि शाळेंतील विशिष्ट वातावरणामुळें ही मैत्री दृढ होण्यास संधि मिळत गेली.

खरें म्हटलें म्हणजे शाळेंतलें वातावरण नेहमींच ऐक्याला पोषक असतें. जाति, धर्म, पंथ—या साऱ्यांचे भेद तेथें लयाला जातात. खेळामुळें, अभ्यासांतील चढाओढीमुळें आणि इतर कार्यक्रमामुळें एकमेकांशीं सहकार्य करायला, एकमेकांशीं समरस व्हायला तेथें मोठाच वाव असतो. आपण सारे विद्यार्थी, सारेच भाऊ-बहिणी अशी भावना तेथें लवकर दृढमूल होते. मेरीची शाळा याला अपवाद नव्हती. भिन्नवंशीय, भिन्नभाषीय, भिन्नराष्ट्रीय

मुली त्या शाळेंत होत्या. शाळेच्या वातावरणांत त्या एकमेकींशीं सहानुभूतीनें आपुलकीनें वागत.

पण शाळा सुटतांच हें वातावरण बदलून जाई. पोलिश मुलामुलींखेरीज इतरांशीं मैत्री न ठेवण्याची पोलिश लोकांची आपल्या मुलांना सक्त ताकीद असे. त्यामुळें शाळा सुटतांच मुली स्वतःच्या राष्ट्रीयत्वानुसार गट बनवीत. आपल्या मायभाषेंत बोलत आणि इतर मुलींशीं संपर्क टाळीत. या अलगपणाचा परिणाम मुलींच्या सामाजिक आणि सांस्कृतिक शिक्षणावर होऊं नये अशी पालक दक्षता घेत.

त्यांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक शिक्षणाचा एक भाग म्हणजे शनिवारीं होणारें नृत्य-गायनाचे कार्यक्रम. कोणाकडे तरी पाळीपाळीनें जमावयाचें आणि हे कार्यक्रम पार पाडावयाचे, असा पोलिश लोकांचा रिवाज होता. प्रौढ मुली त्यांत भाग घेऊं शकत. शाळकरी मुली नुसतें निरीक्षण करीत, किंवा फार तर शाळेंत मिळालेल्या संथांची उजळणी करीत. स्क्लोडोवस्की कुटुंबांत असे कार्यक्रम अलीकडे वरचेवर होत. तें एक छोटेसें संमेलनच असे. त्यामुळें मेरी, काझिया या मुलींना ती एक मौज—मजेची बाब वाटे.

आज अशाच तऱ्हेचा कार्यक्रम व्हावयाचा होता. आपला पोषाख ठाकठीक कसा करावा, कोण कोण मैत्रिणी आज येतील याविषयीं त्यांचे मनाशीं बेत, तर्कवितर्क सुरू होते; आपणाला यांत कधीं भाग घ्यावयास मिळणार याविषयीं त्या आपसांत बोलत होत्या. बोलत बोलत त्या शाळेच्या दरवाजापाशीं येऊन पोहोंचल्या.

पण ती पाहा. मेरीची एक मैत्रीण लेनी कुनिका. तिचा पोषाख तर नेहमीं व्यवस्थित असावयाचा; पण आज तिचें आपल्या पोषाखाकडे लक्षच दिसत नाहीं. आणि हें काय?—तिचे डोळे तर रडून रडून सुजल्यासारखे दिसतात!

मेरी आणि काझिया एकदम तिजकडे धांवल्या, आणि तिला विचारूं लागल्या, " कुनिका, काय झालं ग ? अशी रडतेस कां ? "

तिच्या तोंडांतून तर मुळीं शब्दच फुटत नव्हता. अखेर मोठ्या कष्टानें तिनें अडखळत सांगितलें, " माझा भाऊ – तो कटांत सांपडला आहे. त्याला उद्यां फांशी—"

तेरा चौदा वर्षांच्या मुली त्या. त्या तिचें समाधान तरी काय करणार ? तरी पण सर्वांनीं तिला आपापल्यापरी धीर दिला. तिचे डोळे पुसले. इतक्यांत वर्गशिक्षिकेनें त्यांना दटावलें व त्यांना वर्गांत जाणें भाग पडलें.

मेरीच्या कानांत सायंकाळच्या संगीताचे सूर तरळूं लागले होते, ते विलय पावले. ते जाऊन एका उत्साही तरुणाची मूर्ति आणि वधस्तंभ यांचीं चित्रें तिच्या डोळ्यांपुढें उभीं राहिलीं.

त्या रात्रीं नृत्याच्या पाठास जाण्याऐवजीं १४–१५ वर्षांच्या सहा मुली कुनिकाच्या खोलींत रात्रभर प्रार्थना करण्यासाठीं जमल्या. हेला व ब्रोन्याहि आल्या होत्या. काझियाबरोबर तिची वहीण आली होती. अंतःकरणांत वृत्ति बंड करून उठत होत्या. डोळ्यांत अश्रु ओसंडत होते. उजाडतां उजाडतां तर त्यांची स्थिति मोठी विलक्षण झाली. गुडघे टेकून आणि हातांनीं तोंड झाकून त्यांनीं प्रार्थना संपविली.

असल्या वातावरणांत मेरीचें माध्यमिक शिक्षण चालू होतें. एकपरीनें हा काळ स्क्लोडोवस्की कुटुंबाला स्वास्थ्याचा व थोड्या आनंदाचा गेला. ब्रोन्याचें माध्यमिक शिक्षण संपलें होतें. परीक्षेंत तिचा पहिला नंबर आला होता. आणि तिला मानाचें सुवर्णपदकहि मिळालें. गृहकार्याचा बोजा तिनें स्वतःच्या शिरावर घेतला. जोसेफचें शालेय शिक्षण संपलें तेव्हां त्यानेंहि बहिणीप्रमाणेंच सुवर्ण-पदक पटकाविलें. प्रा. स्क्लोडोवस्की यांना त्या दिवशीं किती धन्य वाटलें ! जोसेफ आतां विश्वविद्यालयांत वैद्यकीचा अभ्यास करूं लागला. आपल्या कॉलेजच्या जीवनांतील विविध मौजा आणि विनोद

आपल्या वहिणींना तो खुलवून सांगे. त्या हकीकती ऐकण्यांत त्यांना मौज वाटे, पण त्याबरोबरच जोसेफचा त्या हेवाहि करीत. कारण झारच्या राज्यांत, झारच्या विश्वविद्यालयांत उच्च शिक्षण घेण्याची मुलींना मनाई होती. बौद्धिक प्रगतीला वाव नाहीं म्हणून त्या मनांतल्या मनांत असंतुष्ट होत्या.

* * *

१२ जूनचा दिवस कधीं एकदांचा उजाडतो असें मेरीला होऊन गेलें. त्या दिवशीं मेरीच्या शेवटच्या परीक्षेचा निकाल होता. माध्यमिक शिक्षणाचा तो अखेरचा दिवस. परीक्षेचा निकाल कसा लागेल, थोरल्या वहीणभावांनीं शालेय जीवनांत मिळवलेल्या यशाची परंपरा आपल्या-कडून राखली जाईल का, या विचारानें मेरीचें मन बावरलें होतें. परीक्षेचा निकाल ऐकण्यासाठीं ती साहजिकच अधीर झाली होती.

अखेर एकदांचा तो दिवस उजाडला. मेरी उत्तीर्ण तर झालीच, पण तिनें पहिला नंबरहि पटकावला. स्क्लोडोवस्की कुटुंबांत पुनः मानाचें सुवर्णपदक आलें. सारें घर आनंदानें उजळून निघालें.

वर्क्षासमारंभ झाला. तिच्या शिक्षकांनीं आणि मैत्रिणींनीं तिचें कौतुक केलें. मेरीला सुवर्णपदकाबरोबर बरींच पुस्तकेंहि पारितोषिक म्हणून मिळालीं. आपल्या अध्यापकवर्गाचा आणि मैत्रिणींचा निरोप घेऊन 'मन्या' नें शाळेला रामराम ठोकला. त्या वेळीं मेरीचें वय १४–१५ वर्षांचें होतें.

* * *

परीक्षेनंतर एक वर्ष संपूर्ण विश्रांति घेण्यासाठीं प्रा. स्क्लोडोवस्की यांनीं तिला दूरच्या गांवीं आपल्या नातलगांकडे हेलासह पाठवून दिलें.

या संधीचा मेरीनें भरपूर फायदा घेतला. या अभ्यासू मुलीनें सुटींत पुस्तकांना शिवायचें नाहीं असा जणूं कांहीं पणच केला. आपली विणण्या-शिवण्याची साधनसामुग्रीहि तिनें पेटींत भरून ठेवली. निसर्गाचा आणि

ग्रामीण जीवनाचा स्वच्छंद आस्वाद घेण्यांत तिनें हा काळ घालविला. निसर्गाच्या शोभेंत आणि निरीक्षणांत तिचें मन रमूं लागलें. ह्या वयांत जडलेला हा छंद तिच्या भावी आयुष्यांत टिकला. इतकेंच नव्हे तर, तें एक निरागस आनंदाचें साधनच बनलें. अशा तऱ्हेची मोकळीक तिला प्रथमच लाभत होती. वॉर्सातील दोनच खोल्यांत, पुस्तकांत आणि सामाजिक कोंदट वातावरणांत उबून निघालेलें तिचें मन अंतराळांत स्वैर विहरूं लागलें.

कधीं समवयस्क मित्रमैत्रिणींसमवेत तर कधीं एकटीनेंच यथेच्छ वनसंचार करावा, रमतगमत निसर्गाचीं विविध रूपें अवलोकावीं, फुलें गोळा करावींत, त्यांच्या माळा गुंफाव्यात, अनेक जातींच्या बेरींनीं खिसे भरभरून घ्यावेत आणि आकंठ त्यांचा रस चाखावा, कधीं झाडांच्या हिंदोळ्यावर उंच उंच झोंके घ्यावेत, कधीं पाण्यांत तासन्‌तास डुंबावें आणि मनसोक्त पोहावें,– असा तिचा कार्यक्रम सुरू होता. दुपारच्या वेळीं झोपा काढाव्यात, श्रमानें थकलेल्या किंवा आळसानें जडावलेल्या शरिराला विसांवा द्यावा; पडल्या पडल्या डोळ्यांवर झोपेची सुस्ती असतांना एखादा रोमांचकारी नवलकथेचीं पानें वाचलीं तर वाचलीं,– पुनः संध्याकाळीं भटकणें, खिदळणें आणि नृत्याचा कार्यक्रम आहेच.

तिचे चुलते झेनियर यांच्याकडे असतांना ती घोड्यावरून रपेट करावयास शिकली. त्याच मुक्कामांत कार्पेथिअन पर्वतराजींचें सौंदर्य आणि वैभव तिला पाहावयास मिळालें. पर्वतराजींचीं हिमाच्छादित शिखरें, बेरीफळांचा सडा पडलेल्या पर्वताच्या चढणीवरील पायवाटा, उंच आणि घनदाट काळसर फर वृक्षांच्या राई आणि वनवासी लोकांच्या उत्कृष्ट काष्ठशिल्पांच्या झोपड्या, यांनीं तिचें मन मुग्ध झालें. त्या ठिकाणीं ‘कुलिग’ नांवाच्या दोनदोन दिवस चालणाऱ्या नृत्यप्रधान उत्सवांवर तर ती बेहद्द खूष झाली.

त्या वर्षाचा हिंवाळा तिनें स्काल्बमीर्झ येथें तिचे एक काका झदिझस्लाव यांचेकडे काढला. हसणें-खिदळणें, खोड्या करणें, नृत्य आणि मेजवान्या

यांना तर तेथें अगदीं ऊतच आला होता. घरांतलीं वडील माणसेंहि त्यांत सामील असल्यावर मुलांच्या कल्पकतेला आणि असीम उत्साहाला बहर आल्यास नवल काय?

यौवनाच्या अंगणांत पाऊल टाकण्याच्या कालांतलें हें वर्ष मेरीनें ज्या आनंदांत घालविलें, तसला आनंद तिला पुनः उपभोगावयास मिळाला नाहीं. त्यामुळें या काळच्या स्मृति म्हणजे तिला एक अवर्णनीय आनंदाचा ठेवाच होऊन बसला.

• • •

## समाजसेवेची दीक्षा : : ४

मेरीची किशोरावस्था संपून तिनें आतां यौवनांत प्रवेश केला होता.

यौवनारंभ म्हणजे भावी जीवनाचीं रम्य चित्रें रेखाटण्याचा जीवित-सृष्टीचा मधुमास. बाल्यावस्था ही जीवनाची प्रभात खरी; पण जीवनाचीं स्वप्नें मात्र रविकरांच्या स्पर्शानें उमलणाऱ्या कमलिनीप्रमाणें यौवनाच्या स्पर्शानेंच फुलूं लागतात. जागृत मनाचीं तीं स्वप्नें असतात. आशा, उत्साह आणि प्रेम यांचा त्यांत सुंदर मिलाफ झालेला असतो. त्या वेळीं शारीरिक आणि मानसिक उत्साहाला उधाण आलेलें असतें. प्रतिपदेच्या चंद्राप्रमाणें वर्धिष्णु आत्मविश्वास पराक्रमाचीं नवीं क्षितिजें दाखवीत असतो. आशा आणि प्रेम यांची प्रशांत स्निग्ध प्रभाच सर्वत्र फांकली असल्यानें जीवनांतील कष्टमय प्रसंग, खांचखळगे हे त्यांत लुप्त होतात. या यौवनस्वप्नांचें स्वरूपहि व्यक्तीच्या स्वभावधर्माप्रमाणें भिन्नभिन्न असतें. त्या त्या व्यक्तीच्या सामर्थ्यानुरूप या स्वप्नभूमीची विशालता वा भव्यता ठरत असते. कोणाचीं स्वप्नें व्यक्तिगत, सांसारिक जीवनापुरतीं मर्यादित असतात. प्रेमळ कुटुंबियांचा सहवास, सुखेनैव जीवनयात्रा चालविण्यापुरता किंवा फार तर समाजांत प्रतिष्ठा मिळवून देण्याइतका लक्ष्मीचा वरदहस्त आणि चारचौघांत मानमान्यता एवढेंच क्षेत्र त्यांच्या

महत्त्वाकांक्षेस पुरें होतें. तर कांहींना ओजस्वी आणि वीरोचित अशा पराक्रमानें यशोगिरीचें हिमधवल शिखर गांठण्याचीं स्वप्नें पडत असतात. कौटुंबिक जीवनाच्या संकुचित सीमा ओलांडून राष्ट्रीय आकांक्षांशीं कांहीं-जण समरस होतात. देशप्रीतीच्या विविध रंगांनीं त्यांचीं स्वप्नें रंगून जातात. एवढें मात्र निश्चित कीं, स्वप्नाचें स्वरूप कांहीं असो, या स्वप्नमयतेच्या कालांतच भावी कर्तृत्वाचा पाया घातला जातो.

मेरी जेव्हां शिक्षण संपवून बाहेर पडली, तेव्हांचा काळ पोलिश युवयुवतींच्या जीवनांत अत्यंत खळबळीचा होता. बहुतेकांचीं स्वप्नें राष्ट्रो-द्धाराच्या कल्पनासूत्रांनीं विणलेलीं होतीं. गुप्त मंडळ्या स्थापावयाच्या खलबतें करावयाचीं,शस्त्रास्त्रें जमवावयाचीं, स्फोटक द्रव्यें गोळा करावयाचीं, आज अमक्या अधिकाऱ्याचा बळी, उद्यां तमक्याचा....तर एक दिवस खुद्द रशियाच्या बादशहालाच कंटस्नान घालावयाचें,– या व असल्या कल्पनांत ते दंग असत. हेच विचार रात्रंदिवस त्यांच्या डोक्यांत थैमान घालीत. यौवनांतील मनोहर प्रेमविलास त्यांना मोहवीत नव्हते, वैवाहिक जीवनाचें त्यांच्या मनाला आकर्षण नव्हतें, संपत्ति आणि कीर्ति यांजकडे त्यांनीं पाठ फिरवली होती.

" एकच तारा समोर आणिक पायतळीं अंगार."

या वृत्तीनें ते भारले गेले होते. ज्या कोणांत एवढी कणखरता नसे, ते 'हरि हरि' करीत बसत. खरोखरीच त्यांच्यापैकीं कित्येकांच्या अंतः-करणावर धार्मिक वृत्तीचा पगडा इतका दृढ असे कीं, त्यांची दृष्टि अंतर्मुख होई. प्रार्थना आणि उपवास करावयाचे, आणि ध्यानधारणादिकांच्या द्वारा मुक्तीचा, साक्षात्काराचा मार्ग चोखाळावयाचा अशीहि प्रवृत्ति कित्येकांत बळावलेली पाहावयास सांपडे.

मेरी वृत्तीची अंतर्मुख असली तरी धार्मिक विचारांचा पगडा तिच्या मनावर राहिला नव्हता. मातेच्या सहवासांत बाळपणीं कांहीं धार्मिक संस्कार झाले होते ही गोष्ट खरी; प्रार्थनामंदिरांत गेली कीं ती प्रार्थनेंत

तल्लीन होऊन जाई; पण हे संस्कार दृढमूल होण्यापूर्वीच त्यांना जबर धक्का बसला होता. मातेच्या मृत्यूमुळें तिची श्रद्धा जी एकदां डळमळली ती कायमचीच. धर्माविषयीं ती अखेरपर्यंत उदासीनच राहिली. वडिलांच्या निकट सान्निध्यानें बुद्धिवादाचा पगडाच तिच्या मनावर अधिक बसत चालला होता. पण बाळपणच्या श्रद्धाळूपणांतील एक प्रवृत्ति मात्र मेरीच्या अंतःकरणांत मूळ धरून होती. जीवनांत कांहीं तरी भव्य, उदात्त आहे असें तिच्या मनाला वाटे. त्याचें स्वरूप तिला नीटसें आकलन होत नव्हतें, हें खरें; पण कसल्या तरी उदात्त वस्तूचें चिंतन—पूजन करावें असा ध्यास तिच्या अंतर्मनाला लागला होता. परंपरागत उपासनाप्रकार, धर्म-कल्पना यावरचा तिचा विश्वास उडाला असला तरी ती अगदींच नास्तिक किंवा उच्छृंखल बनली नव्हती. तिची जीवनावर श्रद्धा होती. ती जीवनोपासक बनत होती. आणि म्हणूनच आचार-विचारांचीं बंधनें सुटल्यानें ज्या वयांत इतर तरुण-तरुणी स्वैर वागूं लागतात, त्या वयांत मेरीचें आचरण विशुद्ध राहिलें; इतकेंच नव्हे तर ती अधिक ध्येयनिष्ठ बनली.

मेरीच्या अनेक मित्र—मैत्रिणी त्या काळच्या राजकीय चळवळींत गुरफटल्या होत्या; पण या सतींचें वाण हातीं देणाऱ्या चळवळींत मेरी तन्मय होऊं शकली नाहीं. हिंसेवर—अत्याचारावर तिचा विश्वास नसावा, किंवा तिच्या सौम्य प्रवृत्तीस ती गोष्ट मानवणारी नसावी. तरी पण दुरून दुरून तिनें याबद्दल सहानुभूति व्यक्त केली होती. अनेक क्रान्तिकारक मित्रांना पोलंडमधून निसटून जाण्यासाठीं तिनें स्वतःचा प्रवास—परवाना वापरावयास दिला होता.

पण मेरीच्या प्रवृत्तीशीं जुळणारी व तिला आकर्षित करणारी स्वदेशोद्धाराची एक वेगळीच चळवळ त्या वेळीं पोलंडमध्यें जन्म पावली होती. एका नव्या विचाराच्या लाटेंतून तिचा जन्म झाला होता. जेत्याविषयींचा जळजळीत द्वेष अथवा तिरस्कार आणि त्याच्यापासून निर्माण होणाऱ्या प्रक्षोभांचे स्फुलिंग — वैय्यक्तिक वा नैमित्तिक आघात — यांनीं स्वराज्य-

प्राप्ति दुरापास्त आहे हें ओळखणाऱ्या विद्वानांचा व चतुर मुत्सद्दयांचा वर्ग वाढत होता. स्वराज्याची लालसा बहुजनसमाजांत प्रथम निर्माण व्हायला पाहिजे, त्यांच्यांत प्रथम जागृति व्हावयास हवी, त्यांच्या उठावणीनेंच कार्यभाग साधणार आहे, ही गोष्ट त्यांना पटूं लागली होती. बहुजनसमाजाला जागें करावयाचें म्हणजे राज्यकर्त्यांनीं त्याला अज्ञानांत डांबून ठेवण्याचा जो व्यूह रचला आहे, त्याला सुरुंग लावावयाचा; बहुजनसमाजापर्यंत ज्ञानाचें—साक्षरतेचें लोण नेऊन पोहोंचवावयाचें, ही गोष्ट क्रमप्राप्त होती. ज्ञानप्रसार, बुद्धि आणि संस्कृतिविकास यांच्या पायावरच पोलंडच्या राष्ट्रीयत्वाची भरभक्कम इमारत उभी राहूं शकेल अशी त्यांची विचारसरणी होती.

ही त्यांची विचारसरणी शास्त्रशुद्ध अशीच होती. वस्तुस्थितीचा तिला पूर्ण आधार होता. युरोपमध्यें भौतिक शास्त्रांच्या विकासाचा जमाना सुरू झाला होता. पाश्चर, डार्विन आणि बर्नार्ड यांनीं भौतिकशास्त्राला नवी प्रतिष्ठा मिळवून दिली होती. त्यांतून जीवनाकडे पाहण्याचा नवा आशावादी, विजिगीषु दृष्टिकोण निर्माण झाला होता. युरोपांतल्या इतर देशांप्रमाणेंच वॉर्सांतील बुद्धिमंतांनाहि त्याचें मर्म समजूं लागलें होतें. शस्त्रबलाला शास्त्रबलाची जोड देण्याची आवश्यकता त्यांना पटूं लागली. शास्त्रांच्या अभ्यासाकडे व जोपासनेकडे त्यांचा कल झपाट्यानें झुकत होता. बुद्धिमान् वर्गाच्या मनावरील ललितकलांची धुंदी उतरूं लागली; एकान्तिक विचार करणाऱ्या तरुणांनीं जीवशास्त्र, रसायनशास्त्र यांचा अभ्यास जारीनें सुरू केला. वाङ्मयाची जागा शास्त्रानें घेतली. लेखक होण्यानें नव्हे तर शास्त्रज्ञ बनण्यानेंच आतां राष्ट्राचा तरणोपाय आहे हें त्यांनीं ओळखलें.

पण या विचाराचा प्रकटपणें उच्चार करण्याचीदेखील त्या काळीं चोरी होती; मग कृतीची गोष्ट तर दूरच. ही जागृति, हा ज्ञानप्रसार, ही विज्ञानाची तपस्या गुप्तपणेंच चालविणें त्यांना भाग होतें. त्यासाठीं पोल लोकांनीं एक गुप्त विद्यापीठ स्थापन केलें. छंद-मंडळांच्या (क्लब) नांवाखालीं

अभ्यासमंडळें सुरू केलीं. या विद्यापीठाच्या हीं मंडळें शाखा म्हणून काम करीत. अशा अभ्यास-मंडळाचें एक जाळेंच हळूहळू देशभर पसरलें.

सुटी संपवून वॉर्सोला परत आल्यावर मेरीहि अशाच एका मंडळांत दाखल झाली. प्रथम सामील होतांना तिला बराच संकोच वाटत होता. पण इतर मैत्रिणींचीं धिटाईचीं भाषणें ऐकून व कामाची उभारी पाहून मेरीची भीड चेपत गेली. मेरीच्या सांगातीं तिची थोरली बहीण ब्रोन्या आणि तिची मैत्रीण राकोस्का याहि होत्याच. इतिहास, शारीरशास्त्र व समाजशास्त्र या विषयांचें वाचन त्यांनीं सुरू केलें. तेथें वॉर्सोतील तरुण व उत्साही अध्यापक-प्राध्यापक व्याख्यानें देण्यासाठीं नेहमीं येत. त्यांच्या ज्ञानाचा लाभ त्यांस मिळूं लागला. पण प्रायः विद्यार्थी स्वावलंबी वृत्तीनेंच तेथें खूप शिकत, स्वतः पुस्तकें वाचून टांचणें करीत, लहान लहान लेख व निबंध लिहीत, तीं परस्परांना वाचावयास देत आणि त्यावर चर्चा व विचारविनिमय करीत. पण हें सारें अगदीं गुपचुपपणें चाले.थोडीशी जरी चाहूल लागली तरी त्यांच्या पोटांत धस्स होई. कारण पोलिसांना यत्किंचित् सुगावा लागण्याचा अवकाश कीं सरकारी पाहुणचाराचें निमंत्रण आलेंच म्हणून समजावें !

मेरीचें अभ्यासमंडळ पायसेका नांवाच्या एका शिक्षिकेच्या घरीं भरत असे. या बाईचें वय सुमारें २५-२६ असेल. नोब्लिन नांवाच्या एका पोलिश तरुणावर त्यांचें प्रेम जडलें होतें. परंतु राजकीय चळवळींत भाग घेत असल्याच्या आरोपावरून त्याला विश्वविद्यालयाचे दरवाजे नुकतेच बंद झाले होते; पोलिसांचा डोळा चुकविण्यासाठीं तो तूर्त परागंदा झाला होता. या बाईची मेरीवर खूप मर्जी होती. पंधरा सोळा वर्षांची मेरी अतिशय उत्साहानें काम करूं लागली. शिवणकाम करणाऱ्या कांहीं स्त्रियांना वाचून दाखविण्याचें व वाचावयास शिकविण्याचें काम तिनें अंगावर घेतलें. पुढें त्यांच्यासाठीं कांहीं पुस्तकेंहि तिनें जमा केलीं. निरनिराळ्या अभ्यासमंडळांस ती भेटी देई. तेथें मोठ्या आवेशानें वाद-विवादांत भाग घेई. कांहीं बौद्धिकेंहि तिनें स्वतंत्रपणें घेतलीं.

पण या कामांत मेरी रंगली असली तरी सर्वस्वीं गढून गेली नाहीं. राजकारण हें आपल्या जीवनाचें व्यवसायक्षेत्र नव्हे हें तिनें ओळखलें होतें म्हणून म्हणा, किंवा भावनावशतेपेक्षां बुद्धिप्रकर्षच तिच्या ठायीं अधिक असल्यानें म्हणा, दिवसाचें हें काम संपलें कीं तिचें वैयक्तिक जीवन सुरू होई. तिची ज्ञानलालसा अनिवार होती; आणि भोंवतालच्या जगाच्या व्यापांत गढून गेल्यानें तिच्या शक्तीला कधीं खंड पडला नाहीं. या काळांत तिची ज्ञानलालसा शास्त्रीय विषयापुरतीच मर्यादित नव्हती. काव्यकलांचीहि तितकीच तिला आवड होती. त्यामुळेंच तिच्या एकांतांतील वाचन–लेखनांत बहुविधता पाहावयास सांपडते. त्या काळांत ऑगस्टस, कॉम्टे यांचें लेखन आणि सामाजिक उत्क्रान्तीसंबंधींचे ग्रंथ यांचें तिनें परिशीलन केलें. बोलेस्लाव प्रसचें ‘ मुक्तात्मा ’ (दी इमॅन्सिपेटेड) हें पुस्तक तिला फार आवडलें होतें. संस्कृति-विकासाचा हव्यास बाळगणाऱ्या तिजसारख्या पोलिश तरुणीचें चित्रण तिला त्यांत पाहावयास मिळालें. मेरीच्या त्या काळच्या टिपणवह्या तिच्या वाचनाच्या विविधतेची, अभिरुचीच्या सर्वस्पर्शतेची आणि तिच्या कलाप्रेमाची साक्ष देतात. त्यांत ठिकठिकाणीं कांहीं कथा चित्ररूपानें रेखाटल्या आहेत; फॉउन्टेनच्या कल्पित कथांचीं पेन्सिलीनें तिनें रेखाचित्रें काढून ठेवलीं आहेत, जर्मन आणि पोलिश भाषांतील काव्यचरणहि त्यांच्या जोडीनें ठिकठिकाणीं विखुरले आहेत. डोस्टोवस्की आणि गॉल्पेराव यांचें लिखाण तिनें या काळांत वाचलें. रेनॉंच्या जीझसच्या जीवनांतील तीन पानें मजकूर आपल्या वह्यांत उतरून घेतला. रशियनमधील तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांतील उतारे भाषांतरित करून लिहून काढले. सली, प्रूधाँ इत्यादिकांचीं पद्यमय भाषांतरें केलीं. प्राणी, फळें, फुलें यांचीं चित्रेंहि रेखाटलीं; आणि एकीकडे अगदीं गंभीर रीतीनें जीवनाचें चिंतन करीत असतांच ‘श्यामला, प्रीति जडे तुजवरी’ अशा आशयाचा कवितांचाहि संग्रह केला ! अर्थात् या साऱ्या गोष्टी ती आपल्या मैत्रिणींपासून लपवून ठेवी हें वेगळें. त्यांच्यांत

ती मिसळली कीं त्यांच्याप्रमाणें कणखर वृत्तीनें वागे. त्यांच्यामध्यें कधीं कविता म्हणून दाखविण्याची वेळ आलीं तर ऑस्निकच्या ओबडधोबड पण ओजस्वी गीतांचीच ती निवड करी. पुढीलसारख्या काव्यपंक्ति तिच्या मैत्रिणींच्या मेळाव्यांत ध्येयगीत म्हणून मानल्या जात :

**सत्यद्युतिचे पूजक व्हा रे**
**अज्ञानांतिल नव पथ शोधा**
**अपार वाढे ज्ञान आमुचें**
**अनन्त गूढें परी ईश्वरी**
**युगायुगांचीं नूतन स्वप्नें**
**कशास धरितां ध्यास जुन्यांचा**
**ज्ञानदीप घ्या, सिद्ध सदा व्हा**
**उभवायाला भविष्यमंदिर**

मेरीनें खूप वाचलें, पुष्कळ विचारहि केला. मार्क्सचें तत्त्वज्ञानाहि तिनें वाचलें; साम्यवादी विचारसरणी तिला पटूं लागली; साऱ्या जगाची नवीन पायावर उभारणी झाली पाहिजे असें तिला वाटूं लागलें. पण पक्की मार्क्सवादीहि ती झाली नाहीं. कोणत्याहि पंथांत शिरावयाचें म्हणजे स्वतःच्या मतस्वातंत्र्याला आणि विचारस्वातंत्र्याला थोडा तरी आळा घालावयालाच पाहिजे, याला तिची तयारी नव्हती. त्याचबरोबर मार्क्सच्या आंतरराष्ट्रीय वादापेक्षां आपल्या राष्ट्राचें स्वातंत्र्य तिला अधिक निकडीचें व जिव्हाळ्याचें वाटे. खरें सांगायचें म्हणजे, एकीकडे उच्च विद्याभ्यासाची अनिवार लालसा तिला खेंचीत होती; पोलंडच्या स्वातंत्र्याचा विचार तिला दुसरीकडे अस्वस्थ करीत होता; तर विशाल मानवधर्माची मोहिनी तिला आकर्षित करीत होती. या त्रिवेणी संगमांतच सध्यां ती डुंबत होती. जीविताच्या ओघांत हे तीन प्रवाह कदाचित् तीन दिशांना फांकतील, आणि आपली जीवननौका कोणत्या तरी एकाच प्रवाहांत ढकलण्याची आपणांवर पाळी येईल, अशी तिला अद्याप कल्पना आली नव्हती. कांहींहि असलें तरी या वयांतील कार्याचा, सामाजिक सेवेच्या दीक्षेचा तिला पुढें

विसर पडला नाहीं. या आपल्या कामाबद्दल बोलतांना. तिनें काढलेले पुढील उद्‌गार चिंतनीय आहेत:

"त्या बौद्धिक आणि सामाजिक स्नेहभावाच्या माझ्या सुखद स्मृति अद्याप ताज्या आहेत. आमचीं त्या वेळचीं साधनें अगदीं तोकडीं होतीं. आम्हांला मिळालेलें यशहि अभिमानानें फुगून जाण्यासारखें नव्हतें. तरी पण ज्या कल्पनांची आम्हीं तेव्हां कास धरली, त्यांनींच खरी समाजाची प्रगति होईल अशी अजूनहि माझी निष्ठा आहे. व्यक्ती-व्यक्तीची सुधारणा झाल्या-शिवाय नवीन जगाची निर्मिति अशक्य आहे. या दृष्टीनें आपली प्रगति अधिकांत अधिक करण्यासाठीं प्रत्येकानें झटलें पाहिजे. त्याचबरोबर भोंवतालच्या समाजांतील आपलें स्थान व जबाब-दारी ही पण प्रत्येकानें ओळखली पाहिजे. आपण ज्यांच्या अधिक उपयोगीं पडूं असें आपणांस वाटतें त्यांना साहाय्य करणें हें एक आपलें विशिष्ट कर्तव्य आहे, असें प्रत्येकास वाटलें पाहिजे."

• • •

# विशाल जगांत : : ५

" हें बघ ब्रोन्या, मला किनई एक मार्ग सुचला आहे." मन्या बोलत बोलत ब्रोन्या लिहीत होती तेथें आली. " बाबांना तो पसंत आहे; तुला पटतो का पाहा. "

" कसला मार्ग ? कशाबद्दल तूं म्हणतेस ? " ब्रोन्याला कांहींच बोध न झाल्यानें तिनें विचारलें. आपले आश्चर्यानें विस्फारलेले डोळे तिनें मेरीकडे रोखले होते.

" मला असं सांग कीं, तूं जर आतां पॅरिसला जायचं ठरवलंस, तर तुजजवळची शिल्लक तुला किती दिवस पुरेल ? "

" जेमतेम एक वर्ष. अशा स्थितींत जाऊन मी काय करूं ? मला डॉक्टरीचा अभ्यास पुरा करायचा म्हणजे तिथं पांच वर्षं तरी नकोत का काढायला ? " बोलतां बोलतां ब्रोन्याचा स्वर बदलला. तिनें आपलें तोंडहि फिरवलें.

" ब्रोन्या, आपण महिन्याला एक नाहीं तर अर्धा रुबल शिल्लक टाकणार. असं दांत कोरून का पोट भरणार आहे ? अशी शिल्लक टाकून अभ्यास पुरा करायचा म्हटलं तर या जन्मीं कांहीं आपली हौस फिटायची मला आशा नाहीं."

"मग तुझं म्हणणं काय?" ब्रोन्यानें मध्येंच विचारलें.

"माझं म्हणणं असं कीं, या हिंवाळ्यांत तूं पॅरिसलीं जा. तुजजवळची पुंजी संपली कीं मी व बाबा तुला पैसे पाठवूं."

"आणि—"

"थांब, माझं सारं ऐकून घे. तूं डॉक्टर झालीस कीं मी पॅरिसला जाईन. माझा साराच भार मी तुजवर टाकणार नाहीं. कांहीं तरी पैसे मी तोंवर सांठवीनच कीं! असं कांहीं तरी केलं, तरच मला वाटतं जमेल."

ही परस्पर साह्य करण्याची कल्पना ब्रोन्याला रुचण्यासारखी होती. पण मेरी तरी आपल्याला पैसे पाठविणार म्हणजे कोठून पाठविणार, याचें तिला कोडेंच होतें. तिला अधिक बुचकळ्यांत न ठेवतां मन्या पुढे म्हणाली, "मीं एक गृहशिक्षिकेची जाहिरात पाहिली आहे. मी तिथं खटपट करून पाहणार आहे. जेवून खाऊन सालिना चारशें रुबल्स मिळतील."

मेरीचा हा विचार ऐकून ब्रोन्याला उचंबळून आलें. मेरीचें हृदय किती कोमल आहे याची तिला कल्पना होती. त्या प्रेमापोटीं हा त्याग जन्मला होता हें तिनें ओळखलें. मन्याला पोटाशीं धरावें असेंहि त्या वेळीं तिला वाटलें. तिनें आपला भावनावेग आवरला. मेरीनें सुचविलेल्या मार्गाच्या व्यवहार्यतेविषयीं तिच्या मनांत किन्तु नव्हता, पण तो तात्बडतोब मान्य करणें तिच्या जिवावर आलें. मेरीच्या नोकरीच्या कल्पनेनें तिचें चित्त कांहींसें व्यथित झालें. गृहशिक्षिकेच्या पेशांत मन्याला सुख लाभणार नाहीं याची तिला जाणीव होती. श्रीमंत लोकांविषयीं मेरीला जात्याच तिटकारा आहे हें तिला ठाऊक होतें; आणि गृहशिक्षिकेचा व्यवसाय म्हणजे श्रीमंतांच्या घरीं थोडें तरी त्यांच्या लहरीच्या तालावर नाचणें तिला भाग होतें. तेव्हां असली नोकरी म्हणजे मेरीचा कोंडमाराच. थोडें थांबून ती म्हणाली,

"मग मन्या, तूंच पॅरिसला आधीं गेलीस तर? आपल्या घरांत तूंच अधिक बुद्धिमान आहेस; तुला पुढें शिकायची हौस पण आहे."

"अग, वेडाबाई, मला आत्तांशीं कुठं सतरावं लायलंय. मी आणखी दोन तीन वर्षं थांबलें तरी माझं कांहीं अभ्यासाचं वय निघून जात नाहीं. तूं काय अर्धं वय निघून गेल्यावर अभ्यासाला लागणार! तुलाच अगोदर जायला हवं हें तर निश्चित. बाबांची या बेताला पूर्ण मान्यता आहे." यावर ब्रोन्या काय बोलणार?

* * *

मेरीनें द्रव्यार्जनाचा हा विचार प्रथमच मनांत आणला होता, असें मुळींच नाहीं. ब्रोन्या पूर्वींच खाजगी शिकवण्या करूं लागली होती. सुटींतून परत आल्यावर मेरीनें तो पाठ घेतला होता. तिच्या अकालीं प्रौढ वृत्तीमुळें म्हणा, वा परिस्थितीचा उकल इतरांपेक्षां तिला लवकर होत असल्यामुळें म्हणा, आपल्या कुटुंबांतील आर्थिक परिस्थितीस आपण हातभार लावला पाहिजे याची तिला तीव्रतेनें जाणीव झाली होती. त्यांतच गतकालच्या स्मृतीनें व विशेषतः स्वतःच्या अविचारीपणाच्या पश्चात्तापानें वडिलांचा चेहरा उद्विग्न आणि व्याकुळ झालेला तिला दिसे, तेव्हां ती वडिलांस खूपच धीर देई; पण त्यामुळें हा भार स्वतःच्या माथीं घेण्याची आवश्यकता अधिक निकडीनें वाटे.

आपल्या भावंडांपैकीं जोसेफची तिला विशेष काळजी नव्हती. त्याचा वैद्यकीचा अभ्यास व्यवस्थित सुरू होता. हेलाबद्दलहि तिला विशेष काळजी बाळगण्याचें कारण नव्हतें. एक तर ती विशेष महत्त्वाकांक्षी नव्हती. शिवाय तिचा गाण्याचा अभ्यास चांगला चालला होता त्यांत तिची बरीच प्रगतिहि झाली होती. तिला काळजी वाटे ती ब्रोन्याच्या व स्वतःच्या शिक्षणाची. वडिलांचा वृद्धापकाळ झाला होता. त्यांना विश्रान्ति मिळून त्यांचे शेवटचे दिवस कसे सुखांत जातील, हा विचार तिला स्वस्थता लाभूं देत नव्हता.

ब्रोन्याचा कोंडमारा तिला स्वानुभवानें कळत होता. पॅरिसला जाऊन डॉक्टर व्हावयाचें आणि पोलंडला येऊन व्यवसाय सुरू करावयाचा;

त्यामुळें आपल्याला समाजसेवाहि करतां येईल, असें ब्रोन्याला वाटत होतें. ती स्वतः बुद्धिमान् व कष्टाळू होती, पण आईच्या मृत्यूनंतर गृहव्यवस्थेची धुरा तिला आपल्या खांद्यावर घ्यावी लागल्यानें तिच्या मनच्या आशा मनांतच राहिल्या होत्या. तिच्या गुणांचें चीज होण्याचा मार्गच दिसत नव्हता. ब्रोन्याची बुद्धि अशीच मातीमोल होणार काय, हा विचार मेरीस चैन पडूं देत नव्हता. शेवटीं बराच विचार करून तिनें वर सुचविलेली योजना ब्रोन्यापुढें ठेवली.

असा कांहीं मार्ग काढल्याशिवाय त्यांना आपल्या आकांक्षांची पूर्ति करतां येणें अशक्य होतें. खाजगी शिकवण्या करून धनसंचय करावयाचा आणि मग शिक्षणाकडे वळावयाचें म्हणजे चिमणीनें काटक्या गोळा करून राजप्रासाद उठविण्याचा हव्यास बाळगण्यासारखेंच होतें.

खाजगी शिकवण्या धरण्यापासून जगाचा अनुभव मात्र त्यांस खूप मिळूं लागला होता. हें काम मोठें सुखाचें नाहीं, याची त्यांना जाणीव झाली. त्यांत दगदग होती, कंटाळवाणेपणा होता. नवीन ज्ञानासाठीं आसुसलेल्या विकसनशील बुद्धीला तेंच तेंच धडे गिरविण्यांत काय आल्हाद मिळणार होता! पाऊस असो, थंडी असो, रस्ता तुडवीत जावयाचें, 'मुलीची वेणीफणी होते आहे, बसा जरा.' असें उत्तर येतांच ताटकळत राहावयाचें, किंवा एखाद्या दिवशीं मुलीची शिकावयाची लहर लागली नाहीं कीं आल्या पावलीं माघारीं फिरावयाचें; जणूं शिक्षकाच्या वेळेला म्हणजे मोलच नाहीं. बरें, स्वाभिमानाला मुरड घालून योग्यांनाहि अगम्य असा हा गहन सेवाधर्म ज्या पैशासाठीं आचरावयाचा, त्याचें तरी दर्शन वेळेवर होत असे काय? तर त्याचेंहि नांव नाहीं. कारण स्वतःच्या सुख-विलासासाठीं मुक्तहस्तानें पैसा उधळणारी ही धनिक मंडळी शिक्षकांच्या पैशाच्या बाबतींत नेमकी झोंड असावयाची. या महिन्याला पैसे हातीं आले कीं अमक्याचें देणें द्यावयाचें, तमकी वस्तु खरेदी करावयाची म्हणून शिक्षकानें आपलें कल्पनासाम्राज्यांत दंग असावें; पण पुढील महिना

अर्धाअधिक उलटून गेला तरी त्यांना पैसे देण्याची आठवण या पालकांना व्हायची नाहीं.

गृहशिक्षिकेचा व्यवसाय पत्करण्यामुळें यांतील पुष्कळ अडचणी नाहींशा होणार होत्या. पण मुख्य म्हणजे कोंडलेल्या जलाशयाप्रमाणें झालेल्या त्यांच्या जीवनाला नवीन वाट मिळणार होती. लवकरच मेरीला तिच्या अपेक्षेप्रमाणें एक नोकरी मिळाली.

मेरीनें मोठ्या आशेनें या घरांत प्रवेश केला. मुलांशीं आपण प्रेमानें वागूं, त्यांना विविध प्रकारच्या गंमती शिकवूं, पालकहि आपलें कौतुक करतील, त्यांच्याशीं आपला स्नेह जमेल, एका उच्च बौद्धिक वातावरणांत आपणांस वावरावयास मिळेल, अशा कल्पनेंत तिचें मन तरळत होतें; पण तिच्या पदरीं निराशाच यावयाची होती. तिला धनिकांविषयीं अकारण वाटणारा तिटकारा अनुभवानें समर्थनीय ठरावयाचा होता.

हीं त्या वेळच्या पोलंडमधील स्वतःला सुशिक्षित म्हणविणारीं माणसें स्वतःला मोठीं सुधारलेलीं, पुढारलेलीं मानीत; पण खऱ्या संस्कारितेचा त्यांना गंधाहि नव्हता. अंतःकरणाचें औदार्य त्यांच्या ठिकाणीं मुळींच नव्हतें. त्यांच्या सामाजिक व्यवहारांत कृत्रिमता व ढोंग हींच अधिक होतीं. समाजांत जितक्या मिठासपणें तीं एकमेकांशीं बोलत, एकमेकांची प्रशंसा करीत, तितक्याच निर्दयतेनें त्यांच्या अपरोक्ष त्यांचे तीं वाभाडे काढीत. कुटुंबांतल्या कुटुंबांतहि स्नेहभावापेक्षां कलहप्रवृत्तिच अधिक प्रभावी असे. क्षुल्लक कारणावरून वर्दळीवर येऊन तीं भांडत. मेरीला या गोष्टी नवीनच नव्हे—तर तिच्या मनाला धक्का देणाऱ्या होत्या. तिच्या मनावरील संस्कार सात्त्विक व अभिजात असेच होते. घरांत राग-रुसवा-देखील तिनें कधीं पाहिला नव्हता. मग कलह व अपशब्दांचा उच्चार तर दूरच राहिले. सुधारलेल्या म्हणविणाऱ्यांच्या या आचारांचें व अंतरंगाचें जवळून निरीक्षण केल्यावर तिची त्यांच्याबद्दलची अढी दृढावली. सामाजिक विषमतेची चीडहि तीव्रतर झाली. या वेळच्या तिच्या वृत्तीचें

प्रतिबिंब तिच्या पुढील उद्गारांत स्पष्ट दिसतें. एका पत्रांत तिनें लिहिलें: "संपत्तीनें ज्यांचा अधःपात झाला आहे, अशा लोकांचा संसर्ग मनुष्यानें आपणांस मुळींच होऊं देऊं नये."

मेरीच्या या नोकरीचें स्थळ बॉस्टंतच होतें. आपणास अनायासेंच घरीं राहतां येईल, आणि वडिलांचा व भावंडांचा सहवास लाभेल; शिवाय 'अनामिक' विद्यापीठाशीं संबंधहि राहील, व त्यामुळें व्यासंग वाढविण्यास संधि मिळेल असें तिला वाटत होतें. या साऱ्या अनुकूल वातावरणांत नोकरीचे कष्टहि जाणवणार नाहींत, अशीहि तिची कल्पना होती. पण या नोकरीनें आपलें उद्दिष्ट साधत नाहीं असें लवकरच तिच्या अनुभवास आलें. शहराच्या राहणीमुळें कांहींना कांहीं खर्च होतोच, आणि पडावा तसा पैसा मागें पडत नाहीं हें तिच्या ध्यानांत आलें. तेव्हां तिनें आपला बेत बदलला. एखाद्या लांबच्या खेड्यांत नोकरी मिळाली तर जावयाचें, असें तिनें मनाशीं योजलें. त्याप्रमाणें लौकरच तिला संधि पण मिळाली. आपल्या प्रियजनांना सोडून जावयाचें तिच्या अगदीं जिवावर आलें होतें, पण निरुपायानें तिनें मन घट्ट केलें आणि तोंडावर बळेंच हास्य आणून वडिलांचा निरोप घेतला.

आतां आपणांस खेड्यांतील रम्य वनश्रीचा आनंद उपभोगावयास मिळेल अशी या वेळीं तिची फार अपेक्षा होती, पण तीहि तशीच भंगली. तिच्या नोकरीचें गांव लहानसें खेडें होतें. सभोंवार एकरच्या एकर उसाची लागवड केलेली होती, आणि मध्यें एक साखरेचा कारखाना. सुदैवानें, ज्या कुटुंबांत ती येऊन दाखल झाली होती तेथील मुलें-माणसें तरी बरीं होतीं. कुटुंब-प्रमुख एका इस्टेटीचे व्यवस्थापक होते. ते स्वतः बरेच गबर होते. साखरेच्या कारखान्यांतहि त्यांची पाती होती. मालकीणबाईहि स्वभावानें गरीब होत्या, आणि मन्यास त्या आपलेपणानें वागवीत. मन्याला रोज सात तास मुलांना शिकवावें लागे. उरलेल्या वेळांत ती स्वतःचें लेखनवाचन करी. तिथल्या समाजांत ती मुळींच मिसळत नसे; यामुळें तिची कुचाळकी होई, पण तिला त्याची पर्वा नव्हती.

खेड्यांतील लोक स्वभावाप्रमाणेंच मागासलेले होते. अडाणीपणाबरोबर येणारे इतर दुर्गुणहि त्यांच्यांत होतेच. त्यांना कामाचा मनस्वी कंटाळा होता. नाच–तमाशांचा, गाण्या–बजावण्याचाच त्यांना षोक फार. तेंच वळण त्या खेडुतांच्या मुलांनाहि लागत होतें. पोलंडचा उद्धार, मजुरांचा प्रश्न इत्यादि शब्दहि त्या खेडुतांच्या कधीं कानांवरून गेले नव्हते. त्यांच्यापैकीं क्वचित् कोणीं ते ऐकले असतील, पण त्याबद्दल कधीं कोणाला आस्था नव्हती.

मेरीला ही स्थिति स्वस्थ बसून पाहवेना. लोकांना शिकवावयाचें, सज्ञान करावयाचें, इत्यादि बेत आपण आतांपर्यंत करीत आलों, मग ते येथें प्रत्यक्षांत कां आणूं नयेत ? निदान या शेतकऱ्यांच्या निरक्षर मुलांना तरी आपण मायबोलीचा, पोलिश लिपीचा आणि पोलंडच्या इतिहासाचा परिचय करून द्यावा, असें तिच्या मनानें घेतलें. तिनें आपली कल्पना कुटुंबांतली थोरली मुलगी ब्रोन्का हिजपाशीं बोलून दाखविली. तिला या कल्पनांची खूप गंमत वाटली, आणि कामास आरंभ करण्यास ती लगेच कबूल झाली.

त्या दोघींनीं मिळून लहान मुलांसाठीं लगेच एक वर्ग सुरू केला. कारखान्यांत काम करणाऱ्या मजुरांचीं आणि शेतकऱ्यांचीं बरींच मुलें त्या वर्गास येऊं लागलीं. तीं शरीरानें ओंगळ असावयाचीं. जवळ येतांच त्यांच्या अंगाची दुर्गंधीहि यावयाची. त्यांचें अभ्यासाकडे लक्ष लागत नसे. तीं शिकविलेलें लवकर विसरूनहि जात. पण मन्यानें या अडचणींना दाद दिली नाहीं. तिनें आपला प्रयत्न चालूच ठेवला. तिनें त्या मुलांत हळूहळू लिहिण्यावाचण्याची गोडी निर्माण केली. आपल्याला वाचतां येतें असें दिसल्याबरोबर त्या लहान मुलांना कोण आनंद झाला ! कांहीं तरी जादूच आपण शिकलों असें त्यांना वाटूं लागलें. त्यांच्या निरक्षर पालकांच्या मुखावर विस्मयता व कृतज्ञता दिसूं लागली. तें पाहून मेरीचें हृदय सानंद अभिमानानें भरून आलें.

पण हा आनंद फार वेळ टिकला नाहीं.

• • •

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ५४७१८ नों दि
नि.

## भोंवऱ्यांतून सुटका : : ६

आपला जीवनौघ अत्यंत संथ रीतीनें चालला आहे अशा गोड समाधानांत मनुष्य वावरत असतो, पण अगदीं अकस्मात् क्षितिजावर मेघखंड दिसूं लागतात. हे मेघ वादळ निर्माण करणार कीं घटकाभर सुखद सांवली देऊन शीतल जलबिंदूंनीं शांतता निर्माण करणार याची कल्पना येण्यापूर्वींच सोसाट्याचा वारा वाहूं लागतो, जीवनप्रवाहांत खळबळ सुरू होते, मोठमोठे भोंवरे निर्माण होतात, मनुष्य त्यांत गिरक्या खाऊं लागतो, आणि दूर तीरावरच इष्ट ठिकाणापर्यंत जीवितनौका जाऊन पोहोंचणार कीं नाहीं याबद्दल वानवा वाटूं लागते. जगाच्या एका कोपऱ्यांत अनुकूल कालाची वाट पाहात बसलेल्या मेरीच्या जीवनांत अशीच अनपेक्षित घटना घडली.

शाळा-कॉलेजांना उन्हाळ्याची सुटी लागली. मेरी ज्या कुटुंबांत नोकरीस होती, त्या कुटुंबांतील थोरला मुलगा कॅझिमिर हा सुटींत परत आला होता. सुटीच्या दिवसांत शहरांतून खेड्याकडे परतणाऱ्या विद्यार्थ्यांची स्थिति मोठी चमत्कारिक होते. शहरी वातावरणाच्या गजबजाटाशीं परिचित झालेलें मन खेड्यांतील शांततेनें उबून निघतें. मित्रांचा परिवार, सकाळ-सायंकाळ त्यांच्याशीं केलेल्या दिलखुलास गप्पा, हास्यविनोद,

याला येथें कांहींच अवसर नसतो. शहरांतील करमणुकीचीं साधनें येथें नसतात. जीं असतात तीं गांवढळ असें त्यांच्या नागरदृष्टीला (!) वाटूं लागतें. कॅझिमिरला मात्र घरीं येतांच एक नवीन अनुभव आला.

आपल्या ग्रामीण घरांत नि जीवनांत कांहीं तरी अपूर्वता आली असल्याचें त्याच्या तरुण मनास जाणवूं लागलें. घरांत नवजीवन खेळत असल्याची गोड अनुभूति त्याला होऊं लागली. आपल्या घरांत एक अपरिचित व्यक्ति वावरत आहे, तीच या नवलाईचें उगमस्थान होय हें निश्चित करण्यास त्याच्या मनास फार वेळ लागला नाहीं. सडपातळ बांधा, सतेज अंगकान्ति, किरमिजी सोनेरी रंगाचा विपुल केशसंभार, त्यांतून वायुलहरींशीं स्वैर साथ करणाऱ्या कांहीं बंडखोर कुरळ्या बटा, निळेभुरे डोळे, रोखून पाहण्याच्या संवयीमुळें करारी दिसणारी पण प्रेमळतेचा प्रत्यय अधिक देणारी सौम्य मुद्रा, अशा या व्यक्तीनें त्याचें लक्ष एकदोन भेटींतच वेधून घेतलें; पण या बाह्य आकर्षणाइतकीच त्या व्यक्तीची आंतरिक गुणसंपदाहि त्याचें मन लोभविण्यास कारणीभूत होती. त्या व्यक्तीच्या पोषाखांतील व राहणींतील साधेपणा यौवनवृत्तीशीं विसंगत असला तरी त्याची शोभा वाढवीतच होता. इतरांशीं वागतांना तिच्या वृत्तींत संयम दिसे. शिष्टाचार आणि सभ्यता हीं तिच्या कुलीन नागर संस्कारांची साक्ष देत. तिच्या संभाषणांत विदग्धता व चतुरपणा यांचें सुंदर संमिश्रण असे. प्रौढांत प्रौढतेनें वागणारी ही युवती आपल्या भावंडांशीं अत्यंत अल्लडपणेंहि वागते हें त्याच्या लक्षांत येण्यास वेळ लागला नाहीं. किंचित् अबोल वाटणारी ही व्यक्ति त्यांच्याशीं कोट्याविनोद करून मनमुराद हसते, तिला कविताहि रचतां येतात, ती घोडदौड जितक्या आवेशानें करते तितक्याच सफाईनें बर्फावर स्केटिंगहि करते, जलतरंगावर डुलणारी नाव जितक्या कौशल्यानें ती वल्हविते तितक्याच तन्मयतेनें ती नृत्य करूं शकते हें बघून तो मुग्ध झाला. थोडक्यांत, तिची कलासक्ति, मोहक संभाषणशैली,

आणि यौवनसुलभ उत्साह हीं त्याच्या तरुण रसिक मनाला भुलविण्यास पुरेशीं होतीं. आपल्या भावंडांची ही गृहशिक्षिका—मेरी स्क्लोडोवस्का-कॅझिमिरच्या सुसंस्कृत नागर दृष्टीला अद्भुतरम्य वाटली.

कॅझिमिरचें वय एकवीस-बावीस असेल. मेरीलाहि नुकतेंच एकोणिसावें वर्ष लागलें होतें. सृष्टींत अवतरणारा मधु—मास तिच्याहि हृदयांतील भावनांस अंकुरित करीत होता. कॅझिमिरच्या सान्निध्यांत त्या पल्लवित झाल्या. हीं दोन तरुण हृदयें एकमेकांकडे आकर्षिलीं गेलीं, परस्परांवर अनुरक्त झालीं. याच्या मुळाशीं केवळ प्रमादी यौवनच होतें असें म्हणतां येणार नाहीं. ह्या प्रेमग्रंथीला विवाह—रज्जूनें चिरबद्ध करावें अशी मेरीची दृढ इच्छा होती. तिच्या मनाची प्रवृत्तिच मुळीं स्थिरतेकडे, सातत्याकडे होती. उच्छृंखलतेला त्यांत यत्किंचितहि अवकाश नव्हता. कॅझीमिरनेंहि विवाहाचें अभिवचन दिलें. आपल्या मातापित्यांची अनुमति आपण सहज मिळवूं असा त्याला विश्वास होता.

पण कॅझिमिरचा विश्वास निराधार ठरला. कुलीनपणाच्या, सामाजिक प्रतिष्ठेच्या खोट्या व बुरसट कल्पना सरंजामी युगाचा वारसा घेऊन आलेल्या पिढीच्या मनावर आपला कसा अंमल चालवितात याची त्या बिचाऱ्याला कल्पना नव्हती.कॅझिमिरनें मोठ्या आशेनें आपल्या आईवडिलांजवळ आपलें मनोगत प्रकट केलें. आपला विवाहाचा संकल्प उच्चारला आणि एका क्षणांत भूकंपाचा धक्का बसून एखादा इमला कोसळावा त्याप्रमाणें त्याचे मनोरे ढासळले. त्याचें भाषण पुरें होतें न होतें तोंच त्याच्या वडिलांनीं विद्युत्स्फुल्लिंगाप्रमाणें जळजळीत शब्दांचा त्याजवर वर्षाव केला. "घरांत राबणाऱ्या एका गृहशिक्षिकेशीं—एका भिकारड्या मुलीशीं—लग्न ! लोक तोंडांत शेण घालतील आमच्या—श्रीमंत मुलींना काय तोटा पडलाय—आपला इतमाम, आपली अब्रू—" इ. इ. आपल्या मुलाची त्यांनीं यथास्थित निर्भर्त्सना केली. असल्या वेड्या थेरांपासून सावध राहण्यास त्याला त्यांनीं बजावलें. वडिलांच्या क्रोधाग्नींत जळून भस्म झालेलीं त्याचीं स्वप्नें आईच्या गंगा—यमुनांत विरघळून गेलीं.

कॅझिमिर कच्च्या दिलाचा होता. त्यानें माघार घेतली.

मेरीनें हा अपघात धैर्यानें व शांतपणें सहन केला. आपल्या अंतरंगांत माजलेली प्रचंड खळबळ तिनें एका अक्षरानें कोणास कळविली नाहीं. तिचा मनोनिग्रह दांडगा होता. तिनें वरकरणीं तरी कांहींच झालें नाहीं असें भासविलें. तिचें मुलांना शिकविणें पूर्ववत् चालू होतें. पूर्वीप्रमाणेंच ती कविता करी, बुद्धिबळें खेळे, नृत्यांत भाग घेई, सर्वांशीं हसून खेळून वागे. आपलें साक्षरतेचें कामहि तिनें सुरू ठेवलें होतें. आपला रसायन-शास्त्राचा अभ्यासहि मागें राहूं नये म्हणून फुरसतीच्या वेळीं ती झटत होती. शक्य तेवढ्या व्यापांत स्वतःला गुंतवून ती स्वतःला विसरण्याचा यत्न करीत होती.

पण तिचें मन मात्र आंतल्या आंत कुढत होतें. मनांतल्या विषण्ण वृत्ति शमत नव्हत्या. दिवसेंदिवस निराशेचें पटल दाट होत चाललें. आपलीं स्वप्नें अशींच वाऱ्यावर विरणार या विचारानें तिचें मन सुन्न होई. आपण चार पैसे शिल्लक टाकूं, पॅरिसला जाऊं, उच्च विद्याभ्यासाचा लाभ घेऊं—सारे वाळूंतील मनोरे! ब्रोन्याला करावी लागणारी आर्थिक मदत स्वतःच्या मार्गांतील आर्थिक अडचणींची, सुस्थितीच्या अशक्यतेची कल्पना आणून देत होती. वडिलांचा वृद्धापकाळ तिला भेडसावीत होता. एका दूरच्या खेड्यांत गांवढळ वातावरणांत प्रयोगशाळेच्या, पुस्तकांच्या आणि मार्गदर्शनाच्या अभावीं स्वतःचें शास्त्रीय ज्ञान वाढविणें तर राहोच, पण तें ताजें ठेवणेंहि किती दुष्कर आहे, याचा कटु अनुभव तिला येत होता. आणि त्यांतच भंगलेलें हें यौवनाचें गोड, निष्पाप स्वप्न! ती कांहीं त्यासाठीं मोठी आसुसली नव्हती! देवानेंच हा मधुर पेला तिच्या पुढें केला, आणि ओठाला लावण्यापूर्वींच हातांतून हिसकून खळकन् जमिनीवर आपटला. सारें मृगजळ! विद्ध हरिणीच्या व्याकुळतेनें ती धांवत होती. मेरीनें आपल्या मैत्रिणीला एका पत्रांत लिहिलें होतें :

“ माझे कसले आले आहेत बेत! जे आहेत ते इतके क्षुद्र कीं

त्याविषयीं चर्चा करण्यांत कांहीं राम नाहीं. ते सफल झाले तर ठीकच; नाहीं तर एक दिवस जगाला रामराम ठोकून मोकळें व्हावें, झालें. त्यामुळें जगाचें फारसें नुकसान होणार नाहीं आणि माझ्याहि दुःखाला विराम मिळेल !"

*    *    *

दुसऱ्या एका पत्रांत ती लिहिते :

"......थोडे दिवस तरी वॉर्सोला येण्यासाठीं माझें अन्तःकरण तळमळत आहे. माझ्या कपड्यांचीं लक्तरें झालीं आहेत, पण मला त्यांची फिकीर नाहीं. त्यांच्यापेक्षां माझ्या मनाच्याच चिंधड्या उडाल्या आहेत. मन थकून गेलं आहे. येथील सहानुभूतिशून्य जीवनाला मी विटल्यें आहे........"

*    *    *

मेरीला हवी असलेली संधि लवकरच मिळाली. श्री. झेड् यांजकडील तिचें काम संपतांच १८८९ च्या ईस्टरमध्यें तिनें झुझुस्कीला रामराम ठोकला. वॉर्सा येथें येतांच तिनें सुटकेचा श्वास तर सोडलाच, पण गृह-स्थितींत झालेल्या पालटामुळेंहि तिच्या मनाला थोडेंसें स्वास्थ्य लाभलें. तिच्या वडिलांना एका शाळेंत मुख्याध्यापकाची नोकरी मिळाली होती. वेतनहि बरें होतें. ब्रोन्याला आतां मदतीची गरज नव्हती; तिनें आपल्या जीवनाचा सहचर निवडला होता ! कॅझिमिर दलुस्की—जन्मानें पोल व व्यवसायानें वैद्यच. दोघांचा अभ्यास पूर्ण होतांच त्यांनीं विवाह करावयाचें ठरविलें होतें.

सुटी संपतांच मेरी नव्या नोकरीवर रुजू झाली. खऱ्या श्रीमंतीचा नूर काय असतो याची कल्पना तिला या वेळीं आली. तेथें असतांच तिला ब्रोन्याचें पत्र आलें. त्यांतील मजकूर अगदीं अनपेक्षित होता. "पॅरिसला यायचें लांबणीवर टाकूं नकोस, फीपुरते पैसे जमतांच निघून ये; बाकी सोय मी लावीन."

मेरीच्या मनाची स्थिति द्विधा झाली. एकीकडे पॅरिसची ओढ, विद्याभ्यासाची आवड व महत्त्वाकांक्षा, तर दुसरीकडे वडिलांचा वृद्धापकाळ, भावाबहिणींचें शिक्षण इत्यादींबद्दल आपली जबाबदारी. तिनें जवळ जवळ नकारात्मकच पत्राचें उत्तर लिहिलें. ब्रोन्यानें तिची परोपरीनें समजूत घातली, तेव्हां आणखी एक वर्ष नोकरी करून व फीपुरते पैसे सांठवून मग पॅरिसला जावयास ती कबूल झाली.

हा पुढला नोकरीचा काळ वॉर्सीतच गेल्यानें तिला आपला अभ्यास सुरू करण्याची संधि मिळाली. क्रकोविस्की बुलेवार्द नांवाच्या रस्त्यावर एका निवान्त बाजूस "शेतकी व औद्योगिक पदार्थसंग्रहालय" नांवाची संस्था होती. नांव पदार्थसंग्रहालय असें मुद्दामच दिलें होतें, पण संस्थेचा खरा उद्देश पोलिश तरुण-तरुणींना शास्त्रीय ज्ञानाचे पाठ सप्रयोग देण्याचा होता. सायंकाळीं जो काय वेळ मिळेल तो—अथवा रविवारचा वेळ मेरी त्या प्रयोगशाळेंत घालवूं लागली.

मेरीला आतां स्वस्थता लाभल्यासारखें दिसत असलें तरी तिचें मन वरून स्तब्ध दिसणाऱ्या ज्वालामुखीसारखें झालें होतें. पित्याचें सान्निध्य आणि सेवा यांच्यामुळें तिला समाधान वाटत असलें तरी स्वतःच्या भवितव्याच्या विचारानें तिचें मन अस्वस्थ होत असे. जोसेफचा विवाह पार पाडण्याच्या ती खटपटींत होती; हेलाला चांगली नोकरी मिळून तिचें आसन स्थिर व्हावें म्हणून तिचा यत्न सुरू होता; पण आपल्या भवितव्याची रेषा कोणती दिशा घेणार याचा तिला अंदाज येत नव्हता. शास्त्रीय प्रयोग करूं लागल्यापासून तर तिची ही अस्वस्थता विशेषच वाढली होती. हें ज्ञान आपण संपादन केलेंच पाहिजे, हाच आपला मार्ग आहे, अशी एक अनिवार्य लालसा—एक प्रबळ ओढ तिच्या अंतःकरणांत निर्माण झाली होती. लहानपणीं वडिलांच्या उपकरणांशीं आपण कसें खेळत असूं, याच्या आठवणी तिला येत. आपण आतां अभ्यासाला सुरुवात केलीच आहे, येथें न थांबतां पुढें गेलेंच पाहिजे, या विचारानें

ती अस्थिर होई. अशा बेचैन स्थितींत ती रात्रीच्या रात्रीं अंथरुणावर तळमळत पडे.

आणि कॅझिमिर—? तें यौवनांतील स्वप्न कायमचेंच भंगलें होतें काय? चूक. एकदां शहानिशा करण्यासाठीं तिचें मन धडपडत होतें. पॅरिसला जाणें दिवसगतीवर टाकण्यांत हाहि एक उद्देश असेल काय?

पॅरिसला जाण्यापूर्वी या प्रश्नाचा सोक्षमोक्ष करून घेण्याचा मेरीनें निर्धार केला. उन्हाळ्याच्या सुटींत कार्पेथिअन पर्वतराजींतील झॅकोपेन या हवेच्या ठिकाणीं ती गेली. तिच्या अपेक्षेप्रमाणें कॅझिमिरची व तिची भेटहि झाली. मेरीनें त्याचें मन वळविण्याचा शिकस्तीचा प्रयत्न केला, पण आपल्या आईवडिलांच्या मनाविरुद्ध जाण्याची आपली तयारी होत नसल्याचें अखेर तिला कॅझिमिरकडून उत्तर मिळालें. या त्याच्या कातर-वृत्तीची मेरीला चीड आली. "तुम्ही पुरुषासारखे पुरुष असून व मी इतकी जबाबदारी घेण्यास तयार असून तुमचा धीर होत नसेल, तर मला तरी काय करायचें आहे?" असें बाणेदारपणाचें उत्तर देऊन या प्रकरणावर तिनें अखेरचा पडदा टाकला. या शोकांतिकेचा परिणाम तिच्या प्रकृतीवर झाल्याशिवाय राहिला नाहीं. एक लहानसें दुखणें तिनें काढलेंच. तिच्या वृद्ध पित्यालाच काय ती यांतली माहिती होती. ब्रोन्या-प्रमाणेंच 'मन्या'लाहि 'कॅझिमिर' लाभला तर दोघींचा जीवनप्रवास सुखकर होईल असें त्यांना वाटत होतें. पण तशी विधियोजना नव्हती.

मेरीनें सुटींतून परत येतांच ब्रोन्याला निर्वाणीचा खलिता धाडला :

> "माझी येण्याइतकी आतां तयारी आहे, पण माझी तुम्हांला अडचण होणार नसेल तरच मी येईन. तुझे बाळंतपणाचे दिवस जवळ येत आहेत. झालाच तर माझा तुला थोडा उपयोग होईल पण नीट विचार करून स्पष्ट खुलासेवार काय तें कळव. मला तुझ्या घरचा कुठलाहि कोपरा आसऱ्याला मिळाला तरी चालेल. मला यावयाला मिळेल तर ज्या दारुण मानसिक यातना मीं या

**सुटींत भोगल्या त्यांतून माझी सुटका होईल. माझ्या मनाला शांतता लाभेल...... "**

पत्राचें उत्तर तारेनें पाठविण्याचें ब्रोन्याच्या मनांत आलें. पण ब्रोन्या तार करूं शकली नाहीं. मात्र पत्राचें उत्तर तार समजून निघून ये म्हणून तिनें कळविलें.

ब्रोन्याच्या सूचनांनुसार बरोबर नेण्याच्या सामानसुमानाची सिद्धता करून तिनें वडिलांचा आशीर्वाद मागितला. तिनें वडिलांचें पुनः पुनः समाधान केलें;—खरें म्हणजे स्वतःचेंच ती समाधान करीत होती. " मी लवकर परत येईन. अभ्यास झाला, एक दोन परीक्षा दिल्या कीं लगेच येईन. मग मात्र आपण एकत्र राहूं " म्हणून ती सांगत होती. प्रा. लादि-स्लावहि घोगऱ्या आवाजांत हुंकार देत होते. त्यांनीं मुलीला आपल्या हृदयाशीं कवटाळलें, आणि तोंड भरून आशीर्वाद दिला.

रात्रींच्या अंधकारांतून गाडी आपला मार्ग आक्रमीत होती. एका भोंवऱ्यांतून सुटका झाल्याच्या समाधानाचा सुस्कारा मन्या टाकीत होती. गतकालाचा चित्रपट तिच्या डोळ्यांसमोरून जात होता. भविष्य-कालाचा ठाव तिचें मन घेऊं पाहात होतें. शिक्षिकेचा पेशा, वडिलांची सेवा, यापेक्षां तिच्या आकांक्षा मोठ्या नव्हत्या.

पण नियती मात्र तिच्यासाठीं भव्य मंदिर उभवीत होती. तिचा जीवन-रथ 'काळोखाच्या दाट घटांतुनि' कर्तृत्वाच्या, कीर्तीच्या झगझगीत प्रकाशाकडे जात होता.

• • •

## पॅरिसच्या परिसरांत : : ७

पॅरिस ! या नांवांत काय मोहिनी भरली होती ! साऱ्या युरोपमधील जनता त्या नांवाला भुलून जात होती. पॅरिस हें युरोपचें स्फूर्तिस्थान होतें. पॅरिस नवविचारांची जननी होती. पॅरिस स्वातंत्र्यदेवतेचें निवासस्थान होतें. गुलामगिरीच्या जोखडांनीं जखडलेल्या दलित राष्ट्रांतील तरुणांना पॅरिस नगरी म्हणजे केवढें आशास्थान वाटे ! मानवतेच्या गुलामगिरीच्या शृंखला तोडणारे घण प्रथम फ्रान्समध्यें निर्माण झाले. सामान्य जनतेच्या आकांक्षांचा पहिला उद्गार येथें बाहेर पडला. स्वातंत्र्य, समता, बंधुता ह्या मानवाला प्रगतीच्या मार्गांत पुढें नेणाऱ्या त्रयींचा जन्म येथें झाला. पॅरिसचें नांव उच्चारलें कीं तरुणांचीं अंतःकरणें चैतन्य, आत्मविश्वास, आशा यांनीं भरून जात. मनुष्याला येथें मान ताठ करून चालतां येतें ! स्वतःची भाषा बोलतां येते ! हव्या त्या पुस्तकाचा परिचय मनमोकळेपणें करून घेतां येतो ! जगांतील उत्तमोत्तम ग्रंथांचा क्रयविक्रय येथें खुल्या बाजारांत होऊं शकतो ! सारें नवलच ! स्वातंत्र्याचें वातावरण स्वतंत्र देशांत कसें असतें याचा मेरी स्क्लोडोवस्का प्रथमच अनुभव घेत होती. स्वातंत्र्याच्या वातावरणांत श्वास घेऊन तिचें हृदय फुलून उठलें होतें !

आणि हे सोर्बोनकडे जाणारे रस्ते ! जगाची चिमुकली प्रतिमा, थोर थोर आचार्यांची व ज्ञानोपासकांची तपोभूमि, युरोपमधील साऱ्या विद्वत्तेचें माहेरघर, आणि ज्याकडे आपण इतके दिवस डोळे लावून बसलों होतों तो हा ध्रुवतारा — सोर्बोनचें विश्वविद्यालय तें हेंच ! सारेंच नवीन, सारेंच अद्भुत. ती भोंवतालचें जग विसरली. दीड-दोन हजार मैलांच्या प्रवासाचे तिचे सारे श्रम कुठच्या कुठें पळाले. आपण स्वप्नसृष्टींत वावरत आहों असा तिला भास झाला. ती बावरली. तिची धांदल उडाली. त्या धांदलींत शेजारच्या माणसास आपला धक्का लागतो आहे, हेंहि जरा वेळानेंच तिच्या लक्षांत आलें. मोडक्यातोडक्या फ्रेंचमध्यें त्याची क्षमा मागून आपली कातडी पिशवी सावरीत विश्वविद्यालयाच्या एका इमारतीसमोर ती येऊन उभी राहिली.

**फ्रेंच प्रजासत्ताक**

**शास्त्रविभाग — पहिली तिमाही**

**३ नोव्हें. '९१ पासून सोर्बोन येथें वर्ग सुरू होतील**

किती आशाळभूतपणानें, कौतुकानें ते शब्द तिनें पुनःपुनः वाचले. सोर्बोनच्या विश्वविद्यालयाच्या नवीन इमारतीचें काम सुरू होतें. सर्वत्र दगड, विटा, चुनखडी यांचा पसारा पडला होता. या खोलींतून त्या खोलींत वर्ग हालवावे लागत होते. रु. सें. जेकसच्या पडक्या वाड्यांत प्रयोगशाळा तूर्त उभारल्या होत्या. पण या बाह्य गोष्टींनीं मेरीच्या आनंदांत व्यत्यय आला नाहीं. स्वतःच्या कष्टानें कमविलेल्या, एक एक रुबल करून सांचविलेल्या अल्पशा निधीच्या आधारावर जगांतल्या एका प्रतिष्ठित विद्यापीठांत दाखल होण्याची संधि तिनें खेंचून आणली होती. ती आतां शास्त्रविभागांतली विद्यार्थिनी होती. प्रयोगशाळेंत तिला हवीं तीं उपकरणीं हाताळण्याचा अधिकार होता. अमक्यास हात लावायचा नाहीं, अमुक वाचावयाचें नाहीं असें तिला बंधन नव्हतें. खूप वाचावें, चर्चा करावी, प्रयोग करावेत, अपयशानें नाउमेद न होतां पुनः यत्न करून पाहण्यास प्रोत्साहन

मिळवावें, यशानें श्रमाचा विसर पडून उत्साह द्विगुणित व्हावा—अशा ज्ञानार्जनाला सर्वस्वीं अनुकूल आणि मनोरम वातावरणांत येऊन ती उतरली होती. तिचा आनन्द व उत्साह दुथडी भरून वाहात होता.

या कॉलेजच्या वातावरणांत मन्या अथवा मेरीबद्दल युवकवर्गांत मोठें कुतूहल निर्माण झालें. तिच्या स्क्लोडोवस्का नांवाच्या वर्णमालेचा उच्चार कोणास जमत नव्हता. 'मेरी' या खाजगी नांवानें संबोधण्याइतकी घसट ती कोणाशीं होऊं देत नव्हती. त्यामुळें ती त्या जगांत 'अनामिका'च राहिली. विद्यार्थी आपसांत तिजविषयीं कुजबुजत. कोणी तिच्या सुंदर कुरळ्या केसांचा उल्लेख करीत. कोणी पदार्थविज्ञानाच्या वर्गांत पहिल्या रांगेंत बसणारी म्हणून तिला ओळखीत. मेरीचा चेहरा लाजाळू असे, पण त्यावर निग्रहीपणाची छाप होती. तिचा पोषाख साधाच पण नीटनेटका असे. त्यांतूनहि तिची सोशिकता व्यक्त होई. परक्या देशांतील 'कुणी' तरी भुऱ्या केसाची एक तरुणी, यापलीकडे बरेच दिवसपर्यंत मेरीला कोणी ओळखत नव्हतें. पॅरिसला आल्यावर आपली तयारीहि अपुरी असल्याचें तिला आढळलें. त्यामुळें तिचें मन थोडें कष्टी झालें. आपलें फ्रेंच भाषेवर प्रभुत्व आहे असा तिला अभिमान होता तो पहिल्याच आठवड्यांत मावळला. भराभरा बोललेलें तें भाषण तिला लवकर समजत नसे. शास्त्रीय अभ्यासांत तर यापेक्षांहि तिची तारांबळ उडाली. शाळेंतून बाहेर पडल्यावर तिनें आपलें वाचन चालू ठेवलें होतें; शिक्षिकेचा व्यवसाय सांभाळून तिनें फावल्या वेळांत प्रयोगहि केले होते. वडिलांना पत्रद्वारां आपल्या प्रगतीचा आढावा देऊन त्यांचें मार्गदर्शनहि वेळोवेळीं मिळविलें होतें. पण पॅरिसच्या शाळेमधून मिळणाऱ्या पायाशुद्ध आणि भरगच्च ज्ञानापुढें हें ज्ञान तुटपुंजें ठरूं लागलें. पण मेरीनें ही उणीव लवकरच भरून काढली.

मेरी विश्वविद्यालयाच्या वातावरणांत लवकरच रंगून गेली. प्राध्यापकांचीं व्याख्यानें म्हणजे तिला पंचपक्वान्नांची मेजवानी वाटे. भोंवतालचें वातावरणहि निर्मळ, सोज्ज्वळ होतें. व्याख्यानाच्या वेळीं वर्गांत अगदीं गंभीर

शांतता असावयाची. जो तो मान खालीं घालून टिपणें घेण्यांत गर्क असावयाचा किंवा एकाग्र मनानें श्रवण करीत असावयाचा. विद्यार्थ्यांचे चेहरे आनंदानें प्रफुल्लित दिसावयाचे. विद्यादेवीचे खरेखुरे भक्त तेथें जमत. छचोरपणा, थिल्लरपणा यांना यत्किंचितहि तेथें वाव नव्हता. शास्त्राची प्रगति, विद्येची प्रतिष्ठा यांची महती ते ओळखत होते. पॅरिस रंगेल असेल, पण सोर्बोर्न गंभीर होतें.

तेथील प्राध्यापकांनीं मेरीला विलक्षण मोहिनी घातली होती. त्यांचे ते सतेज दाढीदार चेहरे, पाणीदार व किंचित् लुकलुकणारे – आपल्याच विचारसृष्टींत मग्न असल्याची साक्ष देणारे स्वप्नाळू डोळे, स्निग्धगंभीर आवाज, तर्कशुद्ध विचार, कितीहि गहन विषय असला तरी तो सुलभ करण्याची हातोटी, आणि मुख्य म्हणजे त्यांचें अपरंपार ज्ञान.—ज्ञानाच्या केवढ्या विशाल क्षेत्रांत हे लीलेनें संचार करतात! आकाशांतील तारे, त्यांच्या गति, त्यांचे वेध, खगोल शास्त्रांतील केवढालीं कूटें, पण तें सारें भांडार यांच्या जिव्हाग्रीं आहे. अनंत आकाशांत क्षणार्धांत झेप घेणाऱ्या गरुडाची धडक आणि पंखांची उभारी – दोन्ही यांच्या बुद्धींत आहे. तें पॉल ॲपेलचें व्याख्यान तिच्या कानांत अजूनहि घुमत आहे. काय तो त्यांचा खणखणीत आवाज! आणि काय तो आत्मविश्वासपूर्ण अभिनय! दोनचार शब्दांच्या फटकाऱ्यासरशीं तारागोलांचीं नयनमनोहर चित्रें श्रोत्यांसमोर उभीं करण्याची त्यांची ती वक्तृत्वकला! आणि त्यांचे ते साभिनय काढलेले उद्गार – 'हा सूर्य घेतला आणि असा फेकला....'

'हा सूर्य घेतला आणि असा फेकला—' केवढा आत्मविश्वास, केवढें ज्ञानाचें प्रभुत्व! मेरीचे डोळे आनंदानें चमकत होते. त्यांचा तो दांडगा उत्साह, त्याच्या उन्मेषशाली बुद्धीची ती पल्लेदार भरारी, या गोष्टी पाहून ती स्वतःशींच म्हणे, "कोण म्हणतें शास्त्र, गणित हे विषय रुक्ष आहेत? विश्वाच्या नियमनाचें कोडें किती गूढ, आणि तें सोडविणारें मानवी मन किती विस्मयजनक! विश्वाच्या चिरंतन अपरि-

वर्तनीय नियमांपेक्षां सृष्टींत अधिक भव्य, रोमांचकारी काय आहे! विश्वाचा ठाव घेऊं पाहणाऱ्या, अज्ञातांत स्वैर संचार करणाऱ्या मानवी प्रतिभेचें कौतुक किती करावें? शास्त्रांच्या ज्ञानांत जी विविधता आहे, जी सारवत्ता आहे, जी रसवत्ता आहे, त्याची सर कथा-कादंबऱ्यांना कोठून येणार? कल्पित पऱ्यांच्या सृष्टीपेक्षां येथें अद्‌भुतता अधिक, कादंबऱ्यांपेक्षां मनोरमता आणि प्रतिभेची चमक अधिक." सृष्टीच्या विविधतेंत– अवाढव्य पसाऱ्यांत दिसून येणारी एकता, एकसूत्रीपणा मेरीला मोहवीत होता. त्यासाठीं– 'हा सूर्य फेकला–' अशी जादूची वाणी ऐकण्यासाठीं आपल्या पितृभूमीचा, पित्याचा विरह सोडून हाल-अपेष्टा सोसण्यास तिची सतत तयारी होती.

* * *

मेरीचा पॅरिसमधील मुक्काम तिची बहीण ब्रोन्या इजकडेच होता. मेरी पॅरिसला आली तेव्हां ब्रोन्या पोलंडला गेली होती. तिचे मेहुणे डॉ. कॅझिमिर दुलुस्की यांनीं मेरीचें मोठ्या आनंदानें स्वागत केलें. डॉ. दुलुस्की दिसावयास देखणे होते, तसेच अत्यंत बुद्धिमानहि होते. त्यांचा स्वभाव विनोदप्रिय होता. ब्रोन्याची निवड मेरीला अतिशय आवडली. डॉ. दुलुस्की हे एक पोलिश निर्वासित होते. दुसऱ्या अलेक्झँडरच्या खुनांत अंग असल्याचा त्यांजवर आरोप आल्यानें रशियांतून त्यांना पळ काढावा लागला होता. त्यांनीं जिनिव्हामधील क्रांतिकारकांच्या प्रसिद्धि-खात्यांत काम केलें. नंतर पॅरिसमधील राज्यशास्त्राच्या विद्यालयांत अभ्यास केला. पुढें वैद्यकी शिकले आणि डॉक्टर बनले. पोलंडमध्यें त्यांचा जमीनजुमला, घरदार व आप्तेष्ट मंडळी होती; पण तेथें ते परतूं शकत नव्हते; आणि झारच्या पोलिस खात्याच्या कारवायांमुळें पॅरिसचेहि नागरिक बनणें त्यांना कठीण होऊन बसलें होतें.

सायंकाळचा वेळ अगदीं मौजेंत घालवावयाचा असा डॉ. दुलुस्की यांचा परिपाठ असे. दिवसभर कितीहि कष्ट करावे लागले तरी या निय-

मांत त्यांनीं खंड पडूं दिला नाहीं. कधीं नाटकाला तर कधीं गाण्याला ते सर्वांसह जात. बाहेर कधींच कार्यक्रम नसला तर ते स्वतः घरीं पियानो वाजवीत. त्यांना पियानो उत्तम वाजवितां येत होता. कधीं कधीं पॅरिसमधल्या पोलिश वसाहतींतली मंडळी सायंकाळीं त्यांच्याकडे जमावयाची. ब्रोन्याहि त्यांत उत्साहानें भाग घ्यावयाची. चहा, मधूनमधून त्याजबरोबर इतर फराळाचे पदार्थ—यांत त्यांचा वेळ आनंदानें जात असे.

या नव्या आयुष्यक्रमांत मेरी रंगून गेली. जें जें नवीन दिसेल त्याचें सोल्हास स्वागत करावयाचें, त्याचा सोत्साह आस्वाद घ्यावयाचा, असा तिचा स्वभाव बनला. स्नेहीमंडळींच्या सहवासाचा आनंद काय असतो याचा ती नव्यानें अनुभव घेऊं लागली. तिच्या आतां बऱ्याच नवीन ओळखी झाल्या होत्या. ही स्नेहीमंडळी बहुतेक पोलिश निर्वासित देशभक्त होते. क्रेस्कोस्का आणि डिडिन्स्का या दोन गणितज्ञ विदुषी त्यांत होत्या. डॉ. मोझ हे तिच्या स्नेहीमंडळांत होते. तसेच स्टेनिस्लॅव सॅलाय—ज्यांचा पुढें हेलाशीं विवाह होऊन स्क्लोडोवस्की कुटुंबाशीं संबंध आला ते—ह्यांचाहि याच वेळीं तिचा परिचय झाला. त्याप्रमाणें पोलिश प्रजासत्ताकाचा भावी अध्यक्ष वोसिकोस्की या तरुणाशींहि तिची येथें ओळख झाली.

ही स्नेहीमंडळी मधूनमधून आपलीं संमेलनें भरवीत. ख्रिसमस सणाच्या मेजवान्या करीत. त्या निमित्तानें लहान लहान नाट्यप्रयोग बसवीत. तो सर्व कार्यक्रम पोलिश भाषेंतच छापला जाई हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्या कार्यक्रमावर प्रतीकात्मक चित्रेंहि असत. एकदां त्यावर पोलंडच्या स्थितीचें निदर्शक चित्र पुढील प्रतीकानें रेखाटण्यांत आलें होतें. एका बर्फाच्छादित मैदानांत एक झोपडी उभी आहे. एका बाजूला एका माळ्यावर एक तरुण मुलगा समोर पुस्तकें पसरून बसला आहे. कुठल्या तरी विचारस्वप्नांत गुंग झाल्यासारखी त्याची मुद्रा दिसत आहे. एका बाजूला 'फादर ख्रिसमस' एका धुराड्यांतून शास्त्रीय पुस्तकें प्रयोगशाळेंत टाकीत आहे. एका कोपऱ्यांत कांहीं उंदीर एक रिकामी पोतडी कुरतडीत आहेत !

मेरी या सर्वांत भाग घेई. भाषणें व कविता पाठ करून नाटकांत काम करण्याइतकी तिला सवड नव्हती. पण एकदां तिनें मूकाभिनयांत भाग घेतला होता. ‘ गुलामगिरीच्या शृंखला तोडणारें पोलंड ’ असें त्या दृश्याचें नांव होतें. वासिकोस्की नांवाच्या शिल्पकारानें त्या प्रसंगाची कल्पना व योजना आखली होती.

पण अशा रीतीनें मेरीनें सामाजिक कार्यक्रमांत भाग घेऊन अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत यावें ही गोष्ट तिच्या वडिलांना आवडली नाही. त्यांनीं लगेच याचे दुष्परिणाम भविष्यकाळीं काय होतील, मेरीला पोलंडमध्यें जीवन कंठणें कसें दुष्कर होईल हें तिच्या निदर्शनास आणलें. या पत्रामुळें म्हणा वा असल्या गोष्टींचें वैय्यर्थ्य पटल्यामुळें म्हणा, या गोष्टी आपल्या प्रगतीच्या आड येणार हें मेरीनें ओळखलें. आपण आपला सर्व वेळ अभ्यासांत घालविला पाहिजे याची तिला तीव्रतेनें जाणीव झाली.

नवीन दिनचर्या सुरू करावयाची तर तिला आपलें बिऱ्हाड बदलणें भाग होतें. ब्रोन्याकडे राहणें सुखावह होतें हें खरें. स्वच्छ वसती, सुंदर वातावरण, भोंवतीं प्रेमळ सगेस्नेही. पण अभ्यासाला लागणारा एकान्त येथें मिळणें दुरापास्त होतें. कॅझिमिरचा पियानो होता; डॉ. दुलुस्की किंवा ब्रोन्या यांजकडे रोग्यांची रहदारी असावयाची. मध्यरात्रींदेखील त्यांना घेऊन जाण्यासाठीं मंडळी येत. याला आळा कसा घालावयाचा? शिवाय येथून सोर्बोन एक तासाच्या अंतरावर. त्याकरितां रोज भाडेंखर्चाहि लागावयाचा तो वेगळाच. तेव्हां कॉलेजजवळच्या लॅटिन वसाहतींतच तिनें खोली घेण्याचा आपला मनोदय आपल्या बहिणीस व मेहुण्यास सांगितला. तेथून कॉलेज आणि प्रयोगशाळा तिला जवळ पडणार होती. वाचनालयांतहि तिला हवें तेव्हां जातां येणार होतें.

बहिणीचें निवासस्थान सोडतांना मेरीला फार वाईट वाटलें.

• • •

# कुतो विद्यार्थिनः सुखम् ? : : ८

येथून पुढील चार वर्षे मेरीच्या जीवनांत अत्यंत कष्टाचीं पण तितकींच मानसिक आनंदाचीं गेलीं. ध्येयवादी माणसें शारीरिक कष्टाला व भौतिक अडचणींना न जुमानतां आपल्या ध्येयप्राप्तीसाठीं अविरत झटत असतात. हा प्रयत्नाचा काळ त्यांना अत्यंत सुखाचा वाटत असतो. संकटें जसजशीं उग्रतर स्वरूप धारण करतील, तसतसें ध्येयवादी व्यक्तींना अधिकच स्फुरण चढतें. सर्वस्व पणाला लावून परिस्थितीचें आव्हान तीं स्वीकारतात. जितका त्याग अधिक, तितका यशाचा आनंदहि मोठा; आणि तितकीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची उंचीहि अधिक असल्याचा जगाला येणारा प्रत्यय निश्चित.

विद्यादेवीचे निस्सीम उपासक तिचा अनुग्रह व्हावा म्हणून किती हाल-अपेष्टा सहन करतात, विद्यानंदापुढें शरीरसौख्याची त्यांस कशी मातब्बरी वाटत नाहीं, याचें मेरीचें जीवन म्हणजे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. उपमन्यु आणि नचिकेत यांच्या परंपरेचा अभिमान बाळगणाऱ्यांना या गोष्टी नवीन नसल्या तरी अठराव्या शतकांतील एका पददलित राष्ट्रांतील एक युवती पॅरिससारख्या मोहमय नगरींत असें जीवन कंठिते, ही गोष्ट निस्संशय मेरीबद्दल आदर वाटावयास लावणारी आहे.

मेरीनें एकान्तवासाची जणूं दीक्षा घेतली होती. तिला पॅरिसमध्यें मित्र मोजकेच होते. नवीन फारसे तिनें मिळवलेच नाहींत. आप्तांपैकीं बहीण व मेहुणा हीं दोघेंच, पण या साऱ्यांचा सहवास तिनें वर्ज केला. कॉलेजांत अंवतींभंवतीं वावरणारे विद्यार्थी तिच्या दृष्टीनें असून नसल्यासारखेच होते. आपली प्रयोगशाळा, आपलें वाचनालय, आपली खोली व अभ्यासाचीं पुस्तकें – एवढेंच काय तें तिचें जग. एखाद्या आश्रमवासी योगिनिप्रमाणें ती आपलें जीवन सरस्वतीच्या सेवेंत घालवीत होती. तिच्या वृत्तीचें वर्णन करावयाला समर्पक शब्द म्हणजे–'संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः।' हेच होत.

मेरीची राहणी अत्यंत साधेपणाची होती, हें नव्यानें सांगावयास नकोच. मेरीनें आपल्याजवळच्या पुंजीचा अंदाज घेतला. पॅरिसमधल्या एकंदर शिक्षणक्रमाला लागणाऱ्या कालावधीचा व शिल्केचा मेळ बसवितां दर महिन्याकांठीं फक्त चाळीस रुबल्स–रोजीं तीन फ्रँक–आपण खर्च करूं शकूं हें तिला कळून चुकलें. डॉ. दुलुस्कींचें घर सोडल्यानें घरभाडें, जेवणखर्च इत्यादि साऱ्याच गोष्टी यांत तिला बसवावयाच्या होत्या. कॉलेजची फी, पुस्तकांचा खर्च, कपडालत्ता यांचीहि वर्णी यांतच. हें एक मोठें दिव्य होतें. या अल्प द्रव्यांत निर्वाह म्हणजे उपासमारच – हें सांगायला मोठ्या हिशोबाची गरज नव्हती.

मेरी ज्या लॅटिन वसाहतींत राहावयास गेली, तेथें गरिबींत दिवस कंठणारे अनेक पोलिश तरुण होते; पण गरिबीची झळ टाळण्यासाठीं अनेक युक्त्याप्रयुक्त्यांचा अवलंब ते करीत. खोलीच्या भाड्यांत बचत होण्यासाठीं चार-चार पांच-पांच विद्यार्थी एकत्र राहात. हातानें स्वयंपाक करीत. कोणी इतरांकडे स्वयंपाक वा इतर घरकाम करून कांहीं पैसे मिळवीत व शिक्षणखर्च भागवीत. क्वचित् एक वेळच्या भोजनासहि त्यांस फांटा द्यावाच लागे. ब्रोन्याहि याच परिस्थितींतून गेली होती. याच वेळीं तिच्या पाककौशल्याची सर्वांस ओळख पटली. आईच्या मृत्यूनंतर

शिरावर घेतलेल्या प्रापंचिक ओझ्यांतला अनुभव या वेळीं तिच्या कामीं आला होता.

पण मेरीला हे मार्ग रुचणें कठीण होतें. आपल्या खोलींत इतर विद्यार्थ्यांना घेऊन आपलें एकान्तवासाचें सौख्य गमावण्यास ती मुळींच तयार नव्हती. पाकनिष्पत्तीचा तिला यत्किंचितहि अनुभव नव्हता; आणि आपल्या जिभेचे चोचले या वेळीं पुरविण्याच्या मनस्थितींत ती नव्हती. लहानपणीं स्वतःच्या घरीं चूल फुंकण्याची तिजवर कधीं पाळी आली नव्हती. गृहशिक्षिकेचा व्यवसाय करीत असतां तिला या कामाची कधींच आवश्यकता भासली नाहीं व फुरसतहि मिळाली नाहीं. त्यामुळें तिच्या पाकशास्त्राच्या ज्ञानाच्या बाबतींत "स्क्लोडोव्स्का बाईंना कढी कशाची करतात हेंसुद्धां माहीत नाहीं" – असा प्रवाद भोंवतालच्या मंडळींत पसरला असला तर नवल नाहीं! ही गोष्ट मेरीला खरोखरच माहीत नव्हती; आणि माहीत करून घेण्याची गरजहि तिला वाटली नाहीं. पाकविद्येचीं प्रमेयें समजावून घेण्यांत जो वेळ घालवायाचा तेवढ्या वेळांत पदार्थविज्ञानाच्या पुस्तकाचीं किती तरी पानें ती वाचूं शकत होती! प्रयोगशाळेंत किती तरी मनोवेधक शास्त्रीय प्रयोग तिला करतां येणार होते!

एका मध्यम कुटुंबाच्या घरांत माळेवजा खोलींत मेरीनें आपलें बिऱ्हाड थाटलें. तो माळा सहाव्या मजल्यावर होता. छप्पराच्या झरोक्यांतून आणि त्यालगतच्या एका गवाक्षांतून येईल तेवढाच उजेड. खोली उबदार राखण्यासाठीं भट्टीची सोय तेथें नव्हती. पाणी तळमजल्यावरून आणावें लागे. मेरीचें सामानसुमानहि मोजकेंच होतें. एक लोखंडी घडीची खाट, त्यावर अंथरण्यासाठीं एक सतरंजी, एक लाकडी टेबल, एक स्टोव्ह, एक पेट्रोलियमचा दिवा, पाणी भरण्यासाठीं एक माठ, सांडपाण्यासाठीं चिनी मातीचें तसराळें, दोन बशा, एक चमचा, कांटा व पेला. पाहुणे आलेच तर त्यांसाठीं तीन कांचेचे पेले!

मेरीनें शक्य तेवढ्या खर्चांना कातरी लावली. प्रयोगशाळा पंधरा मिनि-

टांच्या रस्त्यावर आल्यानें वाहनखर्च कमी झाला. जेवणखाणाचा पसारा नसल्यानें मोलकरणीची गरज नव्हती. हिंवाळ्यांत कोळसा कमी लागावा म्हणून ती कुडकुडत दिवस काढी; झोंपतांना सारे कपडे लपेटून घेई; आणि तेवढ्यावर नच भागलें तर खुर्चीहि अंगावर ओढून घ्यावयास कमी करीत नसे. रात्रीं तेल कमी जळावें म्हणून वाचनालयांत दहा वाजेपर्यंत वाचीत बसे. पोलंडहून आणलेलेच कपडे पुनः पुनः दुरुस्त करून तिनें चार वर्षे वापरले. छानछोकीसाठीं प्रसिद्ध असलेल्या पॅरिस-मध्यें अशा राहणीसाठीं तिला विशेष संयम करावा लागला असेंहि नाहीं. तिच्या मनावरील संस्कारामुळें म्हणा अथवा तिच्या प्रखर ध्येयनिष्ठेमुळें म्हणा—या गोष्टी तिला कधीं भुलवूंच शकल्या नाहींत.

मेरीची दिनचर्या एखाद्या यंत्रासारखी सुरू असे. तिचा दिवसाचा सारा वेळ कॉलेज, प्रयोगशाळा व वाचनालय येथेंच जाई. रात्रीं वाचना-लयाचे दरवाजे बंद होण्याची वेळ झाली कीं तिला उठणेंच भाग असे. त्यापुढें मध्यरात्रीपर्यंत तिचें वाचन सुरू असे. डोळे अगदीं चुरचुरूं लागून वाचणें अशक्य झालें म्हणजे ती दिवा मालवी. सकाळच्या वेळीं भूमितीच्या आकृत्या काढण्यांत व समीकरणें सोडविण्यांत ती इतकी मग्न होऊन जाई कीं, तिला दोन दोन दिवस शेगडी पेटविण्याचें भान राहात नसे. आणि आठवण झालीच तर आळसानें तें होत नसे. यावरून जेवणाखाण्याची काय व्यवस्था असेल याची सहज कल्पना येईल. आठवडेच्या आठवडे नुसत्या चहापावावर तिनें काढले. त्याचा कंटाळा आल्यासारखें वाटलें कीं, उपाहार-गृहांत जाऊन दोन अंडीं व बशीभर बटाट्याचे काप यावर तिनें ताव मारावा; पण त्या दिवशीं आपण मोठी मेजवानी झोडली असें तिला वाटे. घरगुती कामापैकीं शिवणकाम काय तें तिला येत असे. त्याचा उपयोग अभ्यासाचा कंटाळा घालविण्यासाठीं व स्वतःचे कपडे ठाकठीक करण्याकडे ती करी. बाजारांतून कापड आणून कधीं नवीन कपडा मात्र तिनें शिवला नाहीं.

या आबाळीचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. लिहितांना कधीं बोटें

बधिर होत, तर कधीं खांदे दुखत. वाचून उठतांना भोंवळ येई. क्वचित् ती बिछान्यावर मूर्च्छा आल्यागत सुन्न होऊन पडे. चेहरा पांढुरका दिसूं लागला, आणि शरीरहि वाळून गेलें. पण हें तिच्या ध्यानांत यावें कसें? आपणांस अधूनमधून असें कां होतें याचा एखादे वेळीं तिच्या मनांत विचार डोकावून जाई, नाहीं असें नाहीं; पण त्याकडे ती दुर्लक्षच करी. अखेर एक दिवस प्रयोगशाळेंत जातांना वाटेंतच ती मूर्च्छित पडली. सुदैवानें एक विद्यार्थी जवळ होता. त्यानें ती बातमी ब्रोन्याकडे कळविली.

डॉ. दुलुस्की येऊन पोहोंचले. त्यांनीं मेरीची प्रकृति तपासली; काय खाल्लें याची विचारपूस केली. खोलीचें बारकाईनें निरीक्षण केलें. मेरीस खोदखोदून विचारल्यावर तिला सर्व कबूल करणें भाग पडलें. गेल्या दोन तीन दिवसांत तिच्या पोटांत विशेष कांहीं गेलें नव्हतें. तिनें विशेष विश्रांतीहि घेतली नव्हती. डॉ. दुलुस्कींना मेरीचा अतोनात राग आला. व्यासंगाचें वेड झालें म्हणून काय झालें! त्याला कांहीं सीमा हवी ना? त्यांना स्वतःचीहि चीड आली होती. मेरीच्या वडिलांनीं छोट्या मेरीला मोठ्या विश्वासानें आपल्या स्वाधीन केलें होतें. आपण तिजवर योग्य तें लक्ष ठेवलें नाहीं, आपणच मूर्खपणा केला असें त्यांस वाटूं लागलें. ते कमी अधिक बोलण्याच्या भानगडींत पडले नाहींत. त्यांनीं मेरीला काय हवीं तीं पुस्तकें व वह्या बरोबर घेण्याची सूचना केली आणि तिला घेऊन घरचा रस्ता सुधारला.

येथून पुढचे दोन आठवडे ब्रोन्याच्या कडक देखरेखीखालीं मेरीस काढावे लागले. तिची प्रकृति त्या कालांत पुष्कळच सुधारली. तिची कांति पालटली. आतां परीक्षा जवळ येऊन ठेपली होती. अभ्यासाचे दिवस फुकट जाताहेत म्हणून तिचा जीव थोडथोडा होत होता. अखेर, आपण नियमितपणें राहूं, शरीराची हेळसांड करणार नाहीं, असें बहिणीस आणि मेहुण्यास आश्वासन देऊन तिनें आपली बहिणीच्या तावडींतून सुटका करून घेतली.

आणि तिचा क्रम पूर्ववत् सुरू झाला. ती हवापाण्यावर जगूं लागली.

अभ्यासाशिवाय तिला कांहीं सुचत नव्हतें. अंगांत ताप असो, थंडी वाजत असो, तिचा आपल्या दिनचर्येंत खंड पडला नाहीं. अखेरीस परीक्षेचा दिवस उगवला. प्रश्नपत्रिका हातांत पडली तेव्हां मेरीचें डोकें सुन्न झालें होतें. डोळ्यासमोर काजवे चमकत होते. आपण काय वाचतों हेंहि तिला थोडा वेळ कळेना.

पण या दिव्यांतून तिला तिच्या अपेक्षेबाहेर यश आलें. परीक्षेचा निकाल ऐकण्यासाठीं ती उमेदवारांच्या आणि त्यांच्या नातलगांच्या घोळक्यांत सभागृहांत शिरली. मोठीच धक्काबुक्की तेथें सुरू होती. गुणानुक्रमें परीक्षेचा निर्णय वाचण्यांत येणार होता. प्रत्येकजण तो ऐकण्यासाठीं उत्सुक होता. मेरी आपली जागा कशीबशी धरून उभी होती. एकदांचे प्राध्यापक महाशय आले. तात्काळ चोहोंकडे गंभीर शांतता पसरली. त्यांनीं पहिलेंच नांव उच्चारलें, “ मेरी स्क्लोडोवस्का ”.

*        *        *

परीक्षेचा निकाल हातीं येतांच मेरीनें अधीरपणें वॉर्सोला जाणारी गाडी गांठली.

तिचे वॉर्सोतील सुटीचे दिवस किती मजेंत गेले असतील, याची सहज कल्पना येईल. आपल्या मुलीनें इतक्या हालअपेष्टांत दिवस काढून शास्त्र विषयांत पारंगतता संपादन केल्याबद्दल प्रा. लादिस्लाव यांना आपल्या विद्येचें चीज झाल्याचें समाधान वाटत होतें. जोसेफ आणि हेला यांना बहिणीबद्दल वाटणाऱ्या अभिमानाला अस्मान ठेंगणें पडत होतें. आप्तेष्ट व स्नेही यांनीं तिचें कौतुक केलें. अभ्यास करून ती अगदीं वाळून गेली होती. या आबाळीबद्दल कांहींजण तिजवर रुष्ट झाले होते, आणि तिला भरपूर खाऊंपिऊं घालून लठ्ठ बनविण्याचा त्यांचा यत्न सुरू होता. साऱ्यांच्या कोडकौतुकांत आणि गप्पांत तीन महिन्यांची सुटी केव्हां संपली तें समजलेंहि नाहीं.

सुटी संपत आली तसें मन्याच्या मनास परत जाण्याचे वेध लागले; आणि त्याबरोबरच तिचें मन चिंतातुरहि झालें. पॅरिसला परत जावयाचें खरें; पण पैशाची सोय काय? जगांत सारीं सोंगें आणतां येतात, पण पैशाचें सोंग आणणें मात्र कठीण असतें. तिच्याजवळची पुंजी तर संपुष्टांत आली होती. वृद्ध वडिलांवर भार टाकावयाचा म्हणजे निष्ठुरपणा आणि निलाजरेपणा होता. शिक्षण अर्धवट सोडून द्यावें लागणार या विचारानें तिचें मन व्याकुळ झालें.

परंतु दैवानें तिला या वेळीं हात दिला. पॅरिसमधली डिडिन्स्का नांवाची एक मैत्रीण तिच्या साहाय्यास जणूं देवानेंच पाठविल्यासारखी धावून आली. मन्याची बुद्धिमत्ता, चिकाटी, परिश्रमशीलता इत्यादि गुण पाहून मन्या पुढें कोणी तरी अलौकिक व्यक्ति होणार अशी तिनें स्वतःशीं खूणगांठ बांधली होती. दारिद्र्याच्या फुंकरीनें मन्यासारख्या बुद्धिमान् मुलीचें स्वप्न विरून जावें ही कल्पनाच तिला असह्य झाली. वॉर्सामधील एका संस्थेतर्फे "अलेक्झँड्रोविच" नांवाची एक शिष्यवृत्ति परदेशांत अभ्यास करण्यासाठीं होतकरू विद्यार्थ्यांस देण्यांत येत असे. ती मन्याला मिळावी म्हणून डिडिन्स्कानें जिवाचें रान केलें, आणि अखेर त्यांत तिला यश आलें. शिष्यवृत्तीची रक्कम सहाशें रुबल्स होती. सहाशें रुबल्स! मन्याची पंधरा महिन्यांची सोय झाली.

मन्यानें मोठ्या कृतज्ञताबुद्धीनें ऋण म्हणून शिष्यवृत्तीचा स्वीकार केला. पुढें तिनें ही सर्व रक्कम संस्थेस परत केली. गरीब विद्यार्थ्यांचे कष्ट ती स्वानुभवानें जाणत होती. आपल्यासारख्याच कोणा समानधर्मी विद्यार्थ्याला साहाय्य मिळून त्याच्या आकांक्षापूर्तीला वाव मिळावा म्हणून ती रक्कम तिनें संस्थेच्या स्वाधीन केली.

शिष्यवृत्तीची रक्कम पदरांत पडतांच तिनें पॅरिस गांठलें. शक्य तितकी काटकसर करून ही रक्कम जास्तींत जास्त दिवस पुरविण्याचा तिनें

संकल्प केला. या खेपेस तिची राहण्याची व्यवस्था बरी लागली होती. याबद्दल आपल्या भावास तिनें लिहिलें :

> " मीं नवीन खोली घेतली आहे. ती सहाव्या मजल्यावर आहे. खोलीला खिडकी पण आहे, आणि ती पक्की बंद करतां येते. जमीनहि चुन्याची नसून लाकडी तक्तपोशी आहे. त्यामुळें थंडीचा त्रास नाहीं. शिवाय भाडेंहि कमी. मागच्या खोलीच्या मानानें मी तर अगदीं राजवाड्यांत आहे म्हणेनास ! "

पॅरिसला यावयास मिळालें म्हणून तिला जितका आनंद झाला, तितकेंच वडिलांना सोडून येतांना तिला दुःखहि झालें. पण त्यांतल्या त्यांत तिला एका गोष्टीचें समाधान वाटलें. जोसेफजवळ प्रा. लादिस्लाव यांची जीवनयात्रा सुखानें चालली होती, हें पाहून तिच्या मनावरचें एक दडपण दूर झालें.

मेरी पॅरिसला आली तेव्हां कॉलेज सुरू होण्यास थोडा अवधि होता. तो वेळ फुकट न दवडतां तिनें गणिताच्या अभ्यासाला आरंभ केला. तसेंच एक फ्रेंच सहाध्यायिनी गांठून ती फ्रेंचचा अभ्यास करूं लागली. खोलीच्या एका कोपऱ्यांत तिनें लहानशी प्रयोगशाळाहि थाटली.

* * *

या चार वर्षांत इतक्या हालअपेष्टा सोसाव्या लागल्या तरी मेरीनें यत्किंचितहि कुरकुर केली नाहीं. कुणाजवळ त्याबद्दल चकार शब्दहि काढला नाहीं. उलट आपल्या दारिद्र्याचा आणि एकलेपणाचा तिला अभिमानच वाटे. पूर्वीच्या शास्त्रज्ञांनीं अशीच साधना केली नव्हती काय ? त्यांनाहि हालअपेष्टांत दिवस काढावे लागले; शारीरिक सुखाकडे पाठ फिरवून सतत मनन-चिंतनांत मग्न राहिल्यानेंच ज्ञानाच्या सीमा त्यांना वाढवितां आल्या. त्यांच्या मानानें आपलें जीवन किती क्षुद्र ! मेरीला थोरांच्या जीवनापासून स्फूर्ति मिळत होती, अपार उत्साह लाभत होता. त्याच्या जोरावर जगाच्या दृष्टीनें भकास वाटणाऱ्या जीवनांत आनंदाचे

झरे तिला आढळत. त्या थोर शास्त्रज्ञांच्या आदर्शाचा साक्षात्कार व्हावा म्हणून ती झटत होती. आपल्या जीवनांत सफलता कशांत आहे याचा शोध तिचें मन करीत होतें. त्या चिंतनांत बाह्य जगाचा तिला विसर पडला होता.

तिच्या मनाची वृत्ति, तिच्या भावना तिनें पुढील ओळींत व्यक्त केल्या होत्या. शिक्षण संपत येण्याच्या सुमारास केव्हां तरी तिनें त्या रचल्या असाव्यात :

भोंवतालीं बहरली यौवनाची फुलबाग
युवयुवतींच्या मेळीं रंगतसे अनुराग
येथ बसे ही एकली एकान्तीं अन् अज्ञातांत
हृदिं परि हेलावतो उत्साह ना त्यासी अंत
संपला हा भाग्यकाल आली वेळ निघायाची
शास्त्रभूमि सोडुनिया जीविताच्या प्रवासाची
धडपड पोटासाठीं करणें लागे आतां पुढें
जीवनाचा धूलिपथ पायीं सदा तुडविणें
घोटाळतें श्रान्त मन परतोनि मागें मागें
स्मृतिपाशीं गुंतलेत हृदयींचे भाव-धागे
येथ घालविल्या किती रात्रीं रात्रीं अलोचन
मूक श्रम, मूक धन – नको नको तें स्मरण !

• • •

## पहिली भेट : : १

मेरीची उग्र तपश्चर्या पुनः सुरू झाली.

मेरीला भोंवतालच्या जगाचा जवळ जवळ विसरच पडला होता. कोळी आपलें जाळें निर्माण करून त्यांतच स्थिर असतो, त्याप्रमाणेंच कमीअधिक प्रमाणांत प्रत्येक मनुष्य स्वतःच्या आशाआकांक्षांचें एक जग निर्माण करून त्यांत वावरत असतो. मेरीचीहि अशीच स्थिति होती. तिचें सारें जग म्हणजे तिची कुटुंबीय मंडळी, तिची पददलित मातृभूमि आणि शास्त्रीय ज्ञान. याविना इतरांना त्यांत स्थान नव्हतें.

मेरीच्या समोर ज्ञानाचा विशाल सागर पसरला होता. तो अपार होता, अनन्त होता. त्यांतील प्रवासाला सीमा नव्हती, खंड नव्हता. त्यांत बुडी मारून जातां जातां हाताला लागतील तीं माणिकमोतीं गोळा करण्यांत ती दंग होती. जीवितांतील सात्त्विक, निरागस आणि उच्च आनन्दाचा तिला अनुभव येत होता. त्यांत दारिद्र्य, हालअपेष्टा, उपासतापास यांचें भान तर केव्हांच हरपलें होतें. स्मृति असेल तर ती फक्त भविष्याची—उज्ज्वल स्वप्नांची. शिक्षण संपल्यानंतर वडिलांच्या सान्निध्यांत, त्यांच्या सेवेंत घालवावयाच्या सुखद कल्पनांनीं रेखाटलेलीं चित्रें तिच्या मनश्चक्षूसमोर तरळत. आपली विद्या मातृभूच्या चरणीं अर्पण केल्यानें होणाऱ्या कृतार्थतेच्या

विचारानें तिचें मन प्रफुल्ल होई. एका पवित्र ध्येयाची दीक्षा तिनें घेतली होती. त्याच्या सिद्धीसाठीं आपलें जीवन अधिक उन्नत आणि ऊर्जस्वी करण्यांत ती मग्न झाली होती.

आणि तसेंच म्हटलें तर भोंवतालच्या जगांत तिचें मन वेधून घेण्यासारखें काय होतें? तिच्या मनावरील संस्कारामुळें, केवळ तिच्या अकिंचन वृत्तीमुळें नव्हे, इतर विद्यार्थ्यांची छानछबेली वृत्ति तिच्या ठिकाणीं संभवनीय नव्हती. पुरुष विद्यार्थ्यांची मैत्री ती टाळीत होती असें नव्हे; तिच्या स्वभाववैशिष्टयामुळें तिच्या निकट येण्यास कोणी धजत नव्हतें. प्रेमाचा—प्रेमनिराशेचा अनुभव ती घेऊन चुकली होती. पुरुषांच्या भित्र्या स्वार्थी वृत्तीला ती विटली होती. वैवाहिक जीवनाचें तिला आतां आकर्षण वाटत नव्हतें; मातृत्वाची मातब्बरी तिला वाटेनाशी झाली होती. स्वतःचें व्यक्तिस्वातंत्र्य ती गमावण्यास आतां तयार नव्हती. तिनें आपल्याभोंवतीं एक अभेद्य तटबंदी जणूं निर्माण केली. स्वाभिमानामुळें, संकोचशीलतेमुळें आणि पुरुषवर्गावरील अविश्वासामुळें ती जगापासून चार पावलें दूर राहात होती.

पण विधि मात्र तिच्यासाठीं वेगळा व्यूह रचीत होता.

* * *

मेरीनें निरनिराळ्या प्रकारच्या पोलादांच्या विद्युदाकर्षणसामर्थ्याबद्दल संशोधनकार्य अंगावर घेतलें होतें. त्यासाठीं ती प्रा. लिपमन् यांच्या प्रयोगशाळेंत काम करीत होती. पण तेथें निरनिराळ्या खनिज द्रव्यांच्या रासायनिक पृथक्करणाला लागणाऱ्या साधनसामुग्रीचा अभाव होता. तेव्हां मेरी मोठ्या फिकिरींत पडली. त्याच वेळीं तिच्या सुदैवानें तिच्याशीं परिचित असलेले प्राध्यापक कोवलस्की आपल्या नूतन पत्नीसह फ्रान्समध्यें येऊन दाखल झाले. त्यांचीं पॅरिसमध्यें कांहीं व्याख्यानेंहि झालीं. त्यांना मेरी उपस्थित होती. प्रा. कोवलस्की यांनीं मेरीची आस्थापूर्वक चौकशी केली. त्या प्रसंगीं मेरीनें आपली अडचण त्यांना बोलून दाखवली. प्रा. कोवलस्कींनीं यांतून मार्ग काढण्याचा तिला एक उपाय सुचवला, तो असा :

" येथें पदार्थविज्ञान व रसायनशास्त्रांच्या पाठशाळेंत काम करणारे एक गुणी शास्त्रज्ञ आहेत. त्यांची माझी ओळख आहे. मी तुझी त्यांची गांठ घालून देतों. मला वाटतं, ते तुला या कामांत मदत करतील. तूं असं कर, उद्यां जेवण झाल्यावर दुपारच्या चहाला आमच्याकडे ये. मी त्यांनाहि बोलावतों. त्यांचं नांव तूं ऐकलंहि असशील — पिएर क्यूरी."

ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं मेरी प्रा. कोवलस्की यांच्या निवासस्थानीं येऊन दाखल झाली. खिडकींतच प्रा. क्यूरी उभे होते. त्यांचा बांधा उंच असून आकृति भव्य दिसत होती. पोषाख साधाच आणि जुन्या पद्धतीचा, अंगाच्या मानानें किंचितसा सैलच होता. वेषभूषेंत आणि केशभूषेंतहि बेफिकीरपणाच अधिक होता. त्यांची प्रशांत मुद्रा आणि पाणीदार डोळे त्यांच्या हृदयाच्या सखोलतेची साक्ष पटवीत होते. तोंडावर क्वचित् मंद-स्मित झळके, पण त्यांत गांभीर्याची छटाच अधिक असे. एकंदर त्यांच्या चर्येवरून त्यांच्या बुद्धिमत्तेबद्दल कुणाचीहि खात्री पटे. त्यांची अंतर्मुख वृत्ति, मितभाषीपणा आणि गंभीर मुद्रा ते व्यावहारिक जगापासून दूरदूर हिंडत असल्याची जाणीव करून देत. एकंदरीनें प्रथम भेटींतच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विशिष्ट ठसा दुसऱ्याच्या मनावर उमटल्याविना राहात नसे.

प्रा. कोवलस्कींनीं ओळख करून दिल्यावर मेरीचें व पिएर क्यूरींचें संभाषण सुरू झालें. मेरी शक्य तेवढी श्रोत्याचीच भूमिका करीत होती. भाषणाचा विषय स्वाभाविकपणेंच शास्त्रीय संशोधनाचा होता. प्रा. क्यूरी करीत असलेल्या सूचना मेरी एकाग्र मनानें ग्रहण करीत होती. मधून-मधून प्रा. क्यूरींच्या संशोधन-कार्याविषयींहि बोलणें चालू होतें. बोल-ण्याच्या ओघांत त्यांनीं आपल्या पुढील संशोधनाच्या कल्पनाहि तिजपुढें मांडल्या. आपले पदार्थविज्ञानांतील स्फटिकीभवनाबद्दलचे सिद्धान्तहि त्यांनीं तिला स्पष्ट करून सांगितले.

स्वभावतः अबोल असलेले प्रा. क्यूरी किती तरी बोलत होते. त्यांच्या आवडत्या शास्त्रीय विषयावर संभाषण चालू होतें, हें एकमेव त्याचें कारण

नव्हतें. या चमत्काराच्या मुळाशीं मेरीचें व्यक्तिमत्त्वहि होतें. पोलंडमधील एक युवती इतक्या दूरच्या देशांत येते, सोर्बोनच्या विश्वविद्यालयांत पदार्थविज्ञानासारख्या गहन विषयांत पहिला क्रमांक पटकाविते, एवढ्या गोष्टी तिच्याविषयीं कौतुक वाटावयास लावण्यास पुरेशा होत्या. पण मेरीचें कर्तृत्व येथेंच संपत नव्हतें. यंदां गणित विषय घेऊन ती पुनः परीक्षेस बसूं इच्छित आहे. आपण बोलत असलेल्या शास्त्रीय विषयांत ती तन्मय होऊं शकते, इतकेंच नव्हे तर त्यांत ती भाग घेऊं शकते, त्यांतील पारिभाषिक संज्ञा, प्रमेयें आणि सिद्धान्त ती ग्रहण करूं शकते. उकलूं शकते. त्यांजबद्दल अचूक अनुमानें बांधण्याची पात्रताहि तिच्या ठिकाणीं आहे. भारीच विलक्षण तरुणी दिसते ही !

"आपण पुढें फ्रान्समध्येंच राहणार?" क्यूरींनीं कुतूहलानें विचारलें.

"छेः छेः ! गणिताची परीक्षा आटोपली कीं मी वॉर्सोला परत जाणार ! पुनः परत यायला मिळतं कीं नाहीं कोणास ठाऊक ! वॉर्सोतच कोठें तरी काम करीन बहुतेक. पोल लोकांना आपला देश सोडून कसें चालेल?" मेरीनें शांतपणें उत्तर दिलें. शेवटचीं वाक्यें उच्चारतांना तिचा स्वर किंचित् उत्तेजित झाला होता.

आणि मग संभाषणाचा ओघ पोलंडच्या आपत्ति, झारचा जुलमी अंमल यांकडे वळला. क्यूरी किंचित् निराश चित्तानें पण स्तिमित दृष्टीनें मेरीच्या देशाभिमानानें उचंबळलेल्या अंतःकरणाची तळमळ पाहात होते. पण त्यांच्या मनांत एकच विचार थैमान घालीत होता,– एवढी ही बुद्धिमान् तरुणी आपल्या बुद्धीच्या अद्भुत देणगीचा अपव्यय झारशीं टक्कर देण्यांत कां करीत आहे? वास्तविक हिनें शास्त्रीय संशोधनाला आजन्म वाहून घ्यावयास पाहिजे. आणि याच पिएर क्यूरींनीं थोड्याच दिवसांपूर्वीं आपल्या 'बासरी'त लिहिलें होतें,

"अद्भुत बुद्धिमत्तेच्या स्त्रिया एकूण दुर्मिळच."

पिएर क्यूरी हे फ्रान्समधील उच्च दर्जाचे शास्त्रज्ञ होते. त्यांची वृत्ति

प्रसिद्धिविमुख होती. त्यांच्या स्वतःच्या देशांत त्यांचा बोलबाला फारसा झाला नव्हता, पण परदेशीय शास्त्रज्ञांना त्यांचें नांव सुपरिचित होतें.

१५ मे १८५९ या दिवशीं पॅरिसमध्यें त्यांचा जन्म झाला. पिएरचे वडील व आजोबा दोघेहि डॉक्टरच होते. क्यूरींचें घराणें मूळचें सामान्य स्थितींतलें असलें तरी गेल्या बऱ्याच पिढ्यांनीं बुद्धिमत्तेबद्दल व विद्वत्तेबद्दल चांगला लौकिक मिळविला होता. पिएरचे वडील युजेन क्यूरी यांनाहि संशोधनाची मोठी आवड होती. त्यांनीं आपला व्यवसाय सांभाळून एका प्रयोगशाळेंत काम केलें होतें. क्षयरोगाच्या संसर्गजन्यतेसंबंधीं त्यांनीं कांहीं लिखाणहि प्रसिद्ध केलें होतें.

डॉ. युजेन क्यूरी यांच्या दोन्ही मुलांस बालपणापासूनच शास्त्रीय ज्ञानाची गोडी लागली होती. थोरला जेकस याचा शालेय अभ्यास व्यवस्थित सुरू झाला, पण पिएर याच्या स्वतंत्र प्रवृत्तीला व कुशाग्र बुद्धीला शाळेची शिस्त मानवेना. डॉ. युजेननीं त्याला स्वतःच शिकविण्यास सुरुवात केली, आणि पुढें त्याला श्री. बेझिल नांवाच्या एका हुषार पंडिताच्या स्वाधीन केलें. या साऱ्या प्रयत्नाला चांगलीं फळें आलीं. सोळाव्या वर्षींच पिएर यांनीं पदार्थविज्ञानांत स्नातकाची पदवी संपादन केली आणि दोन वर्षांनींच आचार्य पदवी मिळविली. ताबडतोब त्यांची प्रा. देसाँ यांच्या हाताखालीं शास्त्रविभागांत प्रयोगशाळेंत नेमणूक झाली. त्यांनीं आपल्या बंधूंच्या साहाय्यानें शास्त्रीय संशोधन सुरू केलें. या दोघां बंधूंनीं 'पायझो-इलेक्ट्रिसिटी' नांवाचा एक अभिनव विद्युत्प्रकार शोधून काढला आणि विद्युच्छक्तिमापक एक यंत्रहि बनविलें. त्यानंतर पिएर यांनीं 'स्फटिक-विषयक' आपलें स्वतंत्र संशोधन आरंभिलें. आधुनिक पदार्थविज्ञानांतील प्रमाणबद्धतेचा सिद्धान्त बसविला. विद्युदाकर्षणत्वाविषयींहि एक नियम शोधून काढला तो 'पिएर लॉ' या नांवानें प्रसिद्ध पावला. 'क्यूरी स्केल' नांवाचें एक अतिसूक्ष्म संवेदनक्षम यंत्रहि निर्माण केलें. या पंधरा वर्षांच्या दीर्घ संशोधनानंतर पिएर यांना फक्त दरमहा तीनशें फ्रँक वेतन मिळत होतें.

पण परदेशस्थ शास्त्रज्ञ त्यांची योग्यता ओळखून होते. १८९३ मध्यें जेव्हां लॉर्ड केल्व्हिन या इंग्लंडच्या प्रसिद्ध शास्त्रज्ञांनीं पॅरिसला भेट दिली तेव्हां त्यांनीं पिएर यांची भेट घेतली. त्यांच्या संशोधनाबद्दल धन्योद्‌गार काढले; पण पिएर यांना प्रयोगशाळेंत कोणी साहाय्यक नाहीं, त्यांना चांगलीशी प्रयोगशाळा नाहीं, आणि पोटाला पुरेसें वेतनहि नाहीं, हें त्यांना समजलें असतें तर !

पिएर यांना मानसन्मानाची आवड तर नव्हतीच, उलट तिटकाराच होता. फिजिक्स विद्यालयाच्या चालकानें 'प्रिफेक्ट'च्या सन्मानासाठीं त्यांचें नांव सुचविण्याचें ठरविलें असल्याची बातमी त्यांना कळतांच पिएर यांनीं मोठ्या विनयानें पण निग्रहानें ती गोष्ट आपणांस मान्य नसल्याचें त्यांना कळविलें, आणि त्यांना परावृत्त केलें.

पिएर जसे प्रसिद्धिपराङ्‌मुख होते, तसेच ते निर्लोभी व निःस्पृह होते. त्यांच्या स्वभावांत याचक वृत्ति नव्हती. अर्ज—विनंत्या करून आपली आर्थिक परिस्थिति सुधारावी असें त्यांच्या मनांतहि येत नव्हतें. त्यांच्या मित्रांनीं त्यांना एकदां कोणी एक प्राध्यापक निघून जात आहेत त्या जागेसाठीं अर्ज करा म्हणून सुचविलें असतां त्यांनीं उत्तर दिलें कीं,

"उमेदवार म्हणून अर्ज करणें ही गोष्ट मला नैतिक अधःपाताची वाटते. आपल्या मनानें असल्या गोष्टींच्या चिंतनांत व्यग्र होणें हा मनाचा कमकुवतपणा व रोगटपणा आहे, असें माझें मत आहे."

निष्ठावंत ज्ञानोपासकाची ही भूमिका होती. खऱ्या आर्यवृत्तीचा निष्काम ज्ञानयोगाचा हा आदर्श होता !

सामान्य लोक शास्त्रज्ञांना सामान्यतः रुक्ष समजतात, पण तें बहुधा लौकिक अर्थानें. निसर्गातला उच्च आनंद कवींच्या सृष्टींत शब्दरूपानें साकार होतो. त्या आनंदाचा रस व्यक्त करण्याची कवींची पद्धति वेगळी असते. सामान्य जनहि त्याच मर्गाचा प्रायः अवलंब करतात. पण शास्त्रज्ञ झाले तरी निसर्गाचीं लाडकीं अपत्येंच ना ! निसर्गाच्या अंत-

रंगांत शिरल्याशिवाय का निसर्गाचें रहस्य त्यांना कळणार ? ही निसर्ग-प्रीति त्यांच्या ठायीं विपुल असतेच. फक्त त्यांची पाहण्याची दृष्टि भिन्न असते एवढेंच. पण म्हणून त्यांच्या भावना आणि बुद्धि यांची कायमची ताटातूट होते हें म्हणणें वेडगळपणाचें ठरेल.

पिएर यांच्या ठिकाणीं प्रखर बुद्धिमत्तेइतकीच कल्पनेची तरलता होती. मन संवेदनक्षम होतें. कवींची प्रतिभा—नवनवोन्मेषशालिनी बुद्धि त्यांच्या ठिकाणीं वसत होती. त्यांना निसर्गसान्निध्याची आवड होती. बालपणचे दिवस वनराईत स्वैरपणें हिंडण्यांत त्यांनीं घालविले होते. त्यांचें मनहि सदा वायुगतीनें भटकत असे. त्यांच्या दैनंदिनींत पुढील उतारा या दृष्टीनें वाचनीय आहे :

> **"खाणें–पिणें, झोपणें, मित्राशीं गप्पा मारणें, इत्यादि गोष्टी तर आपण नेहमींच करीत असतों. जीवनांतील मधुर वस्तूंचाच एक प्रकारें आपण आस्वाद घेत असतों. पण त्यामुळें निसर्गविषयक आपल्या विचारांत खंड पडूं नये. आपलें जीवन हें स्वप्न असावें, आणि आपल्या प्रयत्नानें तें स्वप्न पुनः साकार व्हावें यासाठीं प्रत्येकानें झटत असावें."**

थोडक्यांत त्यांच्या ठिकाणीं कवि–कलावन्तांची संवेदनशीलता, भाव-प्रवणता, आणि कल्पनेची तरलता या गोष्टी होत्या. अशा या काव्यात्म शास्त्रज्ञाला एका पोलिश युवतीनें आपल्या अव्याज-रमणीय शालीनतेनें, उत्कट ध्येयासक्तीनें आणि गाढ शास्त्रनिष्ठेनें मोहून टाकलें.

● ● ●

# रत्नं समागच्छतु काञ्चनेन ! : : १०

मेरी आणि पिएर क्यूरी यांच्यांतील परिचयाची लवकरच स्नेहांत परिणति झाली.

मेरीचा स्नेह संपादन करण्याची पिएर यांची इच्छा तीव्रतर होती. आपल्या स्नेहबंधनाला दृढता यावी म्हणून त्यांनीं आपल्या पदार्थविज्ञाना-मधील संशोधनविषयक लेख मेरीस भेट म्हणून पाठविले. मेरीच्या निवासस्थानीं तिला भेटण्यास तिची अनुमतिहि त्यांनीं मिळविली. मेरीच्या शास्त्रीय ज्ञानाच्या लालसेनें ते दिपून गेले. तिच्या ज्ञानोपासनेवरील निष्ठेमुळें आणि बुद्धीच्या कुशाग्रतेमुळें ते तिजवर मोहित झाले. तिच्या या गुणांचा प्रत्यय त्यांना प्रथम भेटींत तर आलाच होता, पण तिच्या निवासस्थानीं गेल्यावर तर ते स्तंभितच झाले.

एक जुनाट, रिकामी खोली. जीवनोपयोगी वस्तूंचेंदेखील तेथें दारिद्र्यच. या खोलींत चिंध्या व्हावयाच्या बेतांत असलेल्या पण केवळ शरीराची कशीबशी लज्जा रक्षण करणाऱ्या पोषाखांत, अभ्यासानें क्षीण झालेली पण करारी व निश्चयी मुद्रेची एक तरुणी मायभूमीपासून शेंकडों कोस दूर आपलें जीवन संन्यस्तवृत्तीनें व्यतीत करीत आहे, आणि ज्ञानार्जनासाठीं वाटेल ते कष्ट सोसण्याची तिची तयारी आहे हें दृश्य चित्त हालविणारें

होतें. मेरीनें अत्यंत सौजन्यानें पण तितक्याच संयमानें त्यांचें स्वागत केलें.

आणखी एकदोन भेटींत पिएर यांनीं मेरीला आपल्या कुटुंबियांचा परिचय करून दिला. किती विचित्र आणि अद्भुत साम्य ! क्यूरी आणि स्क्लोडोवस्की कुटुंबांतील वातावरण अगदीं एकाच तऱ्हेचें होतें. तीच ज्ञानलालसा, तीच शास्त्रोपासना, तेंच निसर्गप्रेम. उच्च सांस्कृतिक जीवन व्यतीत करण्याची उत्कंठा आणि पद्धति उभय कुटुंबांत सारखीच होती. मातापित्यांचे आणि अपत्यांचे संबंध दोन्ही कुटुंबांत तसेच जिव्हाळ्याचे व प्रेमाचे होते. मेरीच्या हृदयाला कां कुणास ठाऊक खूप धीर आला. परकेपणाचा उरलासुरला पडदा दूर झाला. मेरीनेंहि आपल्या कुटुंबियांचा परिचय पिएरना करून दिला. दोन शास्त्रज्ञ एकमेकांच्या अधिक निकट आले.

स्त्रीसान्निध्याची काय जादू असेल ती खरी. मेरीच्या सहवासांत आपल्या सुप्त शक्ति जागृत झाल्यासारखें पिएर यांना वाटूं लागलें. नवीन प्रेरणा, नवीन उत्साह त्यांच्या ठायीं निर्माण झाला. दृढ स्नेह, परस्परांबद्दल आदरमिश्रित आपुलकी व विश्वास जसजशीं वाढूं लागलीं तसतशी मेरीहि त्यांना कार्यप्रवण बनवूं लागली. पिएर यांनीं आपले विचार लेखबद्ध करावेत, प्रयोग लिहून काढावेत, डॉक्टरीचा प्रबंध तयार करावा म्हणून मेरी त्यांना उत्तेजन देऊं लागली.

पण सुटी लागून मेरीच्या वॉर्सॉला जाण्याचा दिवस जसजसा जवळ येऊं लागला, तसतसें पिएरचें मन अस्वस्थ होऊं लागलें. मेरी पुनः फ्रान्सला परत येईल का ? तिचा मधुर स्नेह जीवनभर आपणांस लाभेल काय ? या विचारानें ते वेडे बनले. मेरीनें पुनः परत यावें, अशी त्यांनीं परोपरीनें तिला गळ घातली. अनेक तऱ्हेनें तिच्याशीं युक्तिवाद केला. तिच्या शास्त्रप्रीतीला जागें करून तिचें मन वळविण्याची पराकाष्ठा केली.

" तुम्ही अभ्यासाला आतां रामराम ठोकणार काय ? पोलंडमध्यें तुम्हांला

साधनांची काय अनुकूलता आहे? निसर्गानें तुम्हांला बुद्धिमत्ता दिली आहे, तिचें तुम्हीं चीज नको का करायला?" – एक ना दोन, अनेक तऱ्हेनें तिचें मन ते वळवीत होते. अखेर मेरीनें परत येण्याचें आश्वासन दिलें.

जाण्यापूर्वीं आपल्या भविष्याबद्दल हरतऱ्हेनें पिएर तिच्याशीं बोलत. त्यांनीं मेरीला आपल्याशीं विवाहबद्ध होण्याचीहि अखेर विनंती केली. पण मेरीनें मुग्धता स्वीकारून जवळ जवळ त्यास नकारच दिला.

मेरी पोलंडला निघून गेली, आणि पिएर यांना जग सुनें झालें.

* * *

पिएर यांनीं मेरीचा जवळ जवळ ध्यासच घेतला होता. वरचेवर पत्रें लिहून त्यांनीं मेरीचा पाठपुरावा चालविला होता. मेरीच्या मागोमाग धांव घेण्यासाठीं त्यांचें मन उतावीळ झालें होतें. पण तें बरें दिसेल का?

'मेरी खरेंच परत येईल का?' ही शंका त्यांचें मन व्याकुळ करीत होती. 'ती आली नाहीं तर जन्मभर स्नेही म्हणून राहण्याचें तिचें अभिवचन ती खरें कसें करणार? निव्वळ स्नेहभावानें मनाचें समाधान होईल काय? ..........' मेरीला आपल्या मायभूमीची सेवा करावयाची आहे. तिला समाजस्थिति बदलून टाकावयाची आहे. पण हें काय एकट्यादुकट्या माणसाचें काम आहे? शास्त्राची उपासना हीच खरी समाजाची सेवा नव्हे काय? विज्ञानावर उभारलेली समाजाची इमारत हीच खरी चिरस्थायी नव्हे काय? मेरीचें देशाभिमानाचें स्वप्न, आपलें शास्त्राच्या उपासनेचें स्वप्न,– दोन्ही मानव्यासाठींच नव्हेत काय? मेरी आणि आपण एकत्र राहून शास्त्रीय संशोधन करून तीं साध्य करूं शकणार नाहीं काय? मेरीच्या पत्रांत एकसारखी याची चर्चा त्यांनीं चालविली होती.

मेरीप्रमाणेंच पिएरनाहि कांहीं तत्त्वें प्रिय होतींच ना? एके वेळीं त्यांनीं आजन्म अविवाहित राहण्याचा निर्धार केला होता. प्रेमनिराशेमुळें त्यांनीं स्त्रीसहवास वर्ज ठरविला होता. स्त्रीसहवास शास्त्रीय

संशोधनाच्या मार्गांत अडथळा निर्माण करील अशी भीति त्यांना पूर्वी वाटत होती. पण आतां त्यांचें मन पालटलेंच ना? तारुण्यांत देशभक्तीचें वेड सर्वांनाच असतें. पण मेरीच्या देशभक्तींतून काय साध्य होणार होतें? त्यापेक्षां तिनें आपली बुद्धिमत्ता शास्त्राच्या अभ्यासांत खर्च केली तर जगावर उपकार नाहीं का होणार?

दिवसांमागून दिवस लोटत होते. पिएर यांच्या मनाची अस्वस्थता वाढत होती. तिच्या भेटीसाठीं ते तळमळत होते. मेरीला पाहिल्यापासून तिच्या अंतःसौंदर्यानें, बुद्धिमत्तेच्या तेजानें ते तिजकडे आकृष्ट झाले होते. मेरीच्या ध्येयासक्तीनें ते तिजवर लुब्ध झाले होते. तिच्या धैर्यानें आणि प्रतिभेनें, तिच्या चारित्र्याच्या भव्यतेनें मेरी म्हणजे एक असामान्य युवती असल्याचा जणूं त्यांना प्रत्ययच आला होता. ती आपली सहधर्मचारिणी झाल्यास आपलें जीवन सफल होईल, असें त्यांच्या मनानें घेतलें. मेरीच्या सर्व शंका-कुशंकांचें निरसन ते वादविवादानें करीत होते. आपल्या हृदयाची आर्तता तिला कळवीत होते. प्रेमाची उत्कटता व सत्यता पटवीत होते. त्याग हीच त्याची कसोटी असेल तर फ्रान्स सोडून मेरीबरोबर पोलंडमध्यें जावयासहि ते सिद्ध होते!

आणि मेरी—!

बाहेरून शांत दिसणाऱ्या, योगिनीची दिनचर्या कंठणाऱ्या मेरीच्या हृदयांत दारुण द्वंद्व थैमान घालीत होतें. आपण मायभूमीपासून शेंकडों कोस येऊन दूर देशीं राहिलों. हाडांचीं काडें केलीं. इतक्या परीक्षा दिल्या. पोलंडसाठींच ना हें केलें? आतां व्यक्तिगत सुखाच्या फांसांत अडकून या देशसेवेच्या कल्पनांना तिलांजलि द्यावयाची काय? एका फ्रेंच गृहस्थाशीं विवाह करून मायभूमीला पारखें व्हावयाचें! मातृभूमीशीं ही कृतघ्नता नव्हे काय? दिवसेंदिवस थकत चाललेले वडील आपल्या वाटेकडे डोळे लावून बसले आहेत, त्यांची फसवणूक नाहीं का होणार? छे; हा मोह टाळलाच पाहिजे. कॅझिमिर—पोलंडमधल्या

एका खानदानी कुटुंबानें लाथाडलेल्या तरुणीच्या पायावर फ्रान्सच्या एका महान् शास्त्रज्ञानें आपलें हृदय अर्पण करावें, ही विधिघटना अपूर्व नव्हे तर काय?

पण मेरी किती झाली तरी एक नवयौवना स्त्रीच होती. पिएर यांच्या केविलवाण्या स्थितीनें म्हणा, आळवण्यानें म्हणा, त्यांच्या त्यागाच्या तयारीनें म्हणा, तिच्या मनाचा निश्चय डळमळूं लागला. मेरीनें आपल्या हृदयाची असह्य व्यथा ब्रोन्याजवळ बोलून दाखविली. मेरीच्या मनाचा बुरूज ढासळूं लागल्याची वार्ता कळतांच पिएर यांनीं डॉ. दुलुस्कींकरवीं तिचें मन वळविण्याचा यत्न सुरू केला,– आणि अखेर तर पिएरच्यां मातेनेंहि ब्रोन्याजवळ शब्द खर्च केला. जवळ जवळ दीड वर्ष स्वतःशीं झुंजल्यावर मेरीनें विवाहाला अनुमति दिली.

त्या वेळीं जोसेफनें लिहिलेल्या पुढील पत्रावरून तिच्या कुटुंबियांचा उदार दृष्टिकोन आपणांस पाहावयास मिळतो. जोसेफ लिहितो:

> "तुझा प्रा. क्यूरींशीं विवाह ठरल्याचें समजून आनन्द झाला. मी तुम्हांला भावी जीवनांत सौख्य व यश चिंतितों. तुझें जीवन समृद्ध आणि सुखसंपन्न होवो.
>
> तुझ्या अन्तःकरणप्रवृत्तींनीं निर्दिष्ट केलेला मार्ग तूं चोखाळलास याबद्दल तुला कोणीच दोष देणार नाहीं. तूं पॅरिसमध्यें राहूनहि मनानें पोल राहशील याची मला खात्री आहे. आपलें कौटुम्बिक स्नेहबंधन शिथिल होणार नाहीं.
>
> कोणत्या तरी कर्तव्यभावनेच्या आहारीं जाऊन व सारा त्याग करून पोलंडमध्यें हालअपेष्टांत रखडण्यापेक्षां फ्रान्समध्यें तुला सुखासमाधानांत नांदतांना पाहून आम्हां सर्वांना होणारा आनन्द शब्दांनीं व्यक्त करतां येत नाहीं."

* * *

प्रा. पिएर क्यूरी आणि मेरी स्क्लोडोवस्का यांचा विवाह २६ जुलै १८९५ या दिवशीं अत्यंत साधेपणानें कोणत्याहि प्रकारें गाजावाजा न करतां पार पडला. समारंभ असा विशेष नव्हताच. नेहमींचे धार्मिक विधि, सोन्याची अंगठी, पांढरा पोषाख इ. रूढि या सर्वांना फांटा देण्यांत आला होता. विवाहसमारंभास निमंत्रित मंडळीहि अगदींच वेंचक अशी होती. विवाहविधि आटोपतांच मातापितरांचा त्यांनीं निरोप घेतला. नवीनच खरेदी केलेल्या सायकलीवर आरूढ होऊन हें शास्त्रज्ञांचें जोडपें फ्रान्सच्या वासंतिक वनश्रीचा उपभोग घेण्यास बाहेर पडलें.

• • •

मा. मेरी क्यूरी हिनें आपल्या नव्या संसारास सुरुवात केली, ती तिच्या आजपर्यंतच्या साध्या राहणीस साजेल अशीच होती. रुंद ग्लेशअर विभागांत त्यांनीं दोन खोल्या घेतल्या होत्या. एक स्वयंपाकगृह व दुसरी बैठकीला. खोलींत एक लांबट टेबल व दोन खुर्च्या यांशिवाय कांहीं फार्निचर नव्हतें. मेरीनें आपला संसार काटकसरीनें करावयाचें ठरविलें होतें. स्वयंपाक ती स्वतःच करी, पण त्यासाठीं स्वयंपाक शिकण्याची तिजवर पाळी आली. अगदीं थोड्या वेळांत व कमी लक्ष देऊन कोणते पदार्थ तयार करतां येतील याचेहि ती प्रयोग करून पाहूं लागली. झाडलोट, बाजार-हाट हें सारें ती स्वतःच करीत असे.

विवाहानंतर दुसऱ्याच वर्षीं मेरीनें माध्यमिक शिक्षकांसाठीं लागणारी 'फेलोशिप'ची परीक्षा दिली, व त्यांत ती पहिली आली. विद्युदाकर्षणा-संबंधीं प्रयोग व निबंधलेखन हीं कामेंहि चालूच असत. गृहकृत्यांचा व्याप सांभाळून मेरी ८–९ तास प्रयोगशाळेंत घालवी.

मेरी व पिएर यांच्या संवयी अगदीं साध्या होत्या. पिएरना गप्पांची फारशी हौस नसे. त्यांच्याकडे मंडळी भेटावयास क्वचितच येत. कामाचा कंटाळा आला कीं तीं दोघें स्केओ येथें पिएरच्या वडिलांच्या मुक्कामीं जात. तेथेंहि

आपल्यासाठीं दोन खोल्या त्यांनीं राखून ठेवल्या होत्या. अधूनमधून डॉ. दुलुस्की व ब्रोन्या यांनाहि तीं भेटत. या तीन वर्षांत प्रा. ब्लादिस्लावहि दोनदां फ्रान्समध्यें आले. त्या वेळीं डॉ. क्यूरी व त्यांची कुटुंबीय मंडळी मेरी, ब्रोन्या, हेला, सारींच एकत्र जमलीं. दोन भिन्न राष्ट्रांचें तें कौटुंबिक संमेलनच होतें. शास्त्रविषयावर आपल्या जावयांशीं गप्पा मारतांना प्रा. स्क्लोडोवस्की यांना केवढा आनंद होई !

उन्हाळ्याच्या सुटींत पॅरिसच्या आसपास सायकलवरून सहली काढावयाच्या, निसर्गाच्या संगतींत मनमुराद भटकावयाचें, असा या शास्त्रज्ञ दांपत्याचा परिपाठ होता. पण '९७ च्या उन्हाळ्यांत सहल अर्धीच टाकून त्यांना परतावें लागलें. मेरीचे बाळंतपणाचे दिवस भरत आले होते. १२ सप्टें. '९७ रोजीं मेरी प्रसूत होऊन तिला कन्यारत्न झालें. तीच इरीन — मातेची उच्च परंपरा चालवून नोबेल पारितोषिक मिळविणारी कन्या !

संसार कीं शास्त्रीय संशोधन असा पेच मेरीपुढें कधींच नव्हता. त्यामुळें बाळंतपणांतून उठतांच ती प्रयोगशाळेंत हजर झाली.

मेरीनें आतांपर्यंत महाविद्यालयाच्या दोन उच्च पदव्या मिळविल्या होत्या. पोलादाच्या आकर्षणशक्तीसंबंधीं तिचा एक निबंधहि तयार झाला होता. याच्या पुढची क्रमप्राप्त पायरी म्हणजे 'डॉक्टर' या पदवीसाठीं प्रबंध तयार करणें हीच होती.

पण असा प्रबंध लिहावयाचा म्हणजे कांहींतरी नवसंशोधन करावयास पाहिजे. विद्वानांच्या पुढें कांहीं तरी नवीन विचार ठेवले पाहिजेत. एखादा गहन कूट प्रश्न सोडविण्याची दिशा वा पद्धति तज्ज्ञांना सादर केली पाहिजे. निसर्गाच्या अज्ञात प्रदेशांत प्रवेश करून त्याचें स्वरूप निश्चित केलें पाहिजे. आपला विषय निश्चित करण्यासाठीं मेरीनें सध्यां चालू असलेल्या शास्त्रीय संशोधनांची माहिती मिळविण्यास सुरुवात केली. लवकरच तिला हवा तसा कुतूहलजनक विषय सांपडला.

तो एक मोठा गमतीदार विषय होता. जगांत कांहीं वस्तु स्वयंप्रकाशी

आहेत असें एका शास्त्रज्ञाला आढळलें होतें. सूर्यकिरण पडल्यावर अनेक वस्तु चमकतात. कांहीं धातु त्यामुळें तेजस्वी बनतात व त्यांतून प्रकाश-किरण बाहेर पडूं लागतात हें शास्त्रज्ञांना माहीत झालें होतें. रॉंटजेन यानें अपारदर्शक वस्तूंतून जाणारे प्रखर 'क्ष' किरण शोधून काढले होते. त्याच दिशेनें पॉईंकेर व बेकरेल हे शास्त्रज्ञ पुढें विचार करीत होते. बेकरेलच्या अकस्मात् असें निदर्शनास आलें कीं, युरेनिअम (Uranium) नांवाच्या मूल्यवान् व दुर्मिळ धातूंतून कांहीं विलक्षण किरण बाहेर पडतात. छायाचित्र घेतलेल्या कांचेभोंवतीं काळा कागद गुंडाळून त्यावर युरेनिअमच्या क्षाराचें मिश्रण ठेवलें तर त्यांतूनहि त्या काचेवरील चित्रें कागदावर उमटूं शकतात! अशी विलक्षण शक्ति या किरणांच्या अंगीं असते! हे किरण येतात कोठून? युरेनिअमच्या अंगची तर ही शक्ति नव्हे? त्याचा उलगडा केलाच पाहिजे. मेरीनें हाच संशोधनासाठीं विषय निवडला. हें संशोधन यशस्वी झालें तर 'डॉक्टरी'साठीं प्रबंध आपोआप तयार होईल; पण निसर्गाचें केवढें आश्चर्य हातीं लागेल!

पण प्रयोग करावयाचे म्हणजे सुसज्ज प्रयोगशाळा हवी आणि कोणाचें तरी मार्गदर्शन हवें. प्रयत्न करूनहि मेरीला प्रयोगासाठीं रिकामी खोली मिळेना. अखेर पिएर क्यूरींच्या खटपटीनें त्यांच्याच पदार्थविज्ञानाच्या शाळेंतील तळमजल्यावरील एक खोली मेरीला मिळाली.

ती एक अडगळीची खोली होती. ना उजेड ना हवा. प्रयोगाचीं उपकरणींहि बेताबाताचींच होतीं. खोलीचें हवामान प्रयोगाच्या नाजूक, संवेदनशील यंत्रसामुग्रीला प्रतिकूल होतें, आणि तितकेंच तें कोंदट व सर्द वातावरण मेरीच्या प्रकृतीलाहि प्रतिकूल होतें. पण या साऱ्या अडचणी मेरीच्या अंगवळणीं पडल्या होत्या; इतकेंच नव्हे तर प्रतिकूल परिस्थितीशीं झुंज घेण्यांतच तिला आनंद वाटत होता.

पिएर क्यूरींनीं मार्गदर्शकाची उणीव भरून काढली. फ्रान्समधील ते एक सिद्धहस्त संशोधक असल्यानें मेरीची त्यांच्या कर्तृत्वावर श्रद्धा होती. आज-

वरच्या गृहिणी व सखी या नात्यांत 'प्रियशिष्या' या नात्याची नवी भर पडली. अशीं समानशील पति-पत्नीचीं युगुलें जगांत फार दुर्मिळ असतात !

मेरीच्या प्रयोगास सुरुवात झाली. युरेनिअमचा जेवढा सूक्ष्म व विविध रीतीनें अभ्यास करतां येईल तेवढा तिनें केला. त्यांतून बाहेर पडणाऱ्या किरणांचें हवेस विद्युद्वाहकत्व आणण्याचें सामर्थ्य तिनें निश्चित केलें. युरेनिअमवरील कोणत्याहि रासायनिक क्रियेमुळें किंवा त्याला दिलेल्या उष्णतेमुळें या किरणांच्या प्रसरणशीलतेंत फरक पडत नाहीं, असें तिला आढळून आलें. पण युरेनिअमशिवाय आणखी एखाद्या मूलद्रव्यांत ही शक्ति नसेलच कशावरून ? लवकरच तिच्या नजरेस आलें कीं, थोरिअम (Thorium) नांवाच्या मूलद्रव्यांतहि असे किरण बाहेर टाकण्याची शक्ति आहे ! त्या किरणांची प्रसरणतीव्रताहि तेवढीच आहे ! म्हणजे या पदार्थांत एका नवीन गुणाचें अस्तित्व तर सिद्ध झालेंच. त्याला नवीन नांव हवें. 'किरणोत्सर्गता' (Radio Activity)—प्रकाश-किरण बाहेर टाकण्याचें सामर्थ्य असें मेरीनें त्यास नांव दिलें.

याच दृष्टीनें मेरीनें सर्व ज्ञात खनिज पदार्थांचें परीक्षण सुरू केलें. हें काम प्रचंड होतें. पण तिच्या कामाला खंड नव्हता. उत्साहाला अंत नव्हता. हे किरण येतात कोठून ? ही किरणोत्सर्गता त्यांना मिळते कशी याचा शोध लावण्याचा तिनें ध्यास घेतला.

मेरीच्या आजपर्यंतच्या अनुमानांना व अनुभवांना धक्का देणारा एक नवीनच अनुभव मेरीला मिळाला. खनिज पदार्थांत ज्या प्रमाणांत युरेनिअम वा थोरिअम असेल त्याच प्रमाणांत ही किरणोत्सर्गता असेल. पण तिला आतां आढळून आलें कीं, कांहीं खनिज द्रव्यांतील किरणांची तीव्रता युरेनिअममधील किरणांच्या चौपट होती. याचा अर्थ असा नव्हे का, कीं युरेनिअमपेक्षां अधिक शक्तिशाली, स्वयंप्रकाशी व किरण बाहेर टाकण्याची जबर शक्ति असलेला एक वेगळाच पदार्थ या विश्वांत आहे ? हा पदार्थ कोणता ? आजपर्यंतच्या प्रयोगांत तर तो कोणाच्याच अनु-

भवास आला नव्हता. आणखी थोड्या प्रयोगांअंतीं 'पिचब्लेंडी' नांवाच्या खनिज द्रव्यांत प्रकाशकिरण बाहेर टाकण्यास समर्थ असलेलें स्वतंत्र मूलद्रव्य वसत असल्याचें आपलें मत तिनें शास्त्रज्ञांपुढें मांडलें.

पण त्याचें स्वतंत्र अस्तित्व कसें हुडकून काढावयाचें? तें मोठें जिकीरीचें व चिकाटीचें काम होतें. मेरीच्या कार्यांतील प्रगति, तिनें संपादलेलें यश व तिच्या कार्याची अवाढव्यता पाहून पिएर क्यूरींनीं आपलें हातांतलें काम बाजूस ठेवलें, आणि या नवीन कामांत ते मेरीला साहाय्य करूं लागले. त्यांचे 'पिचब्लेंडी'वर प्रयोग सुरू झाले. त्यांतील काढतां येतील तेवढीं मूलद्रव्यें रासायनिक पृथक्करणांनीं अलग करण्यांत आलीं. प्रत्येकाची किरणोत्सर्गता मापली जाऊं लागली. प्रयोगाचें क्षेत्र अधिकाधिक संकुचित करण्यांत येऊं लागलें. त्यांच्या दीर्घ श्रमांचें पारितोषिक देण्यासाठींच कीं काय निसर्गानें एक नवीन आश्चर्य त्यांच्यापुढें उभें केलें. एकाच्या ऐवजीं दोन द्रव्यांचें अस्तित्व भासमान होऊं लागलें!

"तुला या नव्या द्रव्याला कांहीं तरी नांव दिलें पाहिजे, मेरी!" पिएरनीं मृदु आवाजांत मेरीला सुचविलें.

मेरीनें क्षणमात्र विचार केला. तिच्या मातृभूमीची मूर्ति तिच्या नयनासमोर उभी राहिली. साऱ्या जगाचे डोळे पोलंडकडे वेधले जातील. पोलंडमध्यें बुद्धिमत्ता आहे हें जगाच्या निदर्शनास येईल. मातृभूमीचें नांव या शोधाशीं जोडलें तर तें अमर नाहीं कां होणार? रशियानें धुळीस मिळविलेल्या देशाची स्मृति इतिहासांत अमर करण्याची हीच संधि नाहीं का?

"पोलोनिअम—चालेल का हें नांव?" मेरीनें चाचरत उत्तर दिलें.

जुलै १८९८ मधील ही हकीकत. त्या वेळीं मेरीचें वय अवघें २९–३० वर्षांचें होतें.

यानंतर दरसालप्रमाणें आपल्या सुटीचा उपयोग पॅरिसच्या बाहेर सायकलवर सहली काढून वनराजींत भटकण्यांत त्यांनीं केला. सुटीनंतर आपले

प्रयोग त्यांनीं पुढें चालू केले. २६ डिसेंबर १८९८ रोजीं त्यांनीं आपला सिद्धान्त शास्त्रज्ञांपुढें ठेवला.

" वरील विवेचनावरून एकच सिद्धान्त काढावासा वाटतो, आणि तो हा कीं, या किरणप्रसरणक्षम द्रव्यांत कांहीं तरी नवीन ' धातु ' वा मूलपदार्थ आहे. आम्ही त्याला ' रेडियम ' हें नांव सुचवितों."

* * *

रेडियमच्या शोधानें शास्त्रज्ञांना हादरा बसला.

आजपर्यंत निसर्गातील मूलद्रव्यें, त्यांचे स्वभाव, गुणधर्म वगैरे जी व्यवस्था कल्पिण्यांत आली होती ती पार बदलून टाकणें भाग पडणार होतें. त्यामुळें पदार्थविज्ञानशास्त्रज्ञ जरा साशंकतेनें व सावधगिरीनेंच या शोधाकडे पाहूं लागले.

जगांत ज्या ज्या वेळीं नव्या कल्पना, नवे विचार, नवीन शोध पुढें मांडले गेले, त्या त्या वेळीं जुन्याच्या अभिमान्यांनीं व संरक्षकांनीं त्या नव्यांचें स्वागत अशा तटस्थतेनेंच केलें आहे. आजवर जें अनुभवास येत गेलें त्यावर त्यांची निष्ठा बसलेली असे. ज्या पूर्वजांनीं ही व्यवस्था लावून दिली, शास्त्राला प्रतिष्ठा मिळवून दिली, त्यांच्याविषयीं निस्सीम आदराची भावना या सनातन्यांच्या अंतःकरणांत असे. पण त्याबरोबरच नव्याविषयीं अश्रद्धा दाखवून निसर्गाच्या विशालत्वाविषयीं, ज्ञानाच्या विकासावरील, स्वतःच्या व पुढील पिढीच्या कर्तृत्वाविषयीं आपण शंका आणि अविश्वास प्रकट करीत आहोंत त्याची त्यांना जाणीव नसे. खऱ्या शास्त्रज्ञाची ही वृत्ति नव्हे. खरी वैज्ञानिक दृष्टि ही नव्हे. जी गोष्ट अनुभवाला येईल, नुसत्या युक्तिवादानें नव्हे तर प्रयोगानें निरपवाद आणि सप्रमाण सिद्ध होईल, तीच तो आणखी एखादें सत्य आविर्भूत होईपर्यंत प्रमाणभूत मानणार; प्रचलित विज्ञानव्यवस्थेवर काय परिणाम होतील या विचारानें, या भीतीनें मांगें येण्याचें वा थांबण्याचें खऱ्या शास्त्रज्ञाच्या मनांतहि येत नाहीं.

पदार्थविज्ञानज्ञांपेक्षां रसायनशास्त्रज्ञ तर अधिक हटवादी होते. रेडियम ! प्रत्यक्ष दाखवा, त्याचा आकार दाखवा, रंग-रूप पाहूं द्या, त्याचें तोलमोल करा. ॲटोमिक वजन, परमाणुभार नाहीं, तर रेडियम नाहीं !

या शास्त्रज्ञांना रेडियमचें दर्शन घडविण्यासाठीं आणि स्वतःच्या मनाचें समाधान करण्यासाठीं रेडियमची सिद्धि करणें, तो शुद्ध स्वरूपांत दाखविणें हें पुढील कार्य होतें. क्यूरी पतिपत्नीला चार वर्षें त्यासाठीं रात्रंदिवस अविश्रान्त परिश्रम करावे लागले.

पिचब्लेंडीचें संशोधन करून रेडियमची सिद्धता करावयाची म्हणजे दोन तीन खंडी खनिज द्रव्य पाहिजे. एवढा माल खरेदी करावयाचा म्हणजे रक्कमहि तेवढीच मोठी हवी. आणि हें संशोधन करावयाला प्रयोगशाळेची व्यवस्था काय ?

सरकारकडे मदतीची याचना करणें हा मार्ग होता. पण सरकारकडून उत्तेजन मिळेलच अशी खात्री नव्हती. शिवाय सरकारी खात्यांतून उत्तर मिळायला किती विलंब लागेल याचा पत्ता नाहीं. तेव्हां या भान-गडींत पडून कालापव्यय करण्यांत अर्थ नव्हता.

आपणाला लागणारा कच्चा माल त्यांतल्या त्यांत स्वस्त मिळण्याची क्यूरींनीं क्लृप्ति काढली. पिचब्लेंडींतून युरेनिअम काढून घेतलेल्या अव-शेषांतूनच रेडियम सिद्ध करण्याचें त्यांनीं योजलें. युरेनिअम काढून घेतल्यानंतर या अवशेषांना फारशी किंमत पडली नसती. कचऱ्यावारीच हा माल टाकून दिला जातो. बोहेमियांतील सें. जोशिमल येथील खाणीच्या व्यवस्थापकाशीं एका मित्रामार्फत त्यांनीं पत्रव्यवहार सुरू केला, आणि त्याचें उत्तरहि अनपेक्षित असें अनुकूल आलें. तो माल विनामूल्य क्यूरींना पुरविण्यांत येणार होता. क्यूरींनीं फक्त वाहनखर्च केला म्हणजे झालें !

सोर्बोनच्या विद्यालयांत अनेक प्रयोगशाळा आणि खोल्या होत्या. पण त्यांत या प्रयोगांना जागा कोठून मिळणार ? अखेर पिएर क्यूरी ज्या पदार्थविज्ञानशाळेंत शिक्षकाचें काम करीत होते, आणि जेथें मेरीनें आपले

प्रयोग प्रथम प्रथम केले, त्याच शाळेच्या प्रमुखांस विनंति करण्यांत आली, आणि त्यांना तेथें एक खोली मिळाली.

त्या खोलीच्या समोर एक अंगण होतें आणि अंगणांत मोडकळीस आलेली एक पडवीवजा खोली होती. तिला छपरांतून उजेड घेतला होता; आणि उजेडाबरोबर त्यांतून पाऊसहि आंत येत होता! जमिनीला फरशीहि नव्हती. ठिकठिकाणीं खाचखळगे पडले होते. जुनीं कांहीं टेबलें, एक मोडका गंजलेला स्टोव्ह आणि नको असलेला फळा यांची अडगळ तेथें सांठविलेली होती. दोन क्षणहि तेथें उभें राहवलें नसतें इतकें दमट आणि कोंदट तिथलें वातावरण होतें. पण एकदांची जागा मिळाली याचाच मेरीला कोण आनंद झाला!

प्रयोगाचें पहिलें वर्ष त्यांनीं पोलोनिअम आणि रेडियम यांचें पृथक्करण करून त्यांतून मिळणाऱ्या निरनिराळ्या द्रव्यांची किरणप्रसरता मापण्यांत घालविलें. त्यानंतर पिएर आणि मेरी यांनीं कामाची विभागणी केली. पिएरनें रेडियमच्या गुणधर्मांचें संशोधन सुरू केलें, तर मेरीनें 'रेडियम' शुद्ध घन क्षारस्वरूपांत सिद्ध करण्याचें काम आपणांकडे घेतलें.

हें काम अत्यंत दगदगीचें होतें. तासन्‌तास वितळणाऱ्या आणि उकळणाऱ्या कढयांपाशीं उभें राहावयाचें; उकळत्या रसांतून निघणारे उग्र, दुर्गंधी वायु सहन करावयाचे. उकळत्या द्रवांतील फेंस, वरचा तवंग बाजूला काढून बरण्यांत भरावयाचा, पुनः त्यांना कढ द्यावयाचे, त्यांचें शोधन करावयाचें वगैरे उद्योग सारखे चालत. खोलींत—त्या पडक्या झोपडींत—धूर जाण्याची सोय नसल्यानें हें सारें काम मोकळ्या अंगणांत करावयाचें. पाऊस आला कीं त्या उकळत्या कढया उचलून झोपडींत आणावयाच्या. झोपडींतहि पाऊस ठिबकतोच आहे. छप्परावरील टप्‌टप् आवाजानें कान किटून जातातच आहेत. खोलींत हिंवानें हात काकडून जात आहेत. टेबलावरील प्रयोगाची सामग्रीहि पावसानें खराब होण्याची भीति आहेच. या व अशा अत्यंत प्रतिकूल स्थितींत व वातावरणांत मेरीचें काम चालू

होतें. जवळ नोकर नव्हता कीं मदतनीस नव्हता. या साऱ्या परिस्थितींत तिचा सांगाती एकच — तिचा जीवनांतील जिवलग सहचर — पिएर क्यूरी. मेरीनें विद्यार्थिदशेचीं चार वर्षें एकाकीपणें माळ्यावर एकान्तांत काढलीं होतीं. ही तिची घोर तपश्चर्या होती. पण तिचे हातांचे श्रम तर त्याही-पेक्षां अधिक होते. एक मोठें कठोर व्रतच ती पाळीत होती. एक मोठें दिव्य ती करावयास निघाली होती. पण मेरीचा काल अत्यंत आनंदांत जात होता. आपल्या शोधाच्या स्वप्नजालांत ती गुंग होती. बाह्य अडचणींचा तिला विसर पडला होता. बुद्धिमान् आणि प्रेमळ अशा पिएरचा सुखद सहवास तिला लाभला होता. पतीच्या सान्निध्यांत, त्याच्या प्रेमळ व कुशल मार्गदर्शनाखालीं, संशोधनकार्य करण्याचें आजवर कोणाहि स्त्रीच्या वांट्याला न आलेलें भाग्य तिला लाभलें होतें. पिएर आणि मेरी दोघेंहि प्रखर बुद्धिमान्, अंतःकरणानें सारखींच कोमल आणि अंगीकृत कार्याचा दोघांचाहि निदिध्यास सारखाच उत्कट. परस्परांच्या मधुर सहवासांत त्यांचे श्रम कोठल्या कोठें नाहींसे होत.

ते प्रयोगशाळेंत क्वचितच कोणास भेटत. खरें म्हणजे त्यांच्याकडे फारसें कोणी येतच नसत. त्यांचाहि अनायासें उपसर्ग टळे. जे कोणी येत ते पिएरकडे त्यांचें मार्गदर्शन घेण्यासाठीं व शंकाकुशंकांचें निराकरण करून घेण्यासाठीं. तेहि हातांतलें काम तात्पुरतें बाजूस सारून फळ्यावर आकृति काढून, समीकरणें लिहून पृच्छकांचें समाधान करीत. त्यांचें भाषण नेहमींच आल्हादक, उत्तेजनपर असे. येणाराच नव्हे तर दुसरा ऐकणाराहि कांहीं स्फूर्ति घेऊन बाहेर पडे. स्फूर्तीचा अखंड दीप मेरीच्या सान्निध्यांत तेवत होता.

फारच थंडी पडली तर जवळच्या स्टोव्हवर दोन पेले कॉफी करून घ्यावयाची. कंटाळा आला तर खोलींत येरझारा घालावयाच्या, किंवा एकमेकांशीं थोडा वेळ संभाषण करावयाचें; पण तें संभाषणहि हातीं

घेतलेल्या कार्यासंबंधीं नाहीं तर पुढील बेतासंबंधीं असावयाचें. रेडियम सिद्ध झालें तर........

"खरंच पिएर, कसा काय त्याचा रंग असेल?"

"मला तर कांहीं कल्पना येत नाहीं. पण त्याचा रंग मात्र सुंदर असायला पाहिजे." या तऱ्हेचें त्यांचें बोलणें होई.

दिवसामागून दिवस आणि महिन्यामागून महिने चाललेच होते. मेरीला आतां अंगणांत उघड्या हवेंत खपण्याची जरूर नव्हती. शोधलेल्या द्रवांतून घनीभूत रेडियमचे बारीक बारीक स्फटिक कसे तयार होतील याकडे तिचें लक्ष लागलें होतें. अत्यंत स्वच्छ, निरामय प्रयोगशाळेची वास्तविक तिला या वेळीं गरज होती. धुळीचे कण, लोखंडाचे कण यांनीं शुद्ध केलेलीं मिश्रणें खराब होत, आणि मेरीचे बरेच श्रम कैक वेळां वायां जात. तीन साडेतीन वर्षांच्या श्रमानें पिएर तर थकल्यासारखे झाले होते. अलीकडे मेरीचे श्रम त्यांना पाहवत नव्हते. परिश्रमाच्या मानानें मिळत असलेल्या स्वल्प यशामुळें त्यांना कांहींसा उबग आला होता. तूर्त प्रयोगाचा नाद सोडला तर? पण मेरीला कोठें कामाचा कंटाळा आला होता!

२६ डिसेंबर १९०२ची रात्र. घड्याळांत नवाचा ठोका पडला होता. नित्याचा क्रम म्हणजे या वेळीं क्यूरी पतिपत्नी विश्रांतीसाठीं झोपण्याच्या मार्गावर असावयाचीं. पण मेरीचें मन आज झोपडीकडे ओढ घेत होतें. इरीनला थोपटून ती झोपी जातांच हलक्या पावलांनीं ती परतली. झोपी जाण्यापूर्वीं कांहीं तरी चाळा म्हणून इरीनच्या झबल्याला झालर लावायला तिनें शिवणकाम हातीं घेतलें. पण तिचें लक्ष त्याकडे लागेना.

"आपण जरा प्रयोगशाळेकडे जाऊं या का?" तिनें पिएरना विचारलें. तिच्या आवाजांत आजिजीचा स्वर होता. पण त्याची गरज नव्हती. पिएरच्या मनांत तेच विचार घोळत होते. त्यांनीं अंगावर कोट चढवले.

डॉ. क्यूरींना 'आम्ही जरा जाऊन येतों,' म्हणून सांगितलें, आणि गांवाबाहेरचा रस्ता धरला. थोड्याच वेळांत त्या जीर्ण शीर्ण पर्णकुटींतील प्रयोगशाळेपाशीं तें जोडपें येऊन दाखल झालें; पिएरनीं कुलूप उघडलें. दिव्याचें बटन ते दाबणार तोंच मेरीनें त्यांना हळूच म्हटलें—

"थांबा, थांबा; दिवा लावूं नका."

तिनें भिंतीवर ठेवलेल्या फळ्यावरील कांचेच्या बरण्यांकडे पिएरचें लक्ष वेधलें. तिनें म्हटलें, "बघा, तुम्हांला सुंदर रंग हवा होता ना?"

निळसर रंगाचे इवलाले असंख्य इंद्रनीळ जणूं अधांतरीं चमकत होते. रेडियम मूर्त स्वरूप धारण करून त्याच्या जनक-जननीस नितान्त आल्हाद देत होतें. मेरी जागच्या जागीं थबकली; गूढ सुखद संवेदनांनीं तिचें अंतःकरण भारलें गेलें होतें. रेडियमच्या सिद्धतेचें स्वप्न आज साकार झालें. तिच्या जीवनांतील तो अविस्मरणीय क्षण होता.

• • •

विभाग ......
क्रमांक ......
नों. दि. ......

## कर्मयोगाची शिकवण : : १२

विज्ञानाच्या अनन्यनिष्ठ उपासकांचें त्यांच्या प्रयोगमंदिरांत आपण दर्शन घेतलें. आतां त्यांच्या सांसारिक जीवनाची थोडी विचारपूस करूं. या रेडियमच्या संशोधनाचें कार्य सतत चार वर्षें चालू असतां क्यूरींचें गृहसौख्य कशा प्रकारचें होतें, हें पाहणें मेरी क्यूरींच्या चारित्र्याचें यथायोग्य दर्शन होण्यास उपयुक्त ठरणार आहे.

मेरीनें ज्या वेळीं रेडियमच्या संशोधनाचें कार्य अंगावर घेतलें, त्या वेळीं तीं नुकतीच बाळंतपणांतून उठली होती याचा मागें उल्लेख केलाच आहे. प्रापंचिक दृष्टया ही एक नवीन जबाबदारी क्यूरींवर येऊन पडली. इरीनच्या जन्मापूर्वी पिएरच्या पगारांत राजा-राणीचा संसार मोठ्या टापटिपीनें व काटकसरीनें व्यवस्थित चालू होता; पण एक नवा जीव त्यांच्या संसारांत येतांच नवीन आर्थिक बोजा शिरावर घेणें भाग होतें. मेरीला अपत्यांची हौस होती. लहान मुलें तिला आवडत. पण त्यांच्या संगोपनांत सदैव गुरफटून राहणेंहि तिला शक्य नव्हतें. तेव्हां घरांत एखादी दाई, एखादा नोकर यांची तरतूद करणें आवश्यक झालें. पण या वाढत्या खर्चाची तरतूद करावयाची कशी ? प्रा. पिएर 'स्कूल ऑफ फिजिक्स'मध्यें काम करीत. त्यांचें द. म. चें ५०० फ्रँकचें वेतन

आतां घरखर्चास अपुरें पडूं लागलें. मेरीनें डॉ. क्यूरी – पिएरचे वडील– त्यांच्याजवळ राहावयास आल्यानें बुलेवर्द केलरमधलें त्यांचें जुनें घर भाड्यानें देऊन त्यांत थोडी भर घालण्याचा यत्न केला. पण असें दांत कोरून थोडेंच पोट भरणार होतें ? मेरीनें स्वतः नोकरी करून उत्पन्नांत भर घालणें हा एक मार्ग होता. पण पॅरिसमधील नियमाप्रमाणें शाळेंत नोकरीस लागणारी पात्रता मेरीनें प्राप्त करून घेतली नव्हती. तिला अद्याप विद्यापीठाची ' फेलोशिप ' मिळाली नव्हती. अशा रीतीनें वाढत्या प्रपंचाची आर्थिक जबाबदारी सांभाळावी कशी या विवंचनेंत क्यूरीदांपत्य येऊन पडलें.

हे प्रश्न सुटण्याचा मेरीच्या दृष्टीनें आणखी एक मार्ग होता. सोर्बोनेच्या विश्वविद्यालयांत पिएर यांना प्राध्यापकाची जागा मिळाली असती तर आर्थिक अडचणी सहज दूर झाल्या असत्या; इतकेंच नव्हे तर आपलें संशोधनाचें कार्य निर्वेधपणें पिएरना पुढें चालू ठेवतां आलें असतें. तसें पाहिलें तर पिएर यांना अशी जागा मिळावयास कांहींच हरकत नव्हती. आज पंधरा वर्षें त्यांनीं संशोधनाचें कार्य एकनिष्ठेनें केलें होतें. त्यांच्या संशोधनाला शास्त्रीय जगतांत प्रतिष्ठाहि मिळाली होती. अशा अभिजात ज्ञानोपासक आचार्यांची वूज फ्रान्सनें करूं नये याचें मेरीस सखेद आश्चर्य वाटत होतें. पिएर यांची अपेक्षाहि फार मोठीशी नव्हती. दिवसांतून दोन तास शिकविण्याचें काम करावें आणि बाकीचा वेळ संशोधनांत घालवावा ही त्यांची वृत्ति होती. प्रयोगास व संशोधनास सुसज्ज अशा प्रयोगशाळेचीच त्यांना फार निकड होती;आणि उत्कृष्ट प्रयोगशाळा एकट्यादुकट्या व्यक्तीला कशी निर्मितां येणार ? त्याला राजसत्तेचा, जनतेचा पाठिंबा पाहिजे. प्रयोगशाळेच्या सोयीसाठीं व मुबलक फावल्या वेळेसाठीं त्यांना प्राध्यापकाच्या जागेचें महत्त्व वाटे. त्या जागेच्या मानासाठीं ते मुळींच हपापलेले नव्हते.

पण एवढ्याहि अल्प गोष्टी क्यूरींना लाभूं नयेत असा विधि-संकेत होता. सरस्वतीला आपल्या भक्तांनीं सुखसोयीचा आस्वाद घेणें रुचत नाहीं

म्हणा, वा सरस्वतीच्या उपासकावर कृपामेघ वळविण्यांत लक्ष्मीला कमीपणा वाटत असावा म्हणून म्हणा पिएरांचा श्रमभार हलका होण्याचें चिन्ह दिसेना. त्यांना निरुपायानें पोलिटेक्निक स्कूलमध्यें आणखी थोडें काम स्वीकारून कुटुंबाचा गाडा हाकण्याची जबाबदारी पार पाडावी लागली.

तसें पाहिलें तर चार वर्षांच्या अवधींत सोर्बोर्न येथें दोन तीन वेळां प्राध्यापकांच्या जागा रिकाम्या झाल्या. पण उमेदवार म्हणून अर्ज केल्या-वर मतदार मंडळींच्या व अधिकारी वर्गाच्या भेटीगांठी घ्यावयाच्या, त्यांना मोठेपणा द्यावयाचा, त्यांच्यापुढें स्वतःची महती गावयाची, आपली आपण आरती ओवाळून घ्यावयाची इत्यादि ज्या लटपटी खटपटी कराव्या लागतात, त्या 'व्यावहारिक' कौशल्याचा पिएर यांच्या ठिकाणीं पूर्ण अभाव होता; इतकेंच नव्हे तर या गोष्टींचा त्यांना तिटकाराहि होता. त्यामुळें १८९८ मध्यें एक पदार्थवैज्ञानिक रसायनशास्त्रज्ञाची जागा सोर्बोर्न येथें रिकामी झाली, पण ती त्यांना मिळाली नाहीं. १९०२ मध्येंहि पुनः एक खनिजशास्त्रज्ञाची जागा रिकामी झाली. १५–२० वर्षांच्या 'स्फटिकीभावना'च्या व इतर संशोधनांनीं त्यांनीं आपली पात्र-ताहि निस्संदेह रीतीनें प्रस्थापित केली होती. त्यांच्या मित्रांनीं पुष्कळ खटपट केली, पण याहि वेळीं त्यांच्या पदरीं अपयशच आलें. पिएर यांना त्यामुळें मुळींच खेद झाला नाहीं. त्यांना खंत वाटली ती एवढीच कीं, जो वेळ आपण सभासदांच्या घरीं हेलपाटे मारण्यांत घालविला, तो जर संशोधनांत घालविला असता तर तो सार्थकीं लागला असता !

त्याच सुमारास जिनीवाहून पिएर यांना एक निमंत्रण आलें. जिनी-वाच्या विश्वविद्यापीठानें पदार्थविज्ञानशास्त्राच्या प्राध्यापकाची जागा त्यांना देऊं केली. एक स्वतंत्र प्रयोगशाळा त्यांच्या स्वाधीन करण्यांत येणार होती. मेरीलाहि प्रयोगशाळेंत जबाबदार अधिकारी म्हणून नियुक्त करण्यांत येणार होतें. वार्षिक दहा हजार फ्रँक पगार आरंभीं सुच-विण्यांत आला असून प्रत्यक्ष वाटाघाटींत तो वाढवून निश्चित करण्याचें

आश्वासन होतें. क्यूरी पतिपत्नींनीं प्रथम या निमंत्रणाचा स्वीकार केला. त्यांनीं स्वित्झरलंडची सफरहि केली आणि प्रत्यक्ष वस्तुस्थितीचें निरीक्षण केलें. पण मागाहून त्यांनीं विचार बदलला. येथें राहून नवीन अध्यापनाचें काम अंगावर घ्यावयाचें, म्हणजे तिकडे चालू असलेलें रेडियमच्या संशोधनाचें कार्य अर्धवट सोडून द्यावयाचें;- ही गोष्ट त्यांच्या मनास रुचेना. जिनीवा विद्यापीठास दिलगिरीप्रदर्शक पत्र पाठवून क्यूरींनीं लक्ष्मीकडे पाठ फिरविली. सांपत्तिक सुस्थितीच्या मोहजालांत क्यूरी गुरफटले असते तर जग केवढ्या मोठ्या शोधाला मुकलें असतें !

परत आल्यावर पिएर यांना सोर्बोर्नला जोडलेल्या रुक्युविरमधील अधिक पगाराची नोकरी मिळाली. त्याच वेळीं मेरीलाहि व्हर्सायजवळच्या सेवरेस येथील मुलींच्या हायर नॉर्मल स्कूलमध्यें अध्यापिकेची जागा मिळाली.

प्रा. पिएर यांच्या मित्रांनीं पुनः एकवार प्रयत्न करावयाचें ठरविलें. सोर्बोर्न येथें पॉल ॲपेल नांवाचे एक अनुभवी प्राध्यापक 'डीन' म्हणून निवडून आले होते. फ्रान्स सरकारतर्फे देण्यांत येणाऱ्या 'लिजन ऑफ ऑनर'चा मान पिएर यांना मिळाला तर पुढें त्यांना विद्यापीठांत प्राध्यापकाची जागा मिळणें सोपें जाईल असें त्यांना वाटलें. शास्त्रविभागांतून नांवें सुचविण्याची कामगिरी त्यांजकडे होती. मेरीचे ते जुने शिक्षक होते. मेरीबद्दल त्यांना आदर व प्रेम वाटे. 'आपण तुमचें नांव या मानासाठीं सुचवीत आहों. मानचिन्हें आपण धारण करा वा करूं नका; पण मान नाकारूं नका,' म्हणून त्यांनीं पिएर यांना पत्र लिहिलें. पिएर यांचा स्वभाव त्यांना ठाऊक असल्यानें त्यांनीं मेरीलाहि पिएर यांचें मन वळविण्याबद्दल गळ घातली. पण पिएरनीं कोणाची भीडभाड न धरतां तो मान स्वीकारण्यास साभार नकार दिला. त्यांनीं पॉल ॲपेल यांना कळविलें कीं, प्रधानमंडळाचे माझ्या वतीनें आभार माना आणि त्यांना कळवा कीं, मला या मानसन्मानांच्या बिरुदावलीपेक्षां प्रयोगशाळेची अधिक निकड व गरज

आहे. चालत आलेली एक सुवर्णसंधि क्यूरींनीं दवडली. त्यामुळें आर्थिक स्वास्थ्याची आशा दूरावली.

या सर्वांचा परिणाम हळूहळू मेरीच्या प्रकृतीवर दिसूं लागला. आपल्या नित्याच्या व्यवसायापुढें खाणेंपिणें, झोप इत्यादि बाबतींत मेरीनें स्वतःला व पिएर यांना लावलेली शिस्त हळूहळू ढिली पडली. खाण्यापिण्याच्या बाबतींत वेळ-अवेळच नव्हे तर हलगर्जीपणाहि होऊं लागला. पूर्वीप्रमाणें दरवर्षी उन्हाळ्याच्या सुटींत विश्रांतीसाठीं कोठें तरी जाण्याच्या क्रमांत जरी खंड पडला नव्हता, तरी त्यांत पूर्वीसारखें त्यांचें मन रमत नव्हतें. पिएर यांच्या अस्थिर स्वभावामुळें, आपण निरुद्योगी होत आहोंत असें त्यांचें टुमणें सुरू होऊन लगेच ते परत फिरत आणि प्रयोगशाळेंत कामास जुंपून घेत. डॉक्टरांच्या प्रबंधासाठीं मेरी अविश्रांत झटतच होती. या सर्वांचा परिणाम होऊन चार वर्षांत मेरीचें वजन पंधरा पौंड घटलें. क्यूरींच्या मित्रांनीं त्यांना या गोष्टींकडे, स्वतःच्या प्रकृतीकडे व मेरीच्या प्रकृतीकडे दुर्लक्ष न करण्याबद्दल निक्षून बजावलें.

या चार वर्षांच्या अवधींत मेरीनें आपल्या पतीसमवेत पोलंडला दोनदां भेट दिली. ऑस्ट्रियन पोलंडमध्यें झेकोपेन येथें ब्रोन्या व डॉ. दुलुस्की यांनीं आपला संसार थाटला होता. तेथें त्यांनीं एक आरोग्यगृह—सॅनेटोरियम—बांधण्याचें काम सुरू केलें. प्रा. लादिस्लाव स्क्लोडोवस्कीहि येथें आले होते. पिएर व मेरी याची ही सफर मोठ्या आनंदाची झाली. पिएर अस्सल पोलिश भाषेंत सर्वांशीं बोलून सर्वांना चकित करीत. एका पोलिश तरुणीनें एका जगप्रसिद्ध शास्त्रज्ञाला आपले अंकित केल्याची ती साक्ष होती. या भावनेनें सर्वांचे डोळे मेरीकडे लागत, आणि मेरीच्या नेत्रांत सानंद अभिमानाची लहर नाचूं लागे. प्रा. लादिस्लाव यांचें पितृहृदय तर आनंदानें ओसंडत होतें. त्यांना वाटे दिवस काय भराभरा गेले होते. काल परवां शाळेंत जाणारीं हीं मुलें किती मोठीं झालीं. साऱ्यांनींच जगांत नांव काढलें; आणि छोटी मन्युसा – हिनें

तर कळसच केला होता. तिचे एकामागून एक शास्त्रीय शोध छापून येत होते. आपल्या अतृप्त आशा—आकांक्षा तिच्या ठायीं फळास आल्या म्हणून मेरीचा त्यांना अत्यंत अभिमान वाटूं लागला.

त्यानंतर तीन वर्षांनीं मेरी पुनः पोलंडला आली ती आपल्या पित्याच्या शवाचें अंत्यदर्शन घेण्यासाठीं. तिची आणि वडिलांची शेवटच्या आजारपणांत भेट होऊं शकली नाहीं. मेरीनें वडिलांच्या शवासमीप अतोनात शोक केला. आपण आपल्या पित्याची वृद्धापकालांत कांहीं सेवा केली नाहीं म्हणून तिचें मन तिला खात होतें. तिनें स्वतःला बोल लावून घेतला. फ्रान्समध्यें वास्तव्य केल्याबद्दल स्वतःची निर्भर्त्सना केली. तिच्या अश्रूंना खळ पडेना. तिच्या आत्मनिंदेला खंड पडेना. अखेर ब्रोन्या व जोसेफ यांनीं मोठ्या कष्टानें तिचें समाधान केलें.

पिएर आणि मेरी पुनः प्रयोगशाळेंत काम करूं लागलीं. पण त्यांचीं शरीरें थकलेलीं होतीं. मनाला उत्साह राहिला नव्हता. तशांतच मेरीला कांहीं दिवस गेले. पण अशक्तपणामुळें ती अकालीं प्रसूत झाली. मूल जन्मतःच मरण पावलें. मेरीला मुलाची अत्यंत हौस तर होती; पण आपल्याच श्रमाच्या अतिरेकामुळें हा सारा अनर्थ ओढवला म्हणून ती कष्टी झाली. थोड्याच दिवसांत पोलंडहून आणखी एक शोककारक वार्ता आली. ब्रोन्याचा दुसरा मुलगा थोडक्याशा आजारानंतर कालवश झाला होता. अंतःकरणाला हादरा बसविणारी, जीविताच्या स्थिरतेवरून श्रद्धा उडविणारी ती घटना होती.

या शोककारक घटनांनीं मेरीचें मन खिन्न, विषण्ण झालें होतें. त्यांचा थोडासा विसर पडतो न पडतो तोंच एक नवीनच काळजी तिच्या अंतःकरणांत घर करूं लागली. पिएर यांची प्रकृति ढासळूं लागली होती. त्यांना संधिवाताचा विकार आहे असें डॉक्टर म्हणत. पण रोगाचें नीट निदान झालेंच नव्हतें. त्यांच्या पायांत, पाठींत जोरानें इतक्या तीव्र सणका निघत कीं रात्र रात्र डोळ्याला डोळा लागत नसे. पिएर अंथरुणावर विव्हळत

पडत आणि मेरी त्यांच्या उशाशीं जागत बसे. पुनः दिवस उजाडला कीं पाठाचीं टिपणें, अध्यापनाचें काम व प्रयोगशाळा हीं कामें मेरीपुढें हात जोडून उभीं असतच !

मेरी आपल्याकडून आपल्या मनाला धीर देण्याचा प्रयत्न करीत होती. शक्य तेवढें आपलें मन स्वस्थ असल्याचें ती दाखवी. पण अखेर तिचा धीर सुटूं लागला. मृत्यु आपल्याभोंवतीं घिरट्या घालीत आहे अशी शंका तिच्या मनाला व्याकुळ करूं लागली. अखेर एक दिवस पिएरच्या छातीवर डोकें ठेवून ती अश्रु गाळूं लागली. अस्फुट स्वरांत पिएरला हांक मारून ती म्हणाली :

" पिएर, आपल्यापैकीं कुणीहि आधीं गेलं तर—तर मागं राहणाराला जीवन असह्य होईल रे. आपण एकमेकांशिवाय जगणं कठिण आहे."

पिएर क्षण दोन क्षण तिच्या मुखाकडे निश्चल दृष्टीनें पाहात राहिले. थोडा वेळ ते कांहींच बोलले नाहींत, आणि मग मान हालवून धीर-गंभीरपणें तो स्थितप्रज्ञ उद्‌गारला :

" छेः छेः ! आपली जरी ताटातूट झाली,—आत्मा कुडी सोडून गेला, तरी आपली शास्त्राची सेवा अखंड चालू राहिलीच पाहिजे ! "

• • •

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ना. क्र. ...४४९... नों. दि ...........
वि. ........ क्र. ......

## प्रासाद कीं पर्णकुटी ? : : १३

" मोठं खट्याळ आहे बुवा तुमचं हें पोर. मूर्ति ल्हान, पण कीर्ति मोठी." प्रा. बेकरेल खिशांतील काचनलिका बाहेर काढीत म्हणाले.

प्रकार असा होता कीं, प्रा. बेकरेल यांनीं आपल्या जाकिटाच्या खिशांत एक काचनलिका ठेविली होती. तिच्यांत रेडियमचा थोडासा अंश होता. रेडियमच्या अंगीं जें प्रखर किरण बाहेर टाकण्याचें सामर्थ्य होतें, त्या किरणांच्या उष्णतेनें त्यांना चटके बसले होते !

रेडियमचे एक एक अद्भुत गुणधर्म उजेडांत येऊं लागले. रेडियम-मधून 'हेलियम' नांवाचा वायु बाहेर पडत असल्याचें दोन इंग्लिश शास्त्रज्ञांनीं प्रयोगांतीं सिद्ध केलें. रेडियम – सामान्यतः साध्या मिठासारखें दिसणारें पांढरें शुभ्र चूर्ण – विलक्षण पदार्थ असल्याचें अनुभवास येऊं लागलें. त्यांतून तीन वेगवेगळ्या प्रकारचे किरण बाहेर पडतात. शिसें सोडून वाटेल त्या धातूंतून रेडियममधून बाहेर पडणारे किरण प्रवेश करूं शकतात. उष्णता निर्माण तर तो करतोच, पण बाहेरच्या वातावरणाला विद्युद्ग्राहक बनविण्याचें सामर्थ्यहि त्याच्यांत आहे; त्यांतून बाहेर पड-णाऱ्या वायुरूप पदार्थानें काचनलिकेवर निळसर छटा पसरते; कागदांत वा कापसांत ठेवल्यास ते पदार्थ जळून गेल्यासारखे होतात; अंधारांत

त्याचे प्रकाश-किरण दिसतात, ते इतके तेजस्वी असतात कीं त्या प्रकाशांत सहज वाचतां येईल. त्याच्या प्रकाशोत्सर्गाची बाधा जवळपासच्या सर्वच वस्तूंना होते. ते सारे चकचकीत होतात आणि अंधारांत चमकूं लागतात. खरे आणि खोटे हिरे त्याच्या साहाय्यानें पारखतां येतात. एक ना दोन रेडियम म्हणजे अद्भुत किमया !

पण मानवजातीवर महान् उपकार करण्याचें रेडियमचें सामर्थ्य तर यापुढेंच आहे. वॉरवॉफ व जायसेल नांवाच्या दोन जर्मन शास्त्रज्ञांच्या असें निदर्शनास आलें कीं, रेडियमचा परिणाम शरीराच्या कातडीवर कांहीं तरी होतो. लगेच पिएरनीं त्याचा स्वतःच्या शरीरावर प्रयोग केला. रेडियमच्या किरणांसमोर कांहीं वेळ आपला हात धरला. हात भाजून त्याच्यावर ढबूपैशाएवढा फोड उठला. हळूहळू त्याचा लालपणा वाढत गेला. कातडी सोलली जाऊन तेथें जखम झाली. जवळजवळ दोन महिन्यांनीं ती भरून निघाली. पण कातडीवर व्रण मात्र कायम राहिला. ही रेडियमची शक्ति विस्मयजनक होती. डॉक्टरांच्या साह्यानें निरनिराळ्या प्राण्यांवर त्याचे प्रयोग करण्यांत आले. रोगाच्या पेशी नष्ट करण्याची शक्ति रेडियमच्या अंगीं असल्याचें प्रत्ययास आलें. रेडियमनें कॅन्सरच्या कांहीं विकारांवर — आतांपर्यंत असाध्य समजल्या गेलेल्या रोगावर — इलाज होऊं शकतो ! एका भयानक रोगांतून मानवाला मुक्त करण्याची एक औषधि सांपडली. क्यूरी आजच्या युगाचे धन्वंतरी ठरले !

चार वर्षांच्या अवधींत प्रा. पिएर व मेरी यांनीं कधीं स्वतंत्रपणें, तर कधीं एखाद्या सहकाऱ्याच्या मदतीनें, तर कधीं या पति-पत्नींनीं मिळून रेडियम किरण, रेडियम धातु, रेडियमयुक्त धातु, त्यांच्या रासायनिक क्रिया, परमाणूंतील परिवर्तनशीलता, इत्यादि रेडियमसंबंधीं अनेक विषयांवर प्रयोग व संशोधन करून बत्तीस निबंध जगापुढें ठेवले. इंग्लंड, जर्मनी, डेन्मार्क, ऑस्ट्रिया, इत्यादि देशांतील शास्त्रज्ञांचें लक्ष त्यांजकडे वेधलें. क्यूरी पति-पत्नींचा शास्त्रीय जगांत बोलबाला होऊं लागला.

रेडियमयुक्त धातूंच्या संशोधनावर मेरी क्यूरीनें लिहिलेला प्रबंध पॅरिस विश्वविद्यालयानें मान्य करून मा. क्यूरीला पदार्थविज्ञानांतील " डॉक्टर " ही अत्युच्च पदवी अभिनंदनपूर्वक अर्पण केली.

१९०३ च्या जूनमध्यें लंडनच्या रॉयल सोसायटीनें प्रा. पिएर क्यूरी यांना ' रेडियम 'वर व्याख्यान देण्यासाठीं पाचारण केलें. प्रा. क्यूरींनीं सप्रयोग रेडियमची माहिती शास्त्रज्ञांना दिली. लंडनमध्यें अनेक संस्थांतर्फे क्यूरी पति-पत्नींचा सन्मान–सत्कार झाला. अनेक थाटाच्या मेजवान्या झाल्या. मा. क्यूरींना बघण्यासाठीं अनेक लोक येत होते. एक स्त्री वैज्ञानिक असूं शकते, संशोधन करून मोठे शोध लावूं शकते, ही एक इतिहासांतली अपूर्व घटना त्यांना वाटत होती. क्यूरी पति-पत्नींना मात्र त्या आदरसत्काराचें ओझें वाटूं लागलें. त्यांचे विचार, सारें लक्ष आपले प्रयोग – संशोधन यांकडे लागलेलें असें. एका मेजवानीहून परत आल्यावर तेथें जमलेल्या स्त्रियांच्या गळयांतील रत्नहारासंबंधीं मेरी बोलत होती, " मला कल्पना नव्हती, इतकीं भारी रत्नं या पृथ्वीवर असतील अशी. "

" हो, पण मेजवानीच्या वेळीं माझ्या डोक्यांत कोणता विचार घोळत होता सांगूं ? " पिएरनीं प्रत्युत्तर केलें, " या बायकांच्या गळयांतील हारांच्या किंमतींत किती प्रयोगशाळा बांधतां येतील, याचा स्वतःशीं हिशेब केला मीं. भोजन संपेपर्यंत आकाशांतील ताऱ्यांइतकी संख्या फुगली त्यांची ! "

* * *

नोव्हेंबर महिन्यांत इंग्लंडनें रॉयल सोसायटीचें उच्चतम मानचिन्ह जें ' डेव्ही पदक ' तें क्यूरी पति-पत्नींस अर्पून त्यांचा यथोचित गौरव केला. क्यूरींच्या भावी जागतिक मानसन्मानाचें तें प्रसादचिन्ह ठरलें. कारण एकच महिन्यानें स्वीडनच्या ' ॲकॅडेमी ऑफ सायन्स ' या संस्थेनें त्या वर्षीचें ( १९०३ ) पदार्थविज्ञान विषयाचें नोबेल पारितोषिक क्यूरी पति-पत्नी व प्रा. बेकरेल यांच्यांत विभागून दिल्याचा निर्णय

प्रसिद्ध केला. प्रसिद्धिविमुख क्यूरी दांपत्याचा गौरव करण्यासाठीं यशोदेवता कीर्तिमाला घेऊन आली होती !

* * *

आजवर उपेक्षिल्या गेलेल्या क्यूरी कुटुंबाचें भाग्य उजळलें. वर्तमानपत्रांतून त्यांचीं विविध छायाचित्रें येऊं लागलीं. 'शास्त्रज्ञ जोडपें', 'प्रेमळ गृहिणी', 'आदर्श माता' इत्यादि विशेषणांच्या मालिकांचा वर्तमानपत्रांतून त्यांजवर वर्षाव होऊं लागला. क्यूरी पतिपत्नींचे नव्हे तर छोट्या इरीनचे, त्यांच्या 'डिडी' मांजराचेसुद्धां फोटो प्रसिद्ध झाले ! बुलेवार्द केलर्मन मधील त्यांच्या बंगल्याला 'शास्त्रज्ञांच्या आश्रमा'चें महत्पद लाभलें, आणि ती मोडकी झोपडी—त्या 'रेडियम'च्या जन्मगृहाचा भाग्यकाल आला ! ज्या झोपडीकडे कधीं कोणी चुकून फिरकावयाचें नाहीं, ढुंकून पाहावयाचें नाहीं, त्याचीं रकानेच्या रकाने रसभरित वर्णनें वर्तमानपत्रांनीं दिलीं. 'क्यूरी जोडपें' म्हणजे जगांतील महान् आश्चर्य, अद्भुत व्यक्ति असें जो तो म्हणूं लागला. पण या असंख्य नेत्रांची नजर आपणांवर केंद्रित झाल्यामुळें क्यूरींना मात्र कोंडमारा झाल्यासारखें वाटूं लागलें. प्रसिद्धीची झगझगीत प्रभा त्यांना असह्य होत होती.

मेरीनें एका पत्रांत लिहिलें आहे :

"लोक रेडियम-वेडे झाले आहेत. प्रसिद्धीच्या उच्च लाटेवर आमचें जीवन हेलावत आहे. जगाच्या कानाकोपऱ्यांतून वर्तमानपत्राचे बातमीदार मुलाखतीसाठीं आणि छायाचित्रासाठीं आम्हांस सतावीत आहेत. आमच्या छोट्या इरीनचें तिच्या अय्याबरोबरचें भाषणसुद्धां त्यांनीं छापलें आहे. आमच्या घरांतल्या मांजरीचें वर्णनसुद्धां त्यांनीं दिलें आहे. ......क्षणाचीहि फुरसत आम्हांला उरली नाहीं......

"व्याख्यानें आणि लेख यासाठीं चोहोंकडून आम्हांला आग्रह होत आहे. आम्हीं यांतच कालापव्यय केला तर हेच लोक कांहीं वर्षांनीं आम्हीं कांहीं केलें नाहीं म्हणून आम्हांला दोष देतील."

अनपेक्षित आणि प्रचंड प्रसिद्धीमुळें क्यूरी बावरले तर होतेच, पण ही कीर्ति आपल्या भावी प्रगतीच्या मार्गांत जबरदस्त अडथळा निर्माण करणार असें त्यांना भय वाटत होतें. हीच भीति आणि व्यथा मेरीच्याहि पत्रांत दिसून येत होती.

“ आमच्या जीवनांतली निरामयता नाहींशी झाली आहे. पुनः कधीं ती परत मिळेल कुणास ठाऊक ! ”

*  *  *

मनांत आणलें असतें तर या रकमेवर क्यूरींना आपलें उत्तर आयुष्य स्वस्थपणें घालवितां आलें असतें. पण श्रीमंतीच्या व सुख-स्वास्थ्याच्या कल्पनाहि त्यांच्या अंतःकरणास शिवल्या नाहींत. रक्कम हातीं येतांच २०,००० फ्रँक मेरीनें डॉ. दुलुस्कींना त्यांच्या आरोग्यमंदिरासाठीं कर्ज म्हणून पाठवून दिले. पिएरचे बंधु व इतर आप्त, तसेंच स्वतःचे आप्त यांना तिनें भेटी दिल्या. विशेषतः पोलिश विद्यार्थ्यांसाठीं म्हणून कांहीं रकमा तिनें देणगीदाखल दिल्या. आपल्या अडचणीच्या काळांत ज्यांनीं ज्यांनीं तिला हात दिला, त्या सर्वांना स्मरणपूर्वक तिनें कांहीं ना कांहीं पाठविलें. ज्या कोझलोस्का बाईनीं तिला फ्रेंच शिकविलें होतें, त्यांना मुद्दाम वॉर्सॉहून आपल्या खर्चानें पॅरिसला आणून त्यांचा तिनें सत्कार केला. तिनें सर्वांना कांहीं ना कांहीं दिलें, पण स्वतःसाठीं एक नवी हॅट आणण्याचा विचारहि तिच्या मनांत आला नाहीं !

आतां, रेडियमला नुसतें प्रायोगिक आणि पुस्तकी महत्त्व राहिलें नव्हतें. रेडियमचा व्यवहारांत फार महत्त्वाचा उपयोग होऊं लागला होता. कॅन्सरसारख्या असाध्य समजल्या जाणाऱ्या दुर्धर रोगांतील कांहीं अवस्थांत व प्रकारांत रेडियमचा उपयोग होतो असें अनुभवास येऊं लागल्याचें मागें सांगितलेंच आहे. त्यांतून ‘क्यूरी–उपचार–पद्धति’ ही व्यवस्थित रीतीनें तयार होत होती. अनेक फ्रेंच डॉक्टर मेरीनें तयार केलेल्या रेडियमपासून तयार झालेल्या द्रव्यांचा उपयोग

करूं लागले होते. त्यामुळें रेडियमची 'बाजारी' किंमत वाढली. पण याहिपेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे रेडियमनिष्पत्तीचें तंत्र, रासायनिक प्रयोग-पद्धति यशस्वी रीतीनें क्यूरींनींच तयार केली होती. तिचें समग्र ज्ञान अद्याप जगाला झालें नव्हतें. तें हस्तगत करण्यासाठीं देशोदेशींचे कारखानदार उत्सुक होते.

रेडियमची मोठ्या प्रमाणावर निर्मिति होणें अगत्याचें असल्यानें सेंट्रल केमिकल प्रॉडक्ट्स कंपनीनें क्यूरींच्या मार्गदर्शकत्वाखालीं तें काम सुरू केलें. १९०२ मध्यें फ्रेंच सायन्स ॲकॅडेमीनें क्यूरींना २०,००० फ्रँकचें कर्ज त्यासाठीं देऊं केलें. लवकरच एका पुंजीपतीच्या मनांत डॉक्टरांना रेडियम पुरविण्यासाठीं स्वतः कारखाना काढण्याची कल्पना आली. त्यानेंहि क्यूरींचें साहाय्य घेतलें. जगांतल्या इतर देशांतहि रेडियम निष्पन्न करण्यासाठीं लोक धडपडूं लागले, आणि यांतूनच कुबेराची अलोट संपत्ति मिळविण्याची संधि क्यूरींपुढें येऊन उभी राहिली.

एका सकाळच्या टपालांत पिएर क्यूरींना अमेरिकेंतून एका कारखान-दाराचें पत्र आलें होतें. त्यांना रेडियमसंबंधीं सर्व प्रक्रियांची समग्र माहिती हवी होती. पिएर यांनीं मेरीपुढें वस्तुस्थिति मांडण्यास आरंभ केला :

> "आपल्याला रेडियमसंबंधीं कांहीं तरी निश्चित विचार ठरवला पाहिजे. एक तर आपण केलेल्या संशोधनाची सर्व माहिती जगापुढें मोकळेपणानें आपण मांडली पाहिजे किंवा 'रेडियम'चे आपण संशोधक 'मालक' या नात्यानें ती सर्व माहिती प्रसिद्ध करण्यापूर्वीं रेडियम तयार करण्याच्या पद्धतींचें आपल्याला पेटंट घेतलें पाहिजे; म्हणजे प्रत्येक वेळीं जगांत कोठेंहि रेडियम तयार होतांना त्यावर आपल्याला हक्क सांगतां येईल. पैसे मागतां येतील."

मेरीनें दोन मिनिटें विचार केला आणि उत्तर दिलें :

> "छेः छेः ! तसें करणें शास्त्रीय परंपरेला सोडून होईल. शास्त्रज्ञांच्या ब्रीदाला त्यानें कमीपणा येईल.

"मलाहि तसेंच वाटतें, पण ही विचार करण्याची वेळ आहे. एकदां हातून बाण सुटला कीं परत येणार नाहीं. आपलें सारें जीवन हालअपेष्टांत जात आहे. तसेंच तें जाणार असा रंग दिसतो. आपल्या मुलीच्या शिक्षणाची तजवीज आपणांस करायला हवी." पिएर यांनीं संथपणें म्हटलें.

पण मेरीचा विचार डळमळीत नव्हता. तिनें पुनः आवेशानें उत्तर दिलें, "शास्त्रीय ज्ञान ही एका व्यक्तीची खाजगी मालकीची बाब होऊंच शकत नाहीं; आणि त्या ज्ञानाच्या जोरावर आपल्याला पैसा मिळविण्याचा हक्क पोहोंचत नाहीं. रेडियमच्या ज्ञानावर साऱ्या जगाची मालकी आहे. पाश्चरपासूनच्या सर्व वैज्ञानिकांनीं आपलें भांडार वेळोवेळीं जगापुढें टाकलें. आपल्याला ही उज्ज्वल परंपरा राखलीच पाहिजे."

पिएरनीं अमेरिकन कारखानदारास रेडियम संशोधनाची सविस्तर माहिती उलट टपालीं पाठविली.

एका क्षणांत क्यूरींनीं केवढा महत्त्वाचा निर्णय ठरविला, आणि केवढा प्रचंड त्याग केला. कुबेराच्या वैभवावर त्यांनीं पाणी सोडलें होतें. रेडियमच्या संशोधनाचें गूज जर त्यांनीं पेटंटरूपानें 'सुरक्षित' केलें असतें तर आज अमेरिकेंतील रॉकफेलरसारख्या अब्जाधिपतींना लाजविणारी संपत्ति क्यूरींच्या पायाशीं ओळंगत राहिली असती!

• • •

## निर्दय विधिलिखित : : १४

" मेरी, किती सुखी केलंस मला तूं! किती रम्य आहे आपलं जीवन!"

ईस्टरच्या सुटीचे दिवस होते ते. आज किती दिवसांनीं सुटीचा आनंद क्यूरी पति-पत्नींना उपभोगण्याइतकें स्वास्थ्य लाभलें होतें. दर उन्हाळ्याच्या सुटींत शहरापासून दूर जावयाचें; आपल्या नित्याच्या कामांतून मनाला विसांवा द्यावयाचा; ग्रामीण वातावरणांत, मोकळ्या हवेंत कांहीं दिवस निवान्तपणें घालवावयाचे; आसपासच्या वनराईंत स्वच्छंदानें हिंडून वासंतिक वनश्रीचें सौंदर्य लुटावयाचें; सायकलवर दूर दूर मजला मारायच्या; कधीं तळ्यांत डुंबावयाचें, कधीं आपल्या आवडीचीं फुलें गोळा करीत करीत, निसर्गशोभेचें सूक्ष्म अवलोकन करावयाचें, आणि हिरवळीवर लोळत विश्रांति घ्यावयाची, व मग नव्या उत्साहानें व उल्लासानें आपल्या कामाला लागावयाचें, असा मेरी–पिएर यांचा परिपाठ होता. दोघांनाहि निसर्गसौंदर्याची सारखीच आवड होती; आणि या समान अभिरुचींत उभयतांच्या निकटतर सहवासाच्या संधीची भर पडे. तसें म्हटलें तर मेरी आणि पिएर यांचा वियोग कधीं झालाच नाहीं. प्रयोगशाळेंतहि तीं एकत्रच काम करीत. पण वनविहाराच्या सहवासांत कामाच्या व्यग्रतेमुळें येणारी वियोगाची अंधुक छायाहि नसे. त्यामुळें सुटीच्या

कार्यक्रमाचें महत्त्व त्यांना वाटे. पण अलीकडे कांहीं वर्षांत त्यांच्या परिपाठांत खंड पडण्यासारखे प्रसंग निर्माण होत. कधीं मेरीचें बाळंतपण, तर कधीं पिएरचें आजारपण; कधीं वनविहाराला येऊनहि पिएरच्या मनाची अस्वस्थता, संशोधनाच्या कामांत खंड पडतो या कुरकुरीनें परत जाण्याची त्यांना होणारी घाई, यामुळें सुटीचें सौख्य फारसें त्यांनीं उपभोगलेंच नव्हतें. यंदांची सुटी त्या मानानें त्यांची चांगली गेली. शिवाय या वेळीं इरीन व ईव्ह हीं दोन्ही अपत्यें बरोबर असल्यानें त्यांच्या बाललीलांची बाल-बोलांची भर त्यांच्या आनंदांत पडली होती. छोट्या ईव्हशीं खेळण्यांत पिएरना मोठा आनंद वाटे. तिच्या मागून ते धांवत, रोज सकाळीं उठून जवळच्या गौळीवाड्यावर तिला घेऊन दूध आणावयास जात, बागडणाऱ्या वासरांची मौज तिला दाखवीत, आणि तिला अंगाखांद्यावर खेळवून, झोके देऊन तिची करमणूक करीत. इतक्या मोकळेपणानें व प्रसन्न वृत्तीनें पिएर सुटी घालवीत असलेले पाहून मेरीला समाधान वाटत होतें. त्यांच्या प्रकृतींतील सुधारणा पाहून तिला हायसें वाटत होतें. त्यांच्या वृत्तींत नवचैतन्य येत असल्याचें बघून तिचें हृदय शांत झालें होतें.

एका दुपारची ही गोष्ट. इरीन हातांत एक छोटेंसें हिरवें जाळें घेऊन रंगी-बेरंगी फुलपांखराचा पाठलाग करीत होती. एखादें सावज जाळ्यांत सांपडलें कीं ती आनंदानें नाचे. आपल्या आईला तें आणून दाखवी. त्याच्या रंगांची शोभा पाही. त्याच्या मऊमऊ पंखांना नाजूक स्पर्श करी आणि मग हळूच सोडून देई व नव्यानें आपला खेळ सुरू करी. छोटी ईव्ह बहिणीच्या मागें धांवत दमत होती. 'मला पाहूं, मला पाहूं' म्हणून आपली अधीरता व्यक्त करीत होती. आपल्या चिमुकल्या बोटांची उघडझांप करून 'पकललं', म्हणून खोटाच आविर्भाव आणीत होती. त्यांची क्रीडा पाहात पिएर जमिनीवर पहुडले होते. मेरीहि जवळ स्वस्थपणें विसांवा घेत होती. त्या क्षणीं गेल्या अकरा वर्षांतील साऱ्या गोड स्मृति पिएरच्या अंतःकरणांत जाग्या झाल्या. अनेक सुखद क्षणांचा मधुर

सुगंध दरवळूं लागला. मेरीनें आपल्या जीवनांत प्रवेश केला आणि आपलें जीवन उजळून टाकलें; आपल्या भटक्या जीवनाला स्थिरता आणली, एकाकी जीवनांत सुखसंपदेचा मधुर वर्षाव केला. आपलें जीवन एक स्वप्न होतें; मेरीच्या हस्तस्पर्शानें तें फुललें; शास्त्रज्ञांचें जीवन किती दगदगीचें, जिकिरीचें, एकलकोंडेपणाचें;– पण मेरीच्या सहवासांत ते कष्ट कुठच्या कुठें पळाले. प्रपंचाची जबाबदारी तिनें कुशलतेनें सांभाळली, आपल्याला त्याचा यत्किंचितहि उपसर्ग पोहोंचला नाहीं, उलट तें काम संभाळून तिनें आपणांस किती अमोल साहाय्य केलें, तिचा आपणांस केवढा आधार वाटे, ती शेजारीं काम करीत असली तरी तेवढ्यानें तिच्या सहवासाचा आनंद लाभे, तिच्या स्मिताच्या मंद प्रभेनें आपला कंटाळा जाई, प्रयोगांतल्या शंकाकुशंका दूर सरत, तिच्या सहवासांत तिच्या बौद्धिक सहकार्यानें अनेक कूटें कशीं सहज उलगडतात; पण प्रियशिष्या व सहकारी या नात्यापेक्षां प्रेमळ, कामसू गृहिणी व जिवलग सखी या नात्यानेंच तिनें आपल्या जीवनांत किती आल्हाद आणला, किती रस निर्माण केला; तिच्यामुळेंच जीवनाच्या अनुपम माधुरीचा आस्वाद आपणांस घेतां आला–अनंत कोमल भावलहरींनीं पिएरचें हृदय भरून आलें. आपलीं बोटें मेरीच्या केसांतून प्रेमभरानें त्यांनीं हळूच फिरवलीं. तिच्या गालाला नाजूक स्पर्श केला, आणि अगदीं अन्तःस्फूर्तीनेंच त्यांच्या हृदयांत न मावणारी कृतज्ञ तृप्ति आणि सात्त्विक समाधान शब्दरूपानें बाहेर पडलें :

"मेरी, तुझ्या सहवासांत किती सुखी आहें मी !"

* * *

पॅरिसला परतण्याचा दिवस जवळ आला होता. त्या दिवशींची दुपार पुनः वनराजींत सहल करण्यांत त्या उभयतांनीं घालविली. विवाहानंतर पहिले कांहीं दिवस याच सुंदर राईत स्वच्छंद विहारांत त्यांनीं घालविले होते. अनेक पानें–फुलें गोळा केलीं होतीं. त्या वनराईत एक सुंदर तळें होतें. तेथें उमलणारीं पांढरीं शुभ्र लिली-पुष्पें मेरीला फार प्रिय होतीं, पण आज तीं दोघें

आलीं, तेव्हां त्या तळ्याचा जीवनौघ आटून गेला होता. लिली-पुष्पाचें तर नांवहि उरलें नव्हतें. एक पिवळ्या धमक फुलाचा तुरा मात्र त्या सुकलेल्या तळ्याच्या पाळीं डौलानें उभा होता. त्यांनीं आसपासचीं व्हायलेट व पेरीविंकल हीं फुलेंच गोळा केलीं. पिएरना आवडणाऱ्या रेनन्कुलस नांवाच्या फुलांचा गुच्छ मेरीनें त्यांना बनवून दिला. त्याच सायंकाळीं लगबगीनें जेवण आटोपून पिएर पॅरिसमधल्या आपल्या निवासस्थानीं एकटेच त्या पुष्पगुच्छाचा मधुर गंध घेत परत गेले.

मेरी व मुलें दुसऱ्या दिवशीं बुलेवार्द केलर्मन या आपल्या निवासस्थानीं येऊन दाखल झालीं. पिएरची मूर्ति प्रयोगशाळेंत उभी असल्याचें मेरीनें खिडकींतून पाहिलें. आपल्या उपकरणांची ते जुळवाजुळव करीत होते. मेरीच्या आगमनाची ते सोत्कंठ वाट पाहात होते.

आज गुरुवार, एप्रिलची एकोणीस तारीख. पिएर यांचा मोठा गडबडीचा दिवस होता तो. आज हॉटेल द सोसायटेस सावाँमध्यें शास्त्रविभागांतील प्राध्यापक मंडळींचें खाजगी स्नेहसंमेलन होतें. वर्षांतून एक दिवस ही प्राध्यापक मंडळी एकत्र येऊन तो दिवस मौजेनें घालवीत. नेहमीं एकलकोंडेपणें वागणाऱ्या पिएरना तो एक अमोल संधि वाटत असे. मेजवानीच्या प्रसंगीं अनौपचारिकपणें गप्पा-चर्चा होत. सहकाऱ्यांचे विचार कळत. आपल्या कल्पना पुढें मांडतां येत. शास्त्रविभागाच्या प्रगतीसंबंधीं अनेक कल्पना पुढें येत. खेळीमेळीच्या वातावरणांत होणाऱ्या विचारविनिमयाची परस्पर संबंध चांगले राखण्यास मदत होई. त्याच संबंधाचे विचार सकाळीं उठल्यापासून पिएर यांच्या मनांत घोळत होते. आपले नित्याचे कार्यक्रम आटोपून त्यांनीं पोषाख केला. मनांत दिवसाच्या कार्यक्रमाची रूपरेषा तयार होत होती,— भोजन संपलें कीं गॉथिअर व्हिलर या प्रकाशकाकडे जाऊन नव्या पुस्तकाचीं मुद्रितें तपासावयाचीं व मग सायंकाळच्या सुमारास कॉलेजच्या प्रयोगशाळेंत जावयाचें. त्या वेळीं मेरी तेथें भेटेलच. या विचारांत घाईघाईनें त्यांनीं एका विद्यार्थ्यानें आणून

दिलेलें निबंधाचें एक हस्तलिखित खिशांत कोंबलें, व ते बाहेर पडण्यास सज्ज झाले. मेरी माडीवर मुलांचे कपडे बदलण्यांत गुंतली होती. पिएरनीं खालूनच हांक मारली, "मे ऽ री ऽ ! जातोंय् मी. तूं प्रयोगशाळेंत येणार ना ?" पायऱ्या उतरतां उतरतां धांदलीनें मारलेली हांक मेरीला कितपत ऐकूं गेली तिलाच ठाऊक! पिएर बाहेर पडले तों आभाळ ढगांनीं व्याप्त झालें होतें. दिशा अंधारून आल्या होत्या आणि हवा कुंद झाली होती.

* * *

प्राध्यापक मंडळींच्या सहवासांत गप्पागोष्टी व भोजन होतां होतां दुपार झाली. पिएर त्यांत रंगून गेले होते. गप्पांच्या ओघांत प्रयोगशाळेंत भारी अपघात होतात ते कसे टाळावेत यासंबंधीं बोलणें निघालें. एका प्राध्यापकानें एक योजनाहि सुचवली, आणि पिएर यांनीं तिचें उत्साहानें स्वागत केलें. अडीचच्या सुमारास भोजन संपलें. आपला प्रेमळ सहकारी जीन पेरीन याशीं हस्तांदोलन करून पिएर छापखान्यांत जावयास निघाले. पाऊस झिमझिमत होता. पिएरनीं एकवार आभाळाकडे दृष्टिक्षेप केला. एक अप्रसन्नतेची लहर त्यांच्या डोळ्यांत चमकून गेली. त्यांनीं आपला पावसाळी कोट सांवरला, छत्री उघडली व ते वाट चालूं लागले.

छापखान्याशीं येतात तों दाराला कुलूप. संपामुळें छापखाना बंद होता. क्षणमात्र तेथें ते घोटाळले. एका प्रयोगाचें काखेंत असलेलें हस्तलिखित सावरलें व द रू डॉल्फिन नांवाच्या रस्त्यानें ते प्रयोगशाळेकडे जावयास म्हणून निघाले. भोंवतालच्या रहदारीकडे त्यांचें लक्ष नव्हतें. आपल्या विचारांतच गर्क होऊन ते चालले होते.

* * *

'अरे थांबव, थांबव-', 'खेचा मागें—'. चोहोंकडून एकच आरोळी उठली. कांहीं वाहनें जागच्या जागीं थांबलीं. एका विशिष्ट वाहनाच्या दिशेनें लोक धांवले. मिलिटरी शिपायांच्या कपड्यानें खचून भरलेला भला

मोठा खटारा होता तो. घोड्यांचे लगाम खेचून त्यांना आवरण्याची गाडीवान शिकस्त करीत होता. तरी पण तेवढ्यांत पांच दहा हात तरी घोडे पुढें गेलेच. वीस फूट लांबीच्या त्या अवजड खटाऱ्याच्या लोखंडी चाकांना रस्त्यांत कांहींतरी अडखळल्यासारखें वाटलें. पण क्षणार्धांतच तीं त्यावरून पुढें निघून गेलीं. फ्रान्सच्याच नव्हे तर जगांतील एका थोर शास्त्रज्ञाच्या मस्तकाच्या ठिकऱ्या उडाल्या, आणि पॅरिसचा चिखल त्या रक्तानें लाल झाला !

क्यूरी कुटुंबावर आकाश कोसळलें होतें. पण त्याची कुटुंबियांना अद्याप वार्ता नव्हती. क्यूरींच्या निवासस्थानाच्या आसपास लोक रेंगाळूं लागले. फ्रान्सच्या प्रजासत्ताक सभेचे अध्यक्ष आपलें दुःख व सहानुभूति व्यक्त करण्यासाठीं आले, पण मा. क्यूरी अद्याप प्रयोगशाळेंतून परत आल्या नाहींत असें समजतांच त्याच पावलीं परत फिरले. त्यांच्या मागोमाग शास्त्रविभागाचे प्रमुख व पिएरचे सहकारी पॉल ॲपेल व जीन पेरिन यांनीं बंगल्यांत प्रवेश केला. पिएरचे वृद्ध वडील डॉ. क्यूरी घरांत येरझारा घालीत होते. इतकी बडी मंडळी अकस्मात् आलेली पाहून त्यांना प्रथम विस्मयाचा व भीतीचा धक्काच बसला. पण पेरिन यांच्या चर्येवरून सर्व प्रकार त्या वृद्धाच्या मनांत अंतःसंवेदनेनें चमकून गेला. ते शांतपणें उद्गारले : “ माझा मुलगा गेला तर ! ” अपघाताची सविस्तर हकीकत ऐकून वृद्धाच्या डोळ्यांतून अश्रुपूर लोटला. उत्कट दुःखावेगानें हृदय करपून निघत होतें. आंतड्याला पीळ पडत होता. शोक तर अनावरच झाला होता. पण आपल्या मुलाच्या विचार-तंद्रांची एक प्रकारची चीडहि त्यांत व्यक्त होत होती. “ हा कसला बेभानपणा ? कशाचा बाबा विचार करीत होतास या वेळीं ? ” म्हणून स्वतःशींच पुटपुटत ते एका जागीं बसून राहिले.

सहाच्या ठोक्याला मा. क्यूरी घरीं आल्या. जीन पेरिनला त्या दुःखद कहाणीची उजळणी करण्याचें दिव्य करावें लागलें.

"पिएर वारले !" एवढेंच काय ते शब्द तिच्या कानांत शिरले असावेत. कारण किती तरी वेळ ती अगदीं एखाद्या पुतळीसारखी निश्चल बसली होती. ती हालली नाहीं; बोलली नाहीं. तिच्या मुखांतून किंकाळी फुटली नाहीं कीं डोळ्यांत आंसवें उभीं राहिलीं नाहींत. तिच्या साऱ्या वृत्ति बधिर झाल्या होत्या; भावना गोठून गेल्या होत्या. दृष्टि शून्यांत तिचें हरपलें श्रेय धुंडीत होती. किती तरी वेळानें भानावर आल्यासारखें करून तिनें आपली मान हालवली, आणि अस्फुट स्वरांत विचारलें, "खरंच का ते मला सोडून गेले ?" सारी घटना तिला स्वप्नवत् वाटत होती, असें तिच्या स्वरावरून भासलें. पण तें कठोर सत्य स्वप्न ठर-विण्याची ताकद विधात्याच्या तरी अंगीं होती काय ?

मेरीची अवस्था किती शोचनीय झाली असेल, चित्त कसें विकल झालें असेल याची कल्पनाच केलेली बरी. पतिनिधनाची घटना साऱ्याच स्त्रियांना आकाशींची कुऱ्हाड वाटते, पण मेरीच्या हृदयावर हा दारुण वज्राघात होता. सामान्य पति-पत्नींच्या नात्यापेक्षां किती तरी वेगवेगळ्या स्नेहबंधनांनीं त्या दोघांचे जीवित-धागे एकत्र गुंफले गेले होते. केवळ व्यवहाराच्या पातळीवर आणि लौकिक अर्थानेंच नव्हे तर आध्यात्मिक दृष्टीनें पिएर तिचे साथी, सहचर होते. व्यावहारिक जीवनाच्या मार्गा-बरोबर ध्येयाचा अलौकिक पथ तिनें त्यांच्या हातांत हात घालून गेलीं अकरा वर्षें आक्रमला. अज्ञाताच्या विशाल प्रांतांत ते तिचे पथप्रदर्शक होते, गुरु होते. पिएरच्या असामान्य बुद्धिमत्तेवर तिची असीम श्रद्धा होती. नितान्त आदरानेंच तिचें आकलन करण्याचा ती यत्न करीत होती. विवाहानंतरहि त्यांच्या प्रतिभेचे फुललेले कळे बघून तिची भक्ति दुणावली होती. आपल्या सान्निध्याला तें श्रेय देऊन स्वतःला कृतार्थ मानण्याइतकी आत्मत्वाची जाणीव तिच्या ठिकाणीं उतरलीच नव्हती. पिएरची निरागसता, बालसदृश निष्कपट वृत्ति, जगांतील क्षुद्र स्वार्थ, प्रौढी, मत्सर यांपासून अलिप्त राहण्याची प्रवृत्ति, त्यांचा भोळा

भाव, आणि आपल्या ठिकाणचें गाढ प्रेम,– यांमुळें मेरी सर्वस्वीं त्यांची अंकित बनली होती. विवाहाच्या वेदीवर हातावरोबर हृदय त्यांना तिनें अर्पण केलें होतें. आपल्या पतीला केलेल्या आत्मसमर्पणांत तिच्या व्यक्तित्वाचा विकास होत असला तरी त्याची तिला जाणीव नव्हती. पिएरचे विचार, त्यांच्या आकांक्षा, त्यांच्या ऊर्मि, त्यांचीं सुख-दुःखें यांशीं ती तद्रूप झाली होती. सर्व अवस्थांतील सुख-दुःखाचें तें अद्वैत होतें. त्यामुळें पिएरचा वियोग म्हणजे जीवनाचा सहप्रवासी अर्ध्या मार्गांतून सोडून गेला, अर्ध्या डावांत पट उधळला गेला, या जाणिवेपेक्षां मेरीच्या अंतर्हृदयाची व्यथा तीव्रतर होती. दीर्घकालीन आत्मविलोपाच्या चिर-समाधींतून करुणाविमुख मृत्यु तिला जागें करूं पाहात होता. मेरी जागी झाली. तिनें त्या कठोर सत्याचा अंगीकार केला. पण एकाकी-पणाची भयाणता आणि व्याकुळता असह्य होती, शब्दातीत होती.

मेरी एखाद्या कळसूत्री बाहुल्याप्रमाणें उठली. आपल्या मुलींना तिनें शेजारी पाठवून दिलें, आणि स्वतः पिएरच्या शवाची मार्गप्रतीक्षा करीत बागेंत स्तब्धपणें बसून राहिली.

* * *

प्रा. पिएर यांच्या शवाचा अगदीं साधेपणानें विशेष गाजावाजा न करतां स्केओ येथें अंत्यसंस्कार करण्यांत आला.

दिवसामागून दिवस गेले, तरी मेरीच्या तटस्थ, थिजल्या वृत्तींत कांहींच फरक पडला नाहीं. पिएर यांचे बंधु जेकस क्यूरी आल्यानंतर ती एकदां मुसमुसून रडली, तेवढेंच. त्यानंतर तिनें आपले अश्रु कधीं कुणास दिसूं दिले नाहींत. ती तोंड उघडीना; कोणाशीं बोलेना. यंत्राप्रमाणें ती घरांत वावरे व आपलें काम उरकी. भोंवतालच्या माणसांत व तिच्यांत एक अभेद्य तटबंदी निर्माण झाली होती. आप्तजनांशीं दुःख विभागून शोक-भार हलका तर होतोच, पण भोंवतालच्या माणसांनाहि आपल्या

जिव्हाळ्याचा व सहानुभूतीचा उपयोग झाल्यामुळें धीर येतो. विशेषतः शोकाचा बांध फुटल्यानें नवीन विचार, नवीन प्रवाह अंतःकरणांत येण्याला मोकळा मार्ग होऊन दुःखाचा विसर पडतो. पण मेरीनें आपल्याभोंवतीं जो कोट निर्माण केला व स्वतःच्या दुःखांत ती चूर राहिली, त्यामुळें भोंवतालच्या लोकांना ती दूरावल्यासारखें वाटून तिजविषयीं चिंता वाटूं लागली.

प्रा. पिएर यांच्या आकास्मिक निधनानें गृहव्यवस्थेबरोबरच रसायनशास्त्राच्या संशोधनव्यवस्थेसंबंधीं बिकट प्रश्न निर्माण झाले होते. मेरी आपला चरितार्थ कसा चालविणार? सोर्बोनमधील संशोधनाचें पुढें काय होणार? रेडियमचें संशोधनकार्य तडीस कोण नेणार? मेरीच्या चरितार्थासाठीं सरकारांतून पेन्शन मिळण्याची सूचना कांहीं अधिकाऱ्यांनीं पुढें मांडली. जेकस यांनीं भीत भीत आपल्या भावजयीपुढें ती ठेवली. मेरीनें ती गोष्ट साफ नाकारली. ती म्हणाली,

"मी अजून तरुण आहें, मला पेन्शनची गरज नाहीं."

• • •

# सत्त्व-परीक्षा

: : १५

५ नोव्हेंबर १९०६. दुपारीं एक वाजण्याची वेळ. सोर्बोने विश्व-विद्यालयाच्या पदार्थविज्ञान शाखेच्या इमारतीजवळ लोकांची दाटी झाली होती. व्याख्यानाचा हॉल तर विद्यार्थ्यांनीं केव्हांच भरून गेला होता. सव्वाशें विद्यार्थ्यांची सोय असणाऱ्या त्या दिवाणखान्यांत श्रोत्यांची संख्या दुप्पटीनें तर सहज होती. पदार्थविज्ञानाची आवडच नव्हे तर साधारण माहिती असणारे विद्यार्थी व प्रौढ लोक जसे त्यांत अनेक होते, तसेच त्या शास्त्राशीं संपर्क नसणारे पण केवळ कुतूहलानें आलेले शिक्षक व नागरिकहि त्यांत वरेच होते. आपण व्याख्यानाचीं टिपणें घेऊं शकूं, ही आशा विद्यार्थ्यांनीं केव्हांच सोडून दिली होती. वह्या पेन्सिली जागच्या जागीं ठेवून त्या रेटारेटींत आपली जागा सांभाळण्याचा जो तो यत्न करीत होता. जागा न मिळाल्यानें कित्येक उभेच होते. कोणी खिडक्यांचा आधार घेतला होता. कित्येक व्हरांड्यांतच खिडक्यांशीं उभे होते, तर कित्येक बाहेर रेंगाळत होते. आजच्यासारख्या प्रसंगीं तरी नेहमींचे रिवाज बाजूस सारून विद्यालयाचें सभागृह व्याख्यानास अधिकाऱ्यांनीं खुलें करून दिल्याबद्दल कित्येक रुष्ट झाले होते. आपापसांत त्यांची कुजबूज सुरू होती.

घड्याळाचा कांटा जसजसा पुढें सरकूं लागला तसतशी लोकांची उत्कंठा वाढूं लागली. मा. क्यूरींच्या पोषाखाबद्दल, भाषणपद्धतीबद्दल आपापसांत तर्कवितर्क सुरू होते.

बरोबर दीडच्या ठोक्याला व्यासपीठाचा मागील दरवाजा उघडून मा. क्यूरी संथ पावलें टाकीत प्रयोगसाहित्यांनीं सुसज्ज अशा व्याख्यात्यांच्या टेबलापाशीं येऊन उभ्या राहिल्या. नेहमींचाच काळा पोषाख आणि चेहऱ्यावरचें तेंच गांभीर्य, पण चेहरा मात्र अधिक फिकट दिसत होता. श्रोतृवर्गानें टाळ्यांचा कडकडाट करून त्यांचें स्वागत केलें. त्यांनींहि मान किंचित् वाकवून त्याचा स्वीकार केला. एक विविध भावनांचा कल्लोळ त्यांच्या हृदयांत उठत होता. आपला चेहरा शक्य तेवढा निर्विकार ठेवण्याची धडपड सुरू होती. त्यांची ती करुण व धीरगंभीर मूर्ति बघून श्रोतृवर्गावर विलक्षण परिणाम झाला. टाळ्यांचा गजर एकदम थांबला. मा. क्यूरींनीं शान्तपणें भाषणास आरंभ केला :

> "गेल्या दहा वर्षांतील पदार्थविज्ञानाची प्रगति आपण पाहिली तर विद्युच्छक्ति आणि जड पदार्थ यांविषयींच्या आपल्या कल्पना कशा भराभर बदलत आहेत हें पाहून आपणांस आश्चर्य वाटेल."

पण श्रोतृवर्गांतील विद्यार्थिवर्गाला सखेद आश्चर्य वाटत होतें तें या वाक्याचें. नेमक्या याच शब्दांनीं प्रा. क्यूरींनीं आपलें शेवटचें व्याख्यान संपविलें होतें. मा. क्यूरींनीं तोच धागा, तेंच सूत्र घेऊन विषय पुढें सुरू केला. जणूं या सहा महिन्यांत कांहींच घडलें नाहीं. कालचाच विषय आज चालू. अगदीं निर्विकार तटस्थ वृत्तीनें त्यांचें व्याख्यान सुरू होतें. कोठें अडखळणें नाहीं कीं गोंधळणें नाहीं. कितीहि गहन आणि गुंतागुंतीचा भाग असो, तो शक्य तेवढ्या सुलभतेनें त्या प्रतिपादीत होत्या. तीच गति, तोच ओघ सुरू होता. पति-पत्नींच्या विचाराच्या सादृश्यामुळें म्हणा, विचारपद्धतींतील एकतेनें म्हणा, विषयावरील असामान्य प्रभुत्वानें कीं वैयक्तिक दुःखाचा आणि मानाचा उल्लेखहि न करणाऱ्या शास्त्रज्ञांच्या

निर्मम, निरहंकार तटस्थ वृत्तीनें म्हणा, श्रोतृजन दिपले आणि विरघळले. अनेकांचीं अंतःकरणें हेलावलीं. कित्येकांच्या डोळ्यांत अश्रुबिंदु उभे राहिले.

*　　*　　*

प्रा. पिएर क्यूरी यांच्या मृत्यूनंतरचा सहा वर्षांचा काळ. मा. क्यूरींच्या कसोटीचा व सत्त्वपरीक्षेचा तो काळ होता. जीवनांतील 'सहकार' वृक्ष ऐन बहराला येण्याच्या संधीलाच विद्युत्पातानें उन्मळून पडला. त्याच्या आश्रयानें उभ्या असलेल्या नवमल्लिकेला आतां निर्जीव साधनाचा आधार घेऊन तोल सांभाळावयाचा होता; आपला यशोगंध टिकवावयाचा होता. पण त्याच्याहिपेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपलें 'कुल' व्रत चालवावयाचें होतें. पिएरचे ते शब्द तिच्या कानांत घुमत होते. 'आपल्यापैकीं एकजण जरी मागें राहिला तरी शास्त्रसेवेचें, व्रत अखंड सुरूच राहिलें पाहिजे!' तिच्या प्रिय पतीची ती इच्छा वैयक्तिक सुखदुःख, लाभ वा कीर्ति या सर्वांहून मेरीला अधिक महत्त्वाची वाटत होती.

या दिवसांत त्यांनीं अंगावर घेतलेलीं व पार पाडलेलीं कामें पाहिलीं म्हणजे त्यांच्या चिकाटीची, उद्योगशीलतेची व आवरशक्तीची कल्पना येईल. सोर्बोनच्या विद्यापीठांत प्राध्यापिका म्हणून नेमणूक झाल्याबरोबरच प्रयोगशाळेची मार्गदर्शिका आणि संचालिका यांची जबाबदारी ओघानेंच त्यांच्याकडे आली. तें सर्व करायला स्वतःचें लेखन, वाचन व संशोधन यांत खंड न पडण्याची काळजी घेतली. सेव्हर्समधील शाळेंतील अध्यापनाचें कार्यहि त्यांनीं चालू ठेवलेंच होतें; आणि आपल्या मुलींच्या संगोपनांत व शिक्षणांत कसूर होऊं नये म्हणून त्या दक्षता घेत होत्या. त्यांनीं पिएर क्यूरींचें सर्व शास्त्रीय लेखन तपासून संपादन करण्याचें काम उरकलें. या ग्रंथाला प्रस्तावना म्हणून प्रा. पिएर यांचें चरित्रहि त्यांनीं जोडलें; आणखी दोनच वर्षांनीं म्हणजे १९१० मध्यें जवळ जवळ हजार पृष्ठांचा स्वतःचा रेडियमविषयींचा ग्रंथ प्रकाशित केला.

रेडियमविषयक संशोधनांतहि त्यांनीं बरीच प्रगति केली. शुद्ध

स्वरूपांत रेडियमनिष्पत्तीचा त्यांचा प्रयत्न यशस्वी झाला. त्यामुळें त्याचे परमाणुभार ( Atomic weight ) त्यांना निश्चित करतां आले. रेडियमच्या साह्यानें चालणाऱ्या क्यूरी उपचारपद्धतीस त्या सर्वांचा बहुमोल उपयोग झाला. तसें पाहिलें तर यांतील बऱ्याच जबाबदाऱ्या मा. क्यूरींनीं पिएरच्या हयातींत सांभाळल्या होत्या. पण पिएरच्या आधारामुळें त्याचें त्या वेळीं त्यांना ओझें वाटत नव्हतें. तें ओझें वाटावयाला स्वतःच्या अस्तित्वाची त्यांना त्या वेळीं जाणीवच कुठें होती? एका थोर शास्त्रज्ञाच्या जीवनौघांत त्यांच्या पतिप्रेमाचा आणि शास्त्रभक्तीचा ओघ मिसळून गेला होता. त्याशीं त्या तद्रूप झाल्या होत्या. पण आतां पावलों-पावलीं स्वतःच्या एकाकीपणाची आणि स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव बोचक झाली होती.

* * *

दिवसेंदिवस शास्त्रज्ञांच्या जगांत मा. क्यूरींच्या प्रयोगांचा आणि संशोधनाचा बोलबाला वाढत होता. देशदेशांतरींचे शास्त्रज्ञ त्यांचें सादर कौतुक करीत होते; आणि शास्त्रीय संस्था त्यांच्यावर पदव्यांचा वर्षाव करीत होत्या. त्यांना व्याख्यानासाठीं निमंत्रणें येत होतीं. पण खुद्द फ्रान्समध्यें काय स्थिति होती?

फ्रान्समधील विज्ञानशास्त्रांची जी उच्चतम संस्था 'ॲकॅडेमी' तिचें सन्मान्य सभासदत्व मा. क्यूरींना देऊन त्यांचा गौरव करावा अशी त्यांच्या चाहत्यांची इच्छा होती. हें सभासदत्व प्रा. पिएर यांना मिळण्यास किती यातायात पडली होती याचा उल्लेख पूर्वीं आलाच आहे. हें सभासदत्व स्वीकारण्याची मा. क्यूरींनीं तयारी दाखविली याचें कारण एवढेंच कीं, दोन वर्षांपूर्वीं फ्रान्समधील एक मानचिन्ह 'क्रॉस ऑफ लिजन' त्यांनीं विनयपूर्वक नाकारलें होतें. आणि आतांहि आपण नकार दिल्यास उद्धटपणा आणि गर्विष्ठपणा यांचा दोष आपल्या पदरीं येईल अशी त्यांस भीति वाटत होती.

पण मा. क्यूरींना हें सभासदत्व अर्पण करावें कीं न करावें या प्रश्नावर रण माजलें, आणि हा मतभेद वर्तमानपत्राच्या रकान्यांत चर्चिला जाऊं लागला. फ्रान्समधील सनातनी बुद्धक वृत्तीच्या शास्त्रज्ञांना ही गोष्ट मुळींच मान्य नव्हती. एका स्त्रीला संशोधकांच्या आणि विज्ञानवेत्त्यांच्या मालिकेंत स्थान देण्यांत त्यांना कमीपणा वाटत होता, व त्यासाठीं निरनिराळ्या सबबी त्यांनीं दाखविण्यास आरंभ केला. कोणीं ती परदेशस्थ आहे म्हणून कारण सांगितलें. कोणी म्हणे ती रशियन आहे, तर कोणी म्हणे ती जर्मन आहे. एकानें तर ती ज्यू असल्याचा शोध लावला. कोणीं धार्मिक मतांचा आश्रय करून ती नास्तिक असल्याची ग्वाही दिली. कोणीं ती दुसऱ्याच कोणत्या पंथाची असल्याचा निर्वाळा दिला. मा. क्यूरींच्या बाजूनें लोकहि कांहीं कमी नव्हते. त्यांनीं क्यूरींची बाजू पुढें मांडली. विरोधी पक्षाच्या कर्मठवृत्तीवर, गतानुगतिक आणि संकुचित विचारसरणीवर टीका केली. हेन्री पोएंकेर, एमिल पिकर्ड, प्रा. लिपमन यांसारखे बडे बडे शास्त्रज्ञ तिचा कैवार घेऊन झगडत होते. ‘गुणिषु नच लिंगं नच वयः’ अशी त्यांची दृष्टि होती.

निवडणुकीचा दिवस जसजसा जवळ येऊं लागला तसतशी आपल्या पक्षास यश मिळण्याची त्यांना आशा वाटूं लागली. मा. क्यूरींना हा मान मिळण्यास इतका विरोध कां व्हावा, याचेंच मुळीं त्यांच्या शिष्यवर्गाला आश्चर्य वाटत होतें. त्यांचा सन्मान होऊन फ्रेंच शास्त्रज्ञ आपली गुणग्राहकता व्यक्त करतील अशी त्यांना खात्री होती. निवडणुकीचा निकाल जाहीर होतांच त्यांचा सन्मान करतां यावा म्हणून त्यांनीं पुष्पगुच्छदेखील आणून ठेविले होते; परंतु विरोधी पक्षाची मजल फार पुढें गेली होती. असें म्हणतात कीं, खोट्या मतपत्रिकांचाहि अवलंब झाला. मतमोजणीच्या वेळीं अध्यक्षांनीं स्त्रीप्रेक्षकांना आंत येऊं देण्यासहि मनाई केली. मा. क्यूरींना फक्त एकच मत कमी पडलें! फ्रेंच शास्त्रज्ञांच्या

प्रगमनशीलतेची आणि स्त्रीदाक्षिण्याची परीक्षा झाली, आणि स्वजनांनीं केलेल्या गुणी लोकांच्या उपेक्षेच्या दाखल्यांत आणखी एक भर पडली.

परंतु 'कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी' या सुभाषिताचें सत्य फ्रेंच शास्त्रज्ञांच्या लवकरच अनुभवास आलें. मा. क्यूरींच्या संशोधनानें रासायनिक विज्ञानाची जी प्रगति आणि समृद्धि झाली, त्याच्या गौरवार्थ १९११ चें रासायनिक विभागाचें 'नोबेल पारितोषिक' मा. मेरी क्यूरी यांना देण्यांत आल्याचें जाहीर झालें! आजवर कोणाहि स्त्रीच्या वा पुरुषाच्या वांट्यास न आलेला दुसऱ्यांदां हें पारितोषिक मिळविण्याचा मान मा. क्यूरी यांना मिळाला.

मा. क्यूरी स्वीडनमध्यें पारितोषिक स्वीकारण्यासाठीं गेल्या असतां त्यांचें थाटानें स्वागत झालें. खुद्द राजेसाहेबांनींहि त्यांना मेजवानी देऊन त्यांचा गौरव केला. पारितोषिक घेतांना शास्त्रज्ञांच्या सभेंत केलेल्या भाषणांत हा गौरव आपला नसून दिवंगत प्रा. पिएर यांचाच आहे; कारण ही सारी स्फूर्ति त्यांजपासून आपणांस लाभली;—असा आरंभ करून आपली शालीनता आणि पतिभक्ति मा. क्यूरी यांनीं प्रकट केली.

* * *

मा. क्यूरींच्या झालेल्या या गौरवामुळें तर त्यांच्या विरोधकांच्या कपाळांत तिडीकच उठली. क्यूरींच्या पाडावाचा नवा पवित्रा त्यांनीं टाकला. असूयेचें जहर लोकनिंदेच्या वाऱ्यावर आतां पसरूं लागलें. मेरीच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविण्यास निंदकांची जिव्हा स्वैर सुटली. ज्या शास्त्रज्ञांच्या साहाय्यानें मा. क्यूरी आपलें कार्य करीत होत्या त्यांच्या संसाराची त्या धूळधाण करीत आहेत असा आरोप त्यांजवर करून आपल्या हीन मनोवृत्तीचें त्यांनीं प्रदर्शन केलें. निनांवी पत्रांचा त्यांजवर भडिमार होऊं लागला. कोणी त्यांना मारण्याच्या धमक्याहि घातल्या. 'यथा स्त्रीणां तथा वाचां साधुत्वे दुर्जनो जनः'—या कवि-वचनाचा सर्वांना एकदां प्रत्यय आला. आणि मा. क्यूरींचा गुन्हा काय – तर आपला देश सोडून

व चूल–मुलाचें क्षेत्र टाकून विद्यादेवीची एकनिष्ठेनें त्या सेवा करीत होत्या – हाच !

हा हल्ला अनपेक्षित होता. मा. क्यूरी त्यानें गांगरून गेल्या. मनुष्य इतर आपत्ति सहन करील; त्या नाहींशा करण्याचे मार्ग तो शोधून काढील; पण सामाजिक निंदा, कुत्सित व घाणेरडे आरोप यांना निमूटपणें तोंड देण्याखेरीज त्यांस गत्यंतर नसतें. मा. क्यूरींनीं तेंच केलें. पण कसें झालें तरी तें स्त्रीहृदय होतें. पतिनिधनाच्या दुःखानें तें भंगलें तर होतेंच, पण त्या दुःखाला कधीं वाचा न फुटल्यानें तें पोखरून गेलें होतें. या सगळ्यांचा परिणाम त्यांच्या शरीरावर दिसूं लागला. अखेर एक दिवस प्रयोगशाळेंत त्या मूर्च्छा येऊन पडल्या, आणि त्या अवस्थेंतच त्यांना रुग्णालयांत न्यावें लागलें. हें आजारपण म्हणजे एकपरी सक्तीची विश्रान्तीच झाली. हा काळ त्यांनीं निरनिराळ्या गांवीं हवापालट करण्यांत जवळ जवळ अज्ञातवासांतच काढला.

* * *

यानंतर आणखी एक अनपेक्षित घटना घडून आली आणि मा. क्यूरींच्या ध्येयनिष्ठेची पुनः कसोटी लागली. त्यांना त्यांच्या मायभूमीचें निमंत्रण आलें, आणि तेंहि रेडियमच्याच संशोधनकार्यासाठीं. पोलंडमधील नवयुवकांनीं पोलंडच्या शास्त्रीय व औद्योगिक प्रगतीसाठीं कंबरा बांधल्या होत्या. रेडियम इन्स्टिटयूटची स्थापना हा त्यांतलाच भाग होता. आणि या कार्यास मा. क्यूरींइतकी पात्र व्यक्ति तरी कोणती होती ?

मेरी क्यूरींकडे पोल लोकांचें शिष्टमंडळ येऊन थडकलें. अत्यंत विनम्र भावानें आणि तितक्याच जिव्हाळ्यानें त्यांनीं आपली विनंति मा. क्यूरींना सादर केली. या निमंत्रणाचा स्वीकार करावयाचा कीं अव्हेर करावयाचा हा प्रश्न विशेषतः क्यूरींच्या त्या वेळच्या मानसिक स्थितींत सोडवणें सोपें काम नव्हतें. त्यांचें आवडतें संशोधनकार्य त्यांना बोलावीत होतें. तें कार्य आपल्या जन्मभूमींत करावयाला मिळणार हें त्यांतल्या त्यांत मोठेंच प्रलोभन.

पॅरिस त्यांच्या प्रिय पतीची मातृभूमि असली तरी त्यानें त्यांचें कोडकौतुक कधींच केलें नव्हतें. उलट निंदा आणि कुटाळक्या यांच्या स्वरूपांत झालेल्या छळणुकीची जखम तर अद्याप ताजीच होती. त्यांचें मन हेलकावूं लागलें, पण क्षण — दोन क्षणच.

अखेर मातृभूमीच्या प्रेमावर कर्तव्यबुद्धीनें विजय मिळविला. फ्रान्समध्यें पिएर यांच्या इच्छेप्रमाणें एक प्रयोगशाळा बांधून रेडियमच्या संशोधन-कार्याला मूर्त स्वरूप आणून देणें हें एक त्यांचें जिवंत स्मारक होणार होतें. आज चार वर्षें त्यासाठीं क्यूरी कुटुंबियांची व क्यूरी परिवाराची धडपड चालू होती. तें कार्य टाकून पोलंडमध्यें जाणें ही गोष्ट मेरींना रुचणें शक्यच नव्हतें. मोठ्या खेदानें त्यांनीं निमंत्रणाला नकार दिला; पण त्याबरोबरच वॉर्सामधील संशोधनकार्याचें मार्गदर्शन करण्याचें त्यांना आश्वासन दिलें. आपल्या हाताखालच्या दोन पोलिश तज्ज्ञांना त्यांनीं त्या कामासाठीं वॉर्साला पाठविलेंहि.

*   *   *

वॉर्सातील रेडियम इन्स्टिटयूटचा उद्‍घाटन-समारंभ मा. क्यूरींच्या हस्तें मोठ्या थाटानें साजरा झाला. पोल लोकांच्या आनंदाला आणि अभि-मानाला केवढें भरतें आलें होतें ! मा. क्यूरींचा त्यांनीं या निमित्तानें मोठा गौरव केला. ठिकठिकाणीं सभा आणि मेजवान्या होऊन मा. क्यूरींविषयींची आपली भक्ति व आत्मीयता त्यांनीं व्यक्त केली. ज्या इमारतींत पंचवीस वर्षांपूर्वीं मेरी स्क्लोडोवस्कानें लपून छपून शास्त्रीय प्रयोगाचा श्रीगणेशा केला, त्याच 'पदार्थसंग्रहालया'ची पाटी धारण करणाऱ्या संस्थेंत त्यांचा मोठा सन्मान करण्यांत आला. त्या समारंभास वृद्ध सिकोर्स्का बाई — तिसऱ्या प्रकरणांत उल्लेखिलेल्या मेरीच्या शिक्षिका — उपस्थित होत्या. त्यांना पाहतांच मेरी आपल्या आसनावरून त्यांच्याकडे आल्या, आणि मोठ्या आदरानें त्यांस त्यांनीं अभिवंदन केलें. अभिमान आणि उल्हास यांनीं त्यांचें मन दाटून आलें होतें.

• • •

## महायुद्धाच्या ज्वाला : : १६

१९१४ चा ऑगस्ट महिना आज उजाडला आहे.

पॅरिस शहरांत कोण धामधूम आणि धांवपळ ! लष्करी पोषाखांतल्या माणसांनीं रस्ते गजबजून गेले आहेत; हॉटेलें, रेस्टॉरंट, कॅफे कोठेंहि जा, लष्करी शिपायांचीच गर्दी दिसत आहे. त्यांच्याबरोबर तरुण स्त्रिया तुम्हांस आढळतील, पण त्यांचें नेहमींचें आनंदी हास्य त्यांच्या चेहऱ्यावर तुम्हांस आढळणार नाहीं. जिकडे पाहावें तिकडे अस्वस्थता, भीति यांचींच चिन्हें दिसतात. सायंकाळ होतांच आनंदी स्त्री-पुरुषांनीं फुलणारे पॅरिसचे रस्ते उजाड दिसतात. दिव्यांचा झगझगाट नाहीं; नृत्य-गायनाचे सुस्वर निनाद नाहींत; हास्य-कल्लोळ नाहींत. रस्त्यांत दोन माणसें परस्परांस भेटलीं तर कांहीं तरी कुजबुजतात आणि पुढें निघून जातात. दुकानांत, हॉटेलांत सर्वत्र जो तो नवीन बातमी ऐकण्यास उत्सुक दिसतो. चोरट्या आवाजांत त्यांची कुजबूज चालते, आणि प्रत्येकजण काढता पाय घेतो. पॅरिसमधून पश्चिमेला जाणारे रस्ते तर माणसांनीं कोंदाटले आहेत. मोटारींची नुसती रीघ लागली आहे. म्हातारीं माणसें, तरुण स्त्रिया, मुलें यांची त्यांतून दाटी झाली आहे. सर्वांचे चेहरे भीतीनें म्लान झाले आहेत. वियोगानें शोकाकुल झाले आहेत.

पॅरिसच्या स्टेशनवर तर पाऊल ठेवण्यास तिळभरहि जागा नाहीं. सर्वत्र

लष्करी शिपायांची दाटी, आणि त्यांच्या सामान-सुमानांचे ढीग यांचे खच. तरी पण या गर्दींत पन्नाशी उलटलेली, काळ्या अल्पाकाचा धूसर पोषाख केलेली ही वृद्धा कोण? तिजजवळ सामानसुमान तर कांहींच नाहीं. एक लहानशी पिशवी आणि एक लहानशी संदूक. संदूक जड असावी असें दिसतें. ती पाहा, बोर्डोला जाणाऱ्या गाडींत ती चढली. गाडींत तर बहुतेक लष्करी अधिकारीच दिसत आहेत. त्यांच्या चेहऱ्यावर निराशेची छाया दिसते. त्यांचें बोलणेंहि शहरांत पसरणाऱ्या अफवांसंबंधींच चाललें आहे. पण या स्त्रीचें लक्ष त्या संवादाकडे नाहीं. खिडकीबाहेरची वनश्री पाहण्याचा ती यत्न करीत आहे. पण तेथेंहि तेंच दृश्य. दुतर्फा वाहनांचा लोंढा पॅरिसमधल्या स्त्रिया–मुलांना घेऊन बाहेर पडला आहे. कोणी कोणी तर आपलीं बोचकीं खांद्यावर घेऊन पायींच निघालीं आहेत—!

होय. हीच ती कालची वृद्ध महिला. काल सायंकाळीं बोर्डोच्या स्टेशनवर तासन् तास ताटकळत उभी होती. हमाल मिळत नव्हता, पोर्टर नव्हता, खानावळींत चहा घ्यायला जागा नव्हती, मग मुक्कामाचें नांव कशाला? शेवटीं कोणा तरी अधिकाऱ्याबरोबर तिनें स्टेशनच्या गर्दींतून वाट काढली, पण तिच्याजवळ तिची ती कालची संदूक नाहीं. तिच्या मनावरचें ओझेंहि त्याबरोबर उतरलेलें दिसतें. आज दुपारीं बोर्डोच्या सरकारी बँकेंतील सेफ्टी व्हॉल्ट असणाऱ्या विभागांत तिला कांहींनीं पाहिलें होतें खरें.

आणि ही तर आतां पॅरिसला जाणाऱ्या गाडींत चढली. 'कोण हो ही? सारे लोक पॅरिसहून पळताहेत नि ही पॅरिसला जातेय्!' लष्करी शिपायांच्या डब्यांत दाटीनें ती जागा करून एका बाकावर बसलीसुद्धां. पण कालच्यासारखी आज ती मुखस्तंभ नाहीं. ती जोरजोरानें बोलत आहे: "अरे पोरांनो, ह्या साऱ्या अफवा आहेत. शत्रूची काय ताकद आहे पॅरिसपर्यंत येण्याची. अखेर आपलाच जय होणार!"

*　　*　　*

युरोपभर पहिल्या महायुद्धाचा वणवा हां हां म्हणतां भडकला होता.

जर्मनांच्या आक्रमणाच्या बातम्या विद्युद्वेगानें पॅरिसमध्यें तासातासांनीं येऊन थडकत होत्या. सरहद्दीच्या तोंडाशीं असणारें पॅरिस शत्रूंकडून केव्हां वेढलें जाईल हें सांगवत नव्हतें. लष्करी अधिकाऱ्यांचीच जेथें त्रेधा-तिरपिट उडाली होती तेथें सामान्य नागरिकांची गोष्ट काय? जीवित आणि वित्त यांच्या संरक्षणासाठीं जो तो धडपडत होता.

मा. क्यूरी या वेळीं अगदीं एकट्या होत्या. मुलींना त्यांनीं उन्हाळ्यासाठीं ब्रिटनी येथें आधींच पाठविलें होतें. लवकरच त्याहि विश्रांतीसाठीं तिकडे जाणार होत्या. तोंच हें संकट दत्त म्हणून उभें राहिलें. मनुष्याचे बेत जागच्या जागीं राहतात ते असे. घरांत नोकरचाकरहि विशेष नव्हते. प्रयोगशाळाहि बंद झाली. त्यांचे सहकारी सैन्यांत दाखल झाले होते. पॅरिसचें नागरिक-जीवन केव्हांच संपुष्टांत आलें होतें.

मेरींना अगदीं एकटें वाटूं लागलें. आपल्या मुलींचा व आपला संबंध केव्हां तुटेल हें सांगतां येत नव्हतें. पोलंडमध्येंहि सैन्य शिरल्याच्या बातम्या येत होत्या; आणि आप्तेष्टांची वार्ताहि कित्येक दिवसांत त्यांना कळली नव्हती, कळण्याची शक्यता नव्हती. मेरींची स्वतःची प्रकृतीहि बरी नव्हती. मेरींच्या पुढें दोन मार्ग होते. प्रयोगशाळेला कुलूप ठोकावयाचें आणि ब्रिटनी येथें जाऊन स्वस्थ विश्रांति घ्यावयाची, आणि भवितव्यता काय जी परिस्थिति निर्माण करील तिची वाट पाहात बसावयाचें; अथवा सैन्यांतील शुश्रूषापथकांत दाखल व्हावयाचें. मा. क्यूरींनीं दुसरा मार्ग पत्करला.

मेरींनीं दुसरा मार्ग पसंत केला याला अनेकविध कारणें होतीं. त्यांच्या लाडक्या पिएरचा फ्रान्स हा पितृदेश होता, तसाच तो आतां त्यांचाहि मानलेला पितृदेश होता. त्याच्या सेवेसाठीं आपलें शक्तिसर्वस्व वेंचणें त्यांना आपलें पवित्र कर्तव्य वाटत होतें. दुसराहि एक विचार त्यांच्या मनांत डोकावून गेला. आपण पॅरिस सोडून गेल्यावर जर यदाकदाचित् पॅरिस शत्रूच्या हातीं पडलें, तर रु द पिएर विभागाची—आपल्या प्रयोग-

शाळेची—आडदांड सैनिकांकडून नासधूस झाल्यावांचून क्वचित राहांवयाची नाहीं. पण आपण येथेंच असलों तर निदान इमारत — प्रयोगशाळा यांची जाळपोळ तरी होणार नाहीं; तीं त्यांच्या तडाक्यांतून वांचतील. पण मेरींना युद्धकालांतहि स्वस्थ न बसूं देण्यास त्यांची स्वाभाविक दुर्दमनीय कार्यप्रवृत्ति हीच मुख्यतः कारणीभूत असावी. शिवाय शास्त्रीय ज्ञानाचा व्यावहारिक जगास लाभ घडवून देण्याची, त्याचें प्रात्यक्षिक दाखविण्याची ही अप्रिय कां होईना एक संधि चालून आली होती. कांहींहि असो, ज्ञानाच्या — संशोधनाच्या क्षेत्रांत आघाडीवर राहणारी विदुषी जीवनाच्या खऱ्या समरप्रसंगांतहि आघाडीवर राहूं शकते, हें दृश्य जगाला पाहावयास मिळावयाचें होतें.

पण युद्धांत दाखल होण्यापूर्वी मेरींना एक महत्त्वाचें कार्य उरकावयाचें होतें. त्यांच्या प्रयोगशाळेंतील एक ग्रॅम रेडियम म्हणजे त्यांचा जीव कीं प्राण होता. तो कोठें तरी सुरक्षित ठेवणें जरूर होतें. या प्रकरणाच्या आरंभीं वर्णन केलेल्या प्रसंगांतील एकाकी वृद्ध प्रवासिनी दुसरी तिसरी कोणी नसून मा. क्यूरीच होत. बोर्डो येथील सरकारी संरक्षणाखालील तिजोरींत रेडियमची संदूक ठेवून त्या पॅरिसला परतल्या.

मेरी पॅरिसला येऊन पोहोंचतांच तडक त्या 'राष्ट्रसेवा' (नॅशनल एड) या केंद्रांत जाऊन थडकल्या. 'सुपीरिअर नॉर्मल स्कूल'च्या इमारतींत त्यांचे सहकारी पाल अॅपेल आणि बोरेल यांनीं वैद्यकीय शुश्रूषा-संघटनाचें केंद्र उघडलें होतें. रात्रींच्या जागरणानें डोळे लाल झालेले, दीड दिवसांत पोटांत अन्नाचा कण नसल्यानें आवाज क्षीण झालेला, आणि प्रवासानें थकवा आलेला, अशी त्यांची मूर्ति पाहतांच पॉल ॲपेलचें मन कळवळलें. त्यांनीं मेरींना कांहीं दिवस तरी विश्रांति घ्या म्हणून परोपरीनें विनविलें. पण मेरींचा एकच लकडा— 'मला कांहीं तरी काम सांगा. मला काम द्या.' अखेर थोडी विश्रांति घेण्यासाठीं कोचावर पडावेंच लागलें. तोंडानें त्यांचें पुटपुटणें सुरूच होतें. अंगीकृत कार्याच्या योजनांबद्दल निरनिराळ्या

कल्पना त्या बोलून दाखवीत होत्या. 'मा. क्यूरी त्या वेळीं मला एखाद्या ज्वालेसमान भासमान होत होत्या'—असें ॲपेल यांनीं त्या वेळचें त्यांचें वर्णन केलें आहे.

मा. क्यूरी वैद्यकीय पथकांत दाखल झाल्या त्या केवळ शुश्रूषापथकांत परिचारिकेचें काम पत्करण्यासाठीं नव्हे. आपल्या शास्त्रीय ज्ञानाचा व बौद्धिक शक्तींचा मानवजातीच्या कल्याणासाठीं कसा विनियोग करतां येईल याविषयीं त्यांचें चिंतन चालू होतें. वैद्यकीय उपचाराची साधन-सामुग्री अद्ययावत् शास्त्रीय ज्ञानावर आधारलेली असावी, आणि तिचा पुरवठा भरपूर प्रमाणावर व्हावा अशी त्यांची साहजिकच अपेक्षा होती. पण त्यांचा प्रत्यक्ष अनुभव वेगळा होता. आधुनिक युद्धाच्या विशिष्ट परिस्थितीमुळें उपचारांत शस्त्रक्रियेला प्राधान्य मिळालें आहे, आणि त्यासाठीं पूर्वपरीक्षेसाठीं क्ष-किरण तपासणी यंत्रांची अत्यंत गरज असते, पण ही यंत्रसामुग्री शुश्रूषापथकांत नसल्याचें त्यांना आढळून आलें.

मा. क्यूरींनीं आटोकाट प्रयत्न करून हीं राँटजेन यंत्रें उभीं केलीं. यासाठीं स्वतःच्या प्रयोगशाळेंतील सामुग्री बाहेर काढावयास त्या कचरल्या नाहींत. तीं यंत्रें उभीं केल्यावर विजेच्या पुरवठ्याची उणीव भरून काढण्यासाठीं रुग्णवाहिकांच्या (ॲम्बुलन्स) डायनॅमोवर तीं चालू करण्याची कल्पना काढून ती यशस्वी केली. क्ष-किरणांनीं युक्त अशा जेवढ्या गाड्या तयार करतां येतील तेवढा उपचार त्वरित करतां येईल, म्हणून पॅरिसमधील श्रीमंतांच्या मोटारगाड्या त्यांनीं मिळवल्या; आणि गाड्या तयार झाल्यावर त्यांवर काम करणारे कुशल यंत्रविशारद पाहिजेत म्हणून आपल्या रेडियम इन्स्टिटयूटमध्यें थोरली मुलगी इरीन हिला हाताशीं धरून क्ष-किरण-तज्ज्ञांचा दोन वर्षे वर्ग चालविला. महायुद्धाच्या कालांत अशा गाड्यांची संख्या दोनशेंहून अधिक झाली होती. 'छोटी क्यूरी' या नांवानें त्या शिपायांच्या परिचयाच्या झाल्या होत्या.

मा. क्यूरींनीं एक गाडी स्वतःसाठीं राखून ठेवली होती. क्ष-किरणांच्या

उपकरणांनीं ती सुसज्ज होती. टेलिफोनची घंटा वाजण्याचा अवकाश कीं मा. क्यूरी आपली गाडी घेऊन बाहेर पडल्याच. क्ष-किरण यंत्रांचें ज्ञान तर त्यांना उत्कृष्टच होतें, पण त्याच्या जोडीला डॉक्टर लोकांना साहाय्य करतां यावें म्हणून वैद्यकशास्त्राचें – विशेषतः शरीरशास्त्राचेंहि ज्ञान त्यांनीं मिळविलें. पण याहून आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे मोटार ड्रायव्हरवर अवलंबून राहावें लागूं नये म्हणून त्या या वयांत मोटार चालविण्यास व दुरुस्त करण्यासदेखील शिकल्या.

आपली गाडी घेऊन त्या सर्व आघाड्यांवर हिंडल्या होत्या. कानांवर तोफांचे आवाज येत. आजूबाजूला बॉंब येऊन पडत, पण मा. क्यूरींचें काम व प्रवास त्यांतूनहि निःशंकपणें सुरूच असत. फ्रान्समधील नव्हे तर बेल्जममधीलहि अनेक रुग्णकेंद्रांना त्यांनीं भेटी दिल्या, आणि तेथील अधिकाऱ्यांचा व जनतेचा सद्भाव त्यांनीं संपादन केला.

या कालांतील मेरींच्या जीवनांतील आठवणी युद्धवार्तेइतक्याच रोमांचकारी आहेत. एकदां मेरी आपली गाडी घेऊन एका तांतडीच्या निरोपावरून एका रुग्णकेंद्राकडे निघाल्या होत्या. रस्ता खडबडीत, वळणावांकणाचा. ड्रायव्हरनें अतिशय काळजीपूर्वक गाडी चालविली होती. पण अखेर ती एका खड्डयांत उपडी झालीच. यंत्रसामुग्रीच्या दडपणाखालीं मेरींचा देह गाडला गेला. ड्रायव्हरनें शिताफी करून गाडी ठिकाणावर आणली. विशेष म्हणजे या प्रसंगाबद्दल त्यांनीं घरांत कोणास एका चकार शब्दानें जाणीव दिली नाहीं. वर्तमानपत्रांतच जेव्हां बातमी छापून आली आणि त्यांच्या खोलींत रक्तानें डागळलेले कपडे नोकरास सांपडले, तेव्हां घरांत सर्वांना हें वृत्त कळलें. या प्रसंगांतील विनोद तेवढा मेरींच्या स्मरणांत राहिला. गाडी उलटली तेव्हां ड्रायव्हरचें धाबेंच दणाणलें. घाबऱ्या आवाजांत तो मालकिणीला पुनःपुनः विचारीत होता, "बाई, तुम्ही सुखरूप आहां ना? फार नाहीं ना लागलें?" त्याच्या त्रेधातिरपिटीचीच मा. क्यूरींना राहून राहून गंमत वाटत होती.

युद्धकालांत परिचर्येचा मा. क्यूरींवर विविध तऱ्हेचा परिणाम होत होता, पण त्याचबरोबर त्यांच्या व्यक्तित्वाचे पैलू उजळून बाहेर येत होते. युद्धासारख्या राष्ट्रीय आपत्तीच्या कालांत सामान्य नागरिकाची वृत्ति कशी असावी हें त्यांनीं आचरणानें दाखविलें. त्यांनीं स्वतः शारीरिक कष्ट तर अपरंपार सोसलेच, पण आपल्या मुलींना सर्व प्रकारचीं—साध्या शेतकऱ्यांचींसुद्धां—कष्टाचीं कामें करण्याची त्यांनीं शिकवण दिली. सामान्य व्यक्ति किती त्याग करूं शकेल हेंहि त्यांनीं कृतीनें दाखविलें. आपल्या दुसऱ्या नोबेल पारितोषिकाची सर्व रक्कम—ती युद्धाच्या होमकुंडांत स्वाहा होणार हें कळून सवरून सुद्धां स्वयंस्फूर्तीनें 'राष्ट्रीय निधी'स दिली. इतकेंच नव्हे तर जवळ पडलेलीं अनेक सोन्यारुप्यांचीं गौरवपदकें व मानचिन्हें बँकेच्या अधिकाऱ्याच्या स्वाधीन केलीं. पण पदकांवरील मजकूर वाचून त्या अधिकाऱ्यानें जरा रागानेंच त्यांना तीं परत न्यावयास लावलीं ही गोष्ट वेगळी. शुश्रूषापथकांत काम करतांना टापटीप, व्यवस्थितपणा व शिस्त हे त्यांचे नेहमींचे गुण तर दिसलेच; पण कामचुकार व अजागळ सरकारी अधिकाऱ्यांची कानउघाडणी करून आपला निर्भीडपणाहि त्यांनीं दाखविला. याउलट जखमी शिपायांशीं व कामकऱ्यांशीं त्या प्रेमळपणें वागत, प्रेमळ शब्दांनीं त्यांना धीर देत. इतकें सर्व करीत असतांहि त्यांचा साधेपणा सुटला नाहीं. गर्वाची छटा कधीं दिसली नाहीं. स्वतःला विसरून जाण्याची, नाममात्रहि न उरण्याची वृत्ति कमी झाली नाहीं. आणि म्हणूनच परिचारिकेचें काम करणाऱ्या अनेक श्रीमंत महिलांना मा. क्यूरींची कधीं ओळख होऊं शकली नाहीं. खायला काय मिळतें किंवा झोंपायला काय आहे, याचीसुद्धां त्यांनीं कधीं पर्वा केली नव्हती, आणि आपण किती हालअपेष्टा सोसल्या याचा कुणाजवळ कधीं उच्चार केला नव्हता.

राजदरबारीं त्यांची सेवा अज्ञातच राहिली, पण डॉक्टर लोकांत त्यांच्या कार्याची खूपच प्रशंसा झाली. शास्त्रीय संशोधन प्रयोगशाळेच्या भिंतींत

कोंडलेलें न राहतां जीवनाच्या कर्मभूमींत उतरल्याबद्दल सर्वांस आनंद झाला. क्ष-किरण, रेडियम, रेडियमयुक्त धातु, त्यांतून निघणारे वायु व प्रसरण पावणारे किरण यांचें महत्त्व शास्त्रज्ञांच्या डोळ्यांत भरलें. लवकरच 'युद्धकालांतील रेडियमशास्त्र' नांवाचा ग्रंथहि मा. क्यूरींनीं तयार केला.

युद्ध थांबल्याची वार्ता ऐकून मा. क्यूरींना इतरांप्रमाणेंच अत्यानंद झाला. फ्रेंच निशाणांनीं आपली प्रयोगशाळा त्यांनीं सजविली; इतकेंच नव्हे तर युद्धकाळांतील आपल्या गाडीवर फ्रेंच निशाणें चढवून पॅरिसच्या रस्त्यांतून त्या गाडींतून मनसोक्त हिंडल्या.

पण महायुद्धाच्या समाप्तीमुळें मेरींना आणखी एका दिव्य आनंदाचा लाभ झाला, तो म्हणजे पोलंडचें—त्यांच्या मायभूमीचें—स्वातंत्र्य. महायुद्धाच्या यज्ञकुंडांतून पोलंडचें स्वातंत्र्य बाहेर पडलें. मेरींचें आणखी एक स्वप्न साकार झालें. आपल्या ह्यातींत पोलंड स्वतंत्र झालेला पाहावयास मिळण्याची त्यांना आशा फार कमी होती; ती सफल झाली. पोलंडला त्यासाठीं जबर किंमतहि द्यावी लागली. मोठा त्याग करावा लागला. पण मायभूमीच्या पारतंत्र्याच्या शृंखला तुटल्या या आनंदापुढें त्याची काय फिकीर! जोसेफच्या पत्रांत त्यांनीं आपला अपार आनंद व्यक्त केला आणि शेवटीं लिहिलें कीं:

"तुजप्रमाणेंच माझी भविष्यकालावर श्रद्धा आहे."

• • •

"अमेरिकेंत कांहीं नाहीं तरी पन्नास ग्रॅम रेडियम आहे. त्यांतले चार ग्रॅम बाल्टिमोरला, सहा ग्रॅम डेन्व्हरला, सात ग्रॅम न्यूयॉर्कमध्यें." मेरींच्या बोलण्यावरून अमेरिकेंतल्या सर्व रेडियमचा ठावठिकाणा त्यांना माहीत होता असें त्या वृत्तपत्रप्रतिनिधीच्या ध्यानांत आलें.

"आणि फ्रान्समध्यें?"

"आमच्या प्रयोगशाळेंत जेमतेम एक ग्रॅम असेल."

"काय म्हणतां? तुमच्याजवळ एक ग्रॅमच आहे?" रेडियमच्या मायभूमींत त्याचें अस्तित्व एक ग्रॅमच्या वर जाऊं नये याचें त्या अमेरिकन वार्ताहर बाईस नवल वाटत होतें. प्रत्यहीं नाविन्याच्या शोधांत असणाऱ्या आणि प्रत्येक नव्या संशोधनाचा जास्तींत जास्त फायदा करून घेणाऱ्या तिच्या उत्साही व व्यवहारी दृष्टीला ही घटना विस्मयजनक वाटत होती. पण पुढील उत्तरानें तर ती अधिकच चकित झाली.

"आणि मजजवळ असा कांहींच नाहीं. तो प्रयोगशाळेचा आहे."

"आपण ह्या व इतर शोधांचें पेटंट कां घेत नाहीं? त्यामुळें आपणांला अपरंपार पैसा नाहीं का मिळवतां येणार?"

" रेडियम ही एक विश्वांतील शक्ति आहे, एक मूलद्रव्य आहे. ती कांहीं कोणा एका व्यक्तीच्या मालकीची बाब नव्हे. साऱ्या जगाचाच रेडियमवर हक्क आहे."

" समजा, या क्षणाला जगांतली कोणतीहि वस्तु मागा, असं तुम्हांला कोणीं सांगितलं तर तुम्ही काय पसंत कराल?" दिसायला मोठा चमत्कारिक, क्षुल्लक आणि पोरकट प्रश्न होता.

".मला एक ग्रॅम रेडियम पाहिजे आहे. तो मला मिळाला तर मला प्रयोग चालू ठेवतां येतील. पण रेडियम फार महाग आहे; तेवढा विकत घेण्याची माझी ऐपत नाहीं."

१९२० च्या मे महिन्यांतील एका सकाळीं एका अमेरिकन वृत्तपत्र-प्रतिनिधीनें मा. मेरी क्यूरींची मुलाखत घेतली, त्या वेळचा हा संवाद आहे. मा. क्यूरींच्या जागतिक मानसन्मानाचा पाया त्यानें घातला. मिसेस् मिलोने बाई ह्या भावी साजसमारंभाच्या दूतीच ठरल्या. या बाईंचें अमेरिकेंत एक मासिक होतें. त्या उत्कृष्ट वार्ताहर होत्या.

मिसेस् मिलोने बाई मेरींची मुलाखत मिळावी म्हणून वीस वर्षें धडपडत होत्या. त्याहि स्वतः अत्यंत ध्येयवादी होत्या. क्यूरींचें संशोधन म्हणजे स्त्री-जातीचा अभूतपूर्व विजय, स्त्री-जातीचा गौरव, असें त्यांना वाटे. या आदरणीय विभूतीचें दर्शन घेऊन चारसहा मिनिटें तरी तिच्याशीं बोलण्याची संधि मिळावी म्हणून त्यांनीं प्रयत्न केला. प्रसिद्धि-विमुख मा. क्यूरींनीं इतर वार्ताहरांप्रमाणें त्यांचीहि सखेद व सविनय अनेकवार बोळवण केली, पण या बाईंनीं चिकाटी सोडली नाहीं. दोन शास्त्रज्ञांच्या मार्फत त्यांनीं वशिला बांधला आणि एकदांची मुलाखत मिळविली; आणि मुलाखत संपतां संपतांच एक प्रचंड योजना त्यांनीं मनाशीं ठरविली.

अमेरिकेंतील संपन्न संशोधन-मंदिरें आणि प्रगमनशील प्रयोगशाळा मिलोने बाईंनीं पाहिल्या होत्या. एडिसनची संशोधनशाळाहि त्यांनीं

पाहिली होती. त्या प्रासादतुल्य मंदिरांच्या मानानें पॅरिसची रेडियम इन्स्टिटयूट त्यांना एखाद्या झोपडीसारखी वाटली. पीट्‌सबर्गच्या खाणींतून रेडियम असलेलें खनिज द्रव्य काढण्याचे प्रचंड कारखाने त्यांनीं बघितले होते. फ्रान्समध्यें त्यांचा मागमूसहि नव्हता. एवढ्या वर्षांच्या खडतर तपश्चर्येनंतर एक ग्रॅमहून अधिक रेडियम क्यूरींच्या प्रयोगशाळेंत नसावा? तो विकत घेण्याचें सामर्थ्य या जगप्रसिद्ध संशोधिकेला नसावें? ही शास्त्रज्ञाची नव्हे तर शास्त्राचीहि आबाळ, उपासमार होती. अमेरिकेनें एक ग्रॅम रेडियम देऊन मेरी क्यूरींचा सन्मान करणें उचित नाहीं का होणार?

मिलोने बाईनें रेडियमचे किंमतीचा तपास केला. एक ग्रॅमची किंमत दीड लाख डॉलर्स—साडेचार लाख रुपये!

अमेरिकेस परततांच मिलोने बाईनीं आपली कल्पना प्रत्यक्षांत उतरविण्यास सुरुवात केली. मेरींच्या सन्मानार्थ स्त्रियांना पाचारण करण्यांत आलें. हां हां म्हणतां वर्गणी जमा झाली. एक वर्षाच्या आंतच मा. क्यूरींना पत्र आलें, "तुमचा रेडियम तयार आहे. अमेरिकेच्या प्रेसिडेंटच्या हस्तें तो आपणांस अर्पण करण्यांत येईल."

* * *

अमेरिकेस जावयाचें म्हणजे मेरींना एक सांकडेंच पडलें. त्यांनीं निरनिराळ्या सबबी पुढें मांडल्या, पण मिलोने बाईनीं त्या सर्वांचें निराकरण केलें. अखेर ईव्ह व इरीन या दोन्ही मुलींसमवेत अमेरिकेस जावयाचें मा. क्यूरींनीं निश्चित केलें. ज्या अमेरिकेनें एवढी मोठी देणगी देऊं केली, त्या अमेरिकेच्या औदार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणें आपलें कर्तव्य आहे; हीच भावना त्यांच्या अंतःकरणांत होती. पॅरिसच्या वर्तमानपत्रांत ही बातमी झळकली; अमेरिकेंत व्हावयाच्या क्यूरींच्या स्वागताच्या कार्यक्रमाचीं रसभरित वर्णनें त्यांत येऊं लागलीं. आतां पॅरिसचा अधिकारीवर्ग जागा झाला. आपल्या देशाची प्रतिनिधि म्हणून त्यांचा अमेरिकेंत सत्कार व्हावा,

यासाठीं त्यांना मोठ्या इतमामानें पदव्या अर्पण कराव्यात असें ठरविण्यांत आलें. पण मा. क्यूरींनीं याहि खेपेस त्यांस नकार दिला. क्यूरींच्या सन्मानार्थ त्यांना निरोप देण्यासाठीं आणि रेडियम इन्स्टिटयूटच्या साहाय्यासाठीं एका संगीतिकेचा प्रयोग मोठ्या थाटानें करण्यांत आला.

मा. क्यूरी, इरीन व ईव्ह यांच्यासह 'ऑलिम्पिक' बोटीवर चढल्या. बरोबर मिसेस् मिलोने होत्याच. त्यांची बडदास्त उत्तम राहावी म्हणून अमेरिकन सरकारनें सर्व खबरदारी घेतली होती, पण त्या श्रीमंती थाटाच्या वातावरणांत क्यूरींचा जीव उबून निघत होता.

* * *

न्यूयॉर्क बंदरांत मा. क्यूरींच्या स्वागतार्थ अफाट जनसंमर्द लोटला होता. बोट बंदरांत येण्यापूर्वीं चार चार तास अगोदर असंख्य लोक 'मानवजातीच्या उपकारकर्त्री'चें दर्शन घेण्यासाठीं ताटकळत बसले होते. अमेरिकेंतील तनिशें पोलिश स्त्रियांचें पथक शुभ्र व तांबड्या गुलाबांच्या फुलांनीं तिचें स्वागत करण्यास सज्ज होतें. बालिका-चमूंची—विद्यार्थिनींची प्रचंड सेना तेथें उपस्थित होती. अमेरिकन फ्रेंच आणि पोलिश राष्ट्रांच्या ध्वजापताकांनीं बंदर नुसतें फुलून गेलें होतें. अमेरिकन नागरिकांच्या उत्साहाला प्रचंड भरती आली होती. ऑलिम्पिक बोट धक्क्याला लागतांच चाळीस पन्नास छायाचित्रकारांनीं त्यांना एकदम वेढून टाकलें. प्रेक्षकांच्या स्वागतपर गर्जनांनीं आणि जयजयकारांनीं आकाश दुमदुमून गेलें.

मा. क्यूरी अमेरिकेंत येण्यापूर्वींच त्यांचें नांव सर्वतोमुखीं झालें होतें. त्या वेळच्या विद्यमान थोर व्यक्तींत मेरी क्यूरींना अमेरिकन जनतेनें अग्रस्थान दिलें होतें. ठिकठिकाणीं त्यांचे फोटो लागले होते. त्याचे लहान-मोठे पुतळे उभारण्यांत येत होते. विज्ञानाच्या विद्यार्थ्यांना त्या प्रतिदेवताच वाटत, आणि सामान्य लोक त्यांच्या आगमनाची मोठ्या भक्तीनें वाट पाहात होते. क्यूरींचे पाय अमेरिकेच्या किनाऱ्यास लागतांच त्यांचें न भूतो न

भविष्यति असें स्वागत झालें. पारितोषिकें, पदकें आणि पदव्या यांचा चर्षाव करण्यासाठीं अमेरिका नुसती अधीर झाली होती!

रेडियममुळें कॅन्सरच्या रोगांतून बऱ्या झालेल्या एका बागाइतदारानें त्यांच्या स्वागतासाठीं दोन महिन्यांपासून फुलांची खास लागवड केली होती. मिलोने बाईच्या निवासस्थानीं येतांच त्यांवर त्या फुलांचा वर्षाव करून त्यानें मा. क्यूरींचें कृतज्ञतापूर्वक स्वागत केलें.

प्रथम स्त्रियांच्या विद्यालयातर्फे मेरींचा सत्कार झाला. अनेक संस्थांना त्यांनीं भेटी दिल्या. दुतर्फा पांढऱ्या शुभ्र पोषाखांतील मुलींच्या रांगा, मुलींच्या कवायती, स्वागतपर पद्यें, गाणाऱ्या मुलींचीं पथकें, जिकडे तिकडे फडकणाऱ्या युनायटेड स्टेट्स्च्या पताका, आणि उधळण्यांत येणारी फुलें असा सर्वत्र देखावा असे.

कार्नेजी हॉलमध्यें विश्वविद्यालयीन स्त्री-संघातर्फे मेरींचें प्रचंड स्वागत झालें. सर्व स्त्रियांनीं आळीपाळीनें गुलाब आणि लिली अशीं पुष्पें त्यांना अर्पण करून त्यांना अभिवादन केलें; आणि पारितोषिकांची व पदव्यांची खैरात केली. त्या वेळीं मोठ्यांत मोठा समजण्यांत येणारा मान "न्यूयॉर्क नगराचें स्वातंत्र्य" हाहि त्यांना अर्पण करण्यांत आला.

त्यानंतर अमेरिकेंतील ५७३ शास्त्रीय संशोधकांच्या प्रतिनिधींतर्फे त्यांचा सन्मान करण्यांत आला.

पण या सर्व समारंभांत युनायटेड स्टेट्स्तर्फे मा. क्यूरींना रेडियम अर्पण करण्याचा जो सोहळा झाला, तो अभूतपूर्व होता. वॉशिंग्टनमधील व्हाइट हाउसमध्यें या समारंभाची व्यवस्था करण्यांत आली होती. अमेरिकेच्या नागरिकांचे प्रतिनिधि, निरनिराळे न्यायाधीश, सैनिक व आरमारी खात्याचे प्रमुख अधिकारी, सर्व विश्वविद्यालयांचे प्रतिनिधि व प्रमुख शास्त्रज्ञ अशी मंडळी त्या समारंभास उपस्थित होती. बरोबर चार वाजतां दोहोदोहोंच्या रांगांनीं सर्व उपस्थितांची मिरवणूक सभामंडपांत दाखल झाली. मिरवणुकीच्या अग्रभागीं प्रेसिडेंट हार्डिंज व मादाम क्यूरी

हीं होतीं. त्यांच्या मागें फ्रान्सचे वकील व सौ. हार्डिंज आणि त्यांच्या मागें ईव्ह व इरीन क्यूरी. मा. क्यूरींच्या गौरवपर अनेक भाषणें झालीं. समारंभाचे अध्यक्ष प्रेसिडेंट हार्डिंज यांनीं रेडियम ठेवलेल्या मुख्य पेटीची सोनेरी किल्ली मादाम क्यूरींस अर्पण केली, आणि ती पेटी मा. क्यूरींना अर्पण केली असल्याचें बक्षिसपत्र व मानपत्र असलेला एक करंडक त्यांनीं मा. क्यूरींस अर्पण केला. " मा. क्यूरी या केवळ शास्त्रज्ञच नसून, त्यांनीं माता व पत्नी या नात्यानेंहि आपली स्त्रीत्वाची जबाबदारी उत्तम पार पाडली आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. स्त्री-जातींतील हा उत्कृष्ट आदर्श आहे. " असे त्यांनीं आपल्या समारोपाच्या भाषणांत उद्‌गार काढले.

मा. क्यूरींनीं हा रेडियम स्वतःसाठीं घेतला नाहीं. समारंभाच्या आधल्या रात्रीं मिलोने बाई जेव्हां बक्षिसपत्राचा मसुदा त्यांच्याकडे घेऊन आल्या तेव्हां लगेच त्यांनीं वकिलांना बोलावून हा रेडियम शास्त्रीय संशोधनाच्या कामासाठीं रेडियम इन्स्टिटयूटला दिला जात असल्याबद्दल त्यांत स्पष्ट उल्लेख करून टाकला. या अद्‌भुत त्यागानें मिलोने बाईंचे व जगाचेहि डोळे दिपले.

वॉशिंग्टन सोडण्यापूर्वीं मा. क्यूरींच्या हस्तें एका खाणींतील प्रयोग-शाळेचा उद्‌घाटन समारंभ झाला.

त्यानंतर त्यांचें मोठें स्वागत फिलाडेल्फिया येथें झालें. तत्त्वज्ञान-मंदिरा-तर्फे त्यांना ' जॉन स्कॉट ' सुवर्णपदक अर्पण करण्यांत आलें. त्यांनीं पीटसबर्गच्या रेडियम कारखान्यास भेट दिली. शिकागो येथेंहि त्यांना ' डॉक्टर ' पदवी अर्पण करण्यांत आली. न्यूयॉर्कमध्यें कोलंबिया विद्या-पीठातर्फेहि त्यांना तीच पदवी सन्मानपूर्वक दिली गेली. अमेरिकेंतील प्रमुख ८–१० विद्यापीठांनीं त्यांना डॉक्टर पदवी देऊन स्वतःस कृतार्थ करून घेतलें. शास्त्रज्ञांच्या मंडळांनीं त्यांना आपलें सन्माननीय सभासदत्व अर्पण करून त्यांस भूषविलें आणि स्वतः धन्यत्व मिळविलें.

अमेरिकेंतील लोकांच्या उत्साहास खंड पडत नव्हता; आणि लांबचा

प्रवास, सतत समारंभ, अनेक मेजवान्या, आणि लोकांची रीघ—यामुळें मा. क्यूरी अगदीं थकून गेल्या होत्या. अखेर कांहीं समारंभास त्यांच्या तर्फे त्यांच्या मुलीच हजर राहूं लागल्या; आणि कांहीं समारंभ मा. क्यूरींच्या आजारपणामुळें रहित करावे लागले.

पण त्या सर्वांतील रोमांचकारी समारंभ शिकागो येथील पोलिश वसाहतीतर्फे करण्यांत आलेला मा. क्यूरींच्या गौरवाचा होता. त्या समारंभास फक्त पोलिश लोकच उपस्थित होते. मा. मेरी क्यूरी—स्क्लोडोवस्का यांच्या गौरवानें त्यांचीं अंतःकरणें पुलकित झालीं होतीं. मा. मेरींनीं त्यांच्या पितृभूचें शिर उन्नत केलें होतें. मा. क्यूरी त्यांना आपल्या पितृभूची साक्षात् प्रतिमा वाटली. त्यांचे नेत्र उत्कृष्ट प्रेमानें व आदरानें सजल झाले. बाष्प—गद्‌गद स्वरानें ते मा. क्यूरींवर स्तुतिसुमनें उधळीत होते. मा. क्यूरींच्या हाताचें चुंबन घेतां यावें, निदान त्यांच्या पोषाखाला तरी स्पर्श करण्याची संधि मिळावी म्हणून भावनावश श्रोतृसमूहांत कोण धडपड सुरू होती! परदेशांत पिढ्यान् पिढ्या वास्तव्य करणाऱ्या स्वकीयांच्या अत्युत्कट भावना बघून मा. क्यूरी—स्क्लोडोवस्कांचें हृदय उचंबळून आलें असलें तर त्यांत नवल काय?

* * *

महायुद्धानंतर लीग ऑफ नेशन्स – राष्ट्रसंघ – या संस्थेची स्थापना झाली. हल्लींच्या 'अनेस्को' (U. N. E. S. C. O.) प्रमाणेंच 'बौद्धिक सहकार्यासाठीं आन्तरराष्ट्रीय समिति' या नांवाची एक शाखा उघडण्यांत आली होती. त्या समितीच्या उपाध्यक्षाच्या जागीं मा. क्यूरींची निवड करण्यांत आली होती. सर्व राष्ट्रांतील संशोधकांना परस्परांच्या कार्याची माहिती उपलब्ध असावी, संदर्भसूचि तयार व्हावी, योजावयाच्या चिन्हांत व परिभाषेंत एकसूत्रीपणा यावा यासाठीं मा. क्यूरींनीं खूप परिश्रमपूर्वक काम केलें.

जगांतली बुद्धिमत्ता फुकट जाऊं नये, नवीन उत्साही संशोधकांना

उत्तेजन मिळावें यासाठीं कांहीं व्यावहारिक योजनाहि त्यांनीं पुढें मांडल्या. आन्तरराष्ट्रीय भूमिकेवरून विज्ञानाची व जगाची प्रगति व्हावी यासाठीं या सेवापरायण विदुषीनें कंकण बांधलें.

महायुद्धांत प्रकट झालेली शास्त्रीय शोधांची भीषण व रौद्र बाजू बघूनहि विज्ञानावरची त्यांची श्रद्धा ढळली नाहीं. त्या म्हणत :

> "विज्ञानांत खूप सौंदर्य आहे असें मानणाऱ्यांपैकीं मी एक आहें. एखाद्या अद्भुत कथेप्रमाणें निसर्ग आपलें अंतरंग शास्त्रज्ञाला उलगडून दाखवून त्यास स्तंभित करतो."

प्रत्येक देशाच्या संस्कृतीचा योग्य मान राहूनहि एक आन्तरराष्ट्रीय संस्कृति निर्माण व्हावी, विज्ञानांतील आध्यात्मिक शक्तीचा विकास व्हावा, जागतिक शान्तता प्रस्थापित व्हावी, अशीं किती तरी नवनवीं स्वप्नें त्यांच्या दृष्टीसमोर आतां तरळूं लागलीं; आणि त्यांचें त्या आग्रहानें प्रतिपादनहि करूं लागल्या. त्यांच्या प्रयोगशाळेचें क्षेत्र जगाएवढें आतां व्यापक झालें होतें. आपल्या मुलीला लिहिलेल्या एका पत्रांत त्या श्रद्धेनें लिहितात :

> "आन्तरराष्ट्रीय कार्यांत अडचणी खूप आहेत. पण हा उमेदवारीचा काळ आपण घालविलाच पाहिजे. त्यासाठीं दीर्घोद्योग व त्याग यांची गरज आहे. जिनिव्हा येथें चाललेल्या आपल्या कार्यांत अपूर्णता असेल, पण तें तितकेंच भव्य आहे. सर्वांनीं त्याला पाठिंबा द्यावयास हवा."

● ● ●

## पुष्पसमर्पण : : १८

" जॉर्ज, तें गुलाबाचें रोप सुकत चाललें आहे, जरा नीट लक्ष दे त्याकडे."

१९३४ च्या मे मधील गोष्ट. दुपारीं तीन साडेतीनपर्यंत मा. क्यूरी आपल्या प्रयोगशाळेंत काम करीत होत्या. आपल्याला सणसणून ताप भरणार असें त्यांना वाटूं लागलें. गेल्या वर्षसहा महिन्यांत त्यांना जोराच्या थंडीच्या पाळ्या येत. चेहरा फिक्कट पांढुरका पडला होता. अंगांतलि रक्त कमी झालें होतें. डॉक्टर लोक व भेटावयास येणारी जिव्हाळ्याची स्नेहीमंडळी यांनीं त्यांना विश्रान्ति घेण्याची सूचना करून पाहिली, पण आपल्या नेहमींच्या वृत्तीप्रमाणें क्यूरींनीं तिकडे जरा कानाडोळाच केला. आज त्यांना प्रयोगशाळेंत बसवेनाच; तेव्हां जवळच्या एका विद्यार्थ्यास बोलावून 'मला ताप भरत आहे, मी घरीं जात्यें,' म्हणून त्या जावयास उठल्या. बाहेर पडल्यावर बागेंत त्यांनीं एक फेरी घातलीच. कांहीं टव-टवीत उमललेलीं सुंदर फुलें बघून त्यांना आनंद वाटला. बागेच्या एका कोपऱ्यांतील एक गुलाबाचें झाड सुकून गळाठलें होतें. आपल्या माळ्याला हांक मारून त्यांनीं त्याला त्या रोपाकडे लक्ष द्यावयास सांगितलें. त्यानंतर पुनः रेडियम इन्स्टिटयूटला मा. क्यूरींचे पाय लागले नाहींत!

चा र जु लै ए को णी स शें चौ ती स

सकाळच्या प्रशान्त वेळीं सँकेल मॉझच्या आरोग्यमंदिरांत अविश्रान्त धडपडणारें मेरी क्यूरींचें हृदय शान्त झालें ! क्षितिजावर दिवसाचे दूत उभे होते. बालसूर्याची आरक्त प्रभा हिरव्यागार, शीतल, निर्मल वातावरणांत पसरली. मेरींचें जीवन-पुष्प त्या बाल-रवीच्या चरण-कमलांवर अर्पण झालें.

* * *

मेरींच्या शवास स्केओ येथील स्मशानगृहांत तिच्या पतीच्या थडग्यांत अत्यंत शान्तपणें विश्रान्ति देण्यांत आली. शवाची मिरवणूक काढण्यांत आली नाहीं, भाषणें करण्यांत आलीं नाहींत; अगदीं निवडक आप्त व स्नेही यांनाच त्या अंत्यदर्शनास उपस्थित राहण्याची परवानगी मिळाली होती. पोलंडहून त्यांची थोरली बहीण ब्रोन्या व बंधु जोसेफ दोघेंहि आलीं होतीं. त्यांनीं आपल्याबरोबर आणलेली पोलंडची मृत्तिका शवावर लोटून तिचा अखेरचा निरोप घेतला.

* * *

आज स्वतंत्र भारतांत विज्ञानाच्या उपासनेचा डिंडिम वाजत आहे. अशा वेळीं भारतांतील कुमार-कुमारींना व युव-युवतींना मेरीचें चरित्र स्फूर्ति देईल, मार्ग दाखवील. त्यांना परिचित वाटण्यासारखे किती तरी प्रसंग मेरीच्या जीवनांत आहेत. आपल्या परिचित आप्तांचा वा स्नेह्यांचा जीवनपट जणूं आपण पाहात आहोंत, असें वाटण्याइतकें परिस्थितीचें साम्य त्यांत आहे.

एका पददलित, छिन्नविच्छिन्न झालेल्या पण अभ्युत्थानाची आकांक्षा हृदयाशीं दृढ धरलेल्या चिमुकल्या राष्ट्रांत शिक्षकाच्या सामान्य कुटुंबांत तिचा झालेला जन्म; देशाच्या पारतंत्र्यामुळें व घरच्या गरिबीमुळें ज्ञानार्जनाची तीव्र लालसा बाजूस सारून आणि घरादाराचा त्याग करून ऐन उमेदीच्या बहरांत करावी लागलेली कंटाळवाणी नोकरी; दारिद्र्यामुळें

पदोपदीं होणारी अवहेलना आणि मानखंडना, आणि त्याच्याच पायीं झालेला प्रेमभंग; अखेर जिवाचा धडा करून विद्याभ्यासासाठीं केलेला स्वदेशाचा त्याग; परदेशांत एकभुक्त राहून आणि स्नेह्यासोबत्यांच्या खेळकर सहवासावर व नृत्यगायनादि आवडीच्या कलांवर पाठ फिरवून अनन्यनिष्ठेनें व एकतानतेनें केलेली शारदेची उपासना; पुरेशा साधनांच्या अभावीं सर्व प्रकारचे शारीरिक कष्ट सोसून एका खोपटांत रेडियमची सिद्धि करण्यासाठीं केलेली दीर्घ साधना—हें सर्व बघितलें म्हणजे किती दीर्घ, कणखर तपश्चर्येच्या, त्यागाच्या व मनोबलाच्या पायावर मेरीच्या जीवनाची भव्य व सुंदर इमारत उभी आहे याची कल्पना येते.

मेरीच्या जीवनांत अद्भुतता नाहीं; सर्वत्र मानवी प्रयत्नांचें आणि दृढ इच्छाशक्तीचें मंगल व उत्साहवर्धक दर्शन आहे. म्हणून त्याची मातब्बरी विशेष; त्यांतील गोडवा हृदयंगम. अगदीं सामान्य लोकांच्या जीवनांतील सांसारिक सुखदुःखांचे सर्व प्रसंग तिच्या आयुष्यांत आहेत. सारे आघात तिच्या वांट्यास आले आहेत. मातृ-भगिनीवियोगापासून पतिवियोगापर्यंत सारी कटु दुःखें तिनें अनुभवलीं. तसेंच जीवनांतील स्निग्ध सुखांचाहि तिनें आस्वाद घेतला. लहानपणीं मातेचा प्रेमळ हात तिच्या पाठीवरून फिरला; पित्याच्या प्रेमळ छायेखालीं ती वाढली; बंधु-भगिनींचें निःस्वार्थ प्रेम तिला लाभलें; मेहुण्याचा स्नेहशील आधार तिला कठीण प्रसंगांत अभावितपणें लाधला; पिएरसारख्या काव्यात्म शास्त्रज्ञाच्या शीतल, गंभीर प्रेमाच्या सिंचनानें तिची जीवन-लतिका बहरली; वैधव्याच्या दुःखांत होरपळून निघत असतां धीर-गंभीर सासऱ्याचें सान्निध्य तिला लाभलें; आणि इरीन-ईव्हसारख्या तिची कीर्तिपरंपरा राखणाऱ्या कन्यांकडून वृद्धपणीं मनाला दिलासा मिळाला. या साऱ्या प्रसंगांच्या हृद्य स्मृति मेरीनें आपल्या हृदयांत अखंड उजळत ठेवल्या होत्या. त्यापासून अवर्णनीय सुखसमाधान तिच्या कृतज्ञ हृदयास मिळत होतें.

मेरीला जीवनाचें दर्शन अगदीं जवळून घडलें. त्याचीं विविध रूपें तिनें पाहिलीं, अनुभवलीं. त्यांतील आत्यंतिक विरोध आणि विषमता यांचा तिला अनुभव आला. तिचें स्वतःचें जीवन अशा परस्परविरोधी दृश्यांची दीर्घ मालिकाच आहे. ज्या मेरीनें बालपणीं आपल्या मातेला दुर्धर रोगाशीं झगडतांना असह्यपणें पाहिलें, तीच मेरी उतारवयांत रणक्षेत्रावर असंख्य सैनिकांना धीर देत होती; कॅन्सरच्या रोगाला बळी पडलेल्या आपल्या सासूच्या वेदना जिनें हताशपणें पाहिल्या, तिला आतां रेडियमच्या साह्यानें रोगमुक्त होणाऱ्या आजाऱ्यांचे धन्यवाद घेण्याचें भाग्य लाभलें. दारिद्र्याच्या क्षुद्र कारणासाठीं जिला दुलुस्कीच्या एका कुटुंबानें झिडकारलें, त्याच मेरीच्या स्वाक्षरीसाठीं पंचखंडान्तरींची जनता लोळण घेत होती; आणि ज्या मायदेशांत पदार्थविज्ञानाचे पाठ तिला चोरून घ्यावे लागले, त्याच मायभूमींत तिचें प्रचंड स्वागत होऊन उदयोन्मुख शास्त्रज्ञांना तिनें रेडियम-संशोधनांत मार्गदर्शन केलें. हा महिमा काळाचा कीं कर्तृत्वाचा? कसलाहि असो, जीवनोपासक मेरीचें अंतरंग या विरोधांनीं उबगलें नाहीं. तिचें हृदय विशाल आणि विनम्र बनत गेलें. उजळत्या भाग्याबरोबर आणि वाढत्या वैभवाबरोबर तिच्या सहृदयत्वाचा झरा अनंत धारांनीं वाहूं लागला. आत्मप्रौढीनें तो कलुषित झाला नाहीं; आळसानें तो मंदावला नाहीं. नोबेल पारितोषिकाची जगन्मान्यता मिळाल्यावरहि तिच्या साध्या राहणींत, विनयशील वृत्तींत, ज्ञानोपासनेंत फरक झाला नाहीं. 'भाग्येषु अनुत्सेकिनी'च ती राहिली. हेंच तिच्या चारित्र्यांतील असामान्यत्व.

पण मेरीच्या जीवनाचें आणखी एका दृष्टीनें समालोचन आपण केलें नाहीं, तर तिच्यावर अन्याय केल्यासारखें होईल. ती बाजू म्हणजे तिचें स्त्रीत्व. स्त्री म्हणून तिचीं कांहीं कर्तव्यें होतीं, कांहीं जबाबदाऱ्या होत्या, कांहीं नैसर्गिक गुणांचें वास्तव्य तिच्या ठिकाणीं होतें. त्या गुणांचा विकास, त्या जबाबदाऱ्यांचें आणि कर्तव्यांचें पालन जर यदाकदाचित् तिजकडून

पूर्णत्वानें न व्हेतें; जरी जगानें तिच्याकडे क्षमाशील दृष्टीनें पाहिलें असतें, इतकें तिचें कार्य महनीय होतें. पण तेवढाच तिच्या व्यक्तिमत्त्वांत कमीपणा राहिला असता; आणि स्वाभिमानी व ध्येयवादी मेरीला ही गोष्ट कशी सहन झाली असती ? कन्या म्हणून, भगिनी म्हणून, पत्नी म्हणून, माता म्हणून आपल्यावर कांहीं जबाबदारी आहे हें तिनें नुसतें ओळखलेंच नव्हतें, तर त्या सर्व कर्तव्यांचें निरपेक्ष कर्तव्यबुद्धीनें मनाचें समाधान करून मोकळें होण्यासाठीं नव्हे तर जीवनांतील निरागस आनंदाचें, आल्हादाचें साधन म्हणून तिनें त्या जबाबदाऱ्यांचें स्वागत केलें; त्यांचा अंगीकार केला. आपल्या वृद्ध पित्याला आपण सदैव सुख दिलें पाहिजे हा एकच विचार तिला कळूं लागल्यापासून तिच्या अंतःकरणांत बलवत्तर होता. प्रत्यक्ष सान्निध्याचें समाधान तिला जरी देतां आलें नाहीं, तरी आपल्या कार्यानें तें त्यांना मेरीनें दिलें. ती कर्तव्यदक्ष गृहिणी होती, विवाहानंतर आपल्या पतीच्या खाण्यापिण्याच्या बाबतींत ती जातीनें लक्ष घाली. आपल्याला चार पदार्थ नीट शिजवितां येत नाहींत, हें वैगुण्य सासऱ्याला दिसूं नये, म्हणून पाकशास्त्रावरील पुस्तक आणून निरीक्षणानें, प्रयोगानें ही विद्या तिनें हस्तगत केली. प्रपंच कौशल्यानें करावयाचा म्हणजे तो काटकसरीनेंच करावा लागतो, आणि या काटकसरीचें तर मेरीला बाळकडूच मिळालेलें होतें. ती आपला नित्याचा जमाखर्च न चुकतां लिहीत असे; आणि महिन्याच्या अंदाजपत्रकांत एखाद्या बाबींत अधिक खर्च अनपेक्षितपणें झाला, तर दुसरीकडे काटकसर करून तूट भरून काढण्याची ती धडपड करी. लहान फुलांची तिला हौस होती. आपल्या मुलींचें संगोपन तिनें आस्थापूर्वक केलें. दिवसाचे व्याप सांभाळूनहि आपल्या मुलींच्या वजनांत वाढ कसकशी होते आहे; त्यांना दांत किती, केव्हां निघाले; त्या कोणकोणते शब्द कसकसे बोलावयाला शिकल्या यांचीं बारीकसारीक टिपणें शास्त्रज्ञाच्या काटेकोरपणें तिनें ठेविलीं; त्यांच्या मनोविकासाकडे योग्य तें लक्ष पुरविलें; त्यांचे कधीं हळुवारपणें फाजील ल

बडगाहि उगारला नाहीं. राग, चिडाचीड, धुसफूस यांना तिच्या घरांत कधीं डोकवावयासहि संधि मिळाली नाहीं. मुली मोठ्या होतांच शाळेंत मिळणारें शिक्षण विनाकारण कालापव्यय करतें, म्हणून स्वतः इतर कांहीं सहकाऱ्यांच्या साह्यानें शिक्षणाचे प्रयोग करून पाहण्यासहि तिनें कमी केलें नाहीं.

स्त्रियांचें कार्यक्षेत्र कोणतें,—" चूल अन् मूल ? " कीं " चूल, मूल व फूल ? " यांचे वाद आम्हीं निष्क्रिय आणि संकुचित वृत्तीच्या लोकांनीं माजवावेत. मेरीसारख्या कर्तबगार धोपटमार्गी स्त्रियांपुढें असे प्रश्न कधींच निर्माण होत नाहींत. जीवन आपलें विविधरंगी भांडार त्यांच्यापुढें पसरून उभें असल्याचें त्यांना दिसत असतें. उचलतां येतील तेवढे रंग, तेवढे धागे घेऊन आपला जीवनपट विविधरंगी, दीर्घ व भरदार बनविण्यासाठीं त्या झटत असतात. वावदूकपणापेक्षां कृतीनेंच जीवनाचें सार्थक होत असतें, याचा जणूं अबोधपूर्वक प्रत्यय त्यांना जन्मतःच आलेला असतो.

देशसेवा हें एक मेरीच्या जीवनांतलें स्वप्न होतें. पण एका थोर शास्त्रज्ञाच्या सहवासांत मानव्याच्या, ज्ञानाच्या सेवेचें विशाल स्वरूप त्यास तिला द्यावें लागलें. पण त्यामुळें मूळच्या स्वप्नाचा सुगंध लोपला नाहीं. आपल्या पहिल्या संशोधनांतील अपत्याचें 'पोलोनिअम' नामकरण करून आपल्या राष्ट्राची कोमल स्मृति आपल्या अंतःकरणांत किती खोल दडून बसली आहे याचा जणूं अनुभवच आपल्या ज्ञानयोगी पतिराजांना तिनें आणून दिला !

भारतीयांना चिरपरिचित आणि चिरवांछित अशा अनेक वृत्तींचा आणि सद्गुणांचा संगम मा. क्यूरींच्या ठिकाणीं दिसून येतो. तिची एकान्तवासाची आवड आणि निसर्गप्रेम आश्रमकन्यकांची आठवण करून देतात. निरलस आणि निष्ठापूर्वक ज्ञानाची उपासना या बाबतींत ती ऋषिमुनींची दुहिताच शोभते. तिची कीर्तिविमुखता, पतिपरायणता, आणि पतिप्रेमांत आत्मविसर्जन हीं बघून भारतीय रमणी तिच्या चरणी मस्तक

नम्र करतील; आणि तिची अचल ध्येयनिष्ठा, पराकाष्ठेचा त्याग, आणि जनसेवेची तळमळ तिला थोरांच्या मालिकेंत मानाचें स्थान मिळवून देतील. मा. क्यूरींचें जीवन म्हणजे दीर्घोद्योग आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर परिस्थितीशीं अहर्निश झगडून घडवून आणलेला आत्मविकास व अखंड ज्ञानार्जनासाठीं केलेलें आत्मार्पण. जीवनाचा तो एक भव्योदात्त आदर्श आहे.

मा. मेरी क्यूरींची जीवनकहाणी संपली. पण सदैव दरवळत राहण्याइतका तिचा सुगंध प्रभावी आहे.

• • •

अनुक्रम २८८६८
विभाग
क्रमांक १०३८
नों. दि. ३१।३।६७

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. ५४७१८ नों. दि
वि. क्र.